
साप्ताहिक

# माणूस

२६ जुन ८२ / दीड रुपया

## शेतकरी तितुका एक एक....
## शरद जोशी आणि पंजाबचे किसान







## 'ते' सत्ताधीश आहेत... कम्युनिस्ट ?

# तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास

'माणूस' साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी रुपये पन्नास आहे. या वर्गणीत दिवाळी अंक वर्गणीदारांना दिला जातो. शिवाय वर्षातून निघणारा एकाद–दुसरा विशेषांकही.

पोस्टाचे दर भरमसाठ वाढले आहेत.

वार्षिक वर्गणीदारांप्रित्यर्थ होणारा टपाल व इतर कार्यालयीन खर्च वाचविण्यासाठी तीन वर्षांची वर्गणी एकदम पाठवून सगळ्यांचाच त्रास थोडा कमी करणे शक्य आहे.

## सप्रेम भेट

आपण आपली वर्गणी संपेपर्यंत वाट न पाहता ३ वर्षांची वर्गणी चालू किंवा जुलै महिन्यातच पाठवणार असाल तर एक नवी कोरी करकरीत पुस्तकभेट आपल्याला आम्ही देऊ शकू.

## षटक आणि षटकार

लेखक : संदीप पाटील
रवी शास्त्री

आदित्य प्रकाशन, मुंबई

किंमत : पंचवीस रुपये

ही पुस्तकभेट पाठविण्याचा खर्च मात्र आम्ही करू शकणार नाही !

जून–जुलै महिन्यात ३ वर्षांची १५० रुपये वर्गणी भरणाऱ्यांनी वरील पुस्तक माणूस कार्यालयातून १ जुलै नंतर घेऊन जावे किंवा फक्त टपाल–पाठवणी खर्चाची व्ही. पी. केली जाईल, ती सोडवून घ्यावी.

**आपणास ही पुस्तकभेट नको असल्यास**

**आपण सरळ एकशे पंचवीस रुपये पाठवा**

तीन वर्षांची वर्गणी एकदम भरल्यास ही पंचवीस रुपयांची सूट आहे. ही सूट–सवलतही फक्त ३१ जुलैपर्यंत !

साप्ताहिक माणूस १०२५ सदाशिव, पुणे ३०.

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : तिसरा

१९ जून १९८२

किंमत : दीड रुपया

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤


# स्वतत्त्व आणि सुतत्त्व

महाराष्ट्र साहित्य-पत्रिकेच्या चालू एप्रिल-मे–जून अंकात 'विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा जोतिबा फुले' याच्या कार्यासंबंधी श्री. द. न. गोखले याचा एक अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध झाला आहे. अभ्यासाबरोबरच लेखकाचा समन्वयवादी व तौलनिक दृष्टिकोनही लेखात जागोजाग प्रकट झाला आहे व समारोपात तर लेखकाने स्वच्छच लिहिले आहे की, 'वर्तमानकाळाची नि येत्या शतकाची अशी मागणी आहे की, आम्हाला विष्णुशास्त्री चिपळूणकर हवे आहेत आणि महात्मा जोतिबा फुलेही हवे आहेत. आम्हाला सामाजिक समता मागणारे चिपळूणकरही पाहिजे आहेत आणि ज्वलंत राष्ट्रवाद पुकारणारे फुलेही पाहिजे आहेत. छे! छे! प्राप्त काळ वाट बघत आहे विष्णुशास्त्री फुल्यांची!! जोतिबा चिपळूणकरांची!!'

ही समन्वयी भूमिका स्वागतार्हच आहे; पण फुले साप्रदायिकाकडून प्रतिसाद कितपत मिळेल हे सांगवत नाही. जनता राजवटीत जयप्रकाशांच्या मध्यस्थीमुळे राष्ट्रवादी आणि समतावादी प्रवाह काही काळ एकत्र आले होते. दुहेरी सदस्यत्वासारख्या एका फालतू प्रश्नावर शाब्दिक रणे माजवली गेली आणि हे प्रवाह अलग झाले. हा अलगपणा सध्या इतका टोकाला गेलेला आहे की, पुण्यात निघालेली विश्व हिंदू परिषदेची प्रचंड मिरवणूकही समतावाद्यांना पाहवली नाही आणि त्यांनी या मिरवणुकीचा जनमानसावरील प्रभाव पुसून टाकण्यासाठी, डावास प्रतिडाव म्हणून, राष्ट्रीय एकात्मता परिषदांचा धडाका उडवून दिला. वास्तविक अस्पृश्यतेची मृत्युघंटा वाजवीत निघालेली हिंदू धर्मानुयायाची मिरवणूक पाहून कुणालाही समाधान व आनंद व्हायला हवा होता. ज्यासाठी सगळे समाजसुधारक आपली लेखणी आणि वाणी गेली शंभरएक वर्षे झिजवत आले, ती गोष्ट हिंदू समाजाने मान्य केली, हा समाज आपल्यावरील अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्यासाठी कटिबद्ध होतो आहे, त्यासाठी नित्याचे विधायक कार्य आणि नैमित्तिक मिरवणुका-मेळावे वगैरे भरवून जनजागरणाचा वेग वाढवू पाहत आहे, हे दृश्य चांगले की वाईट? भले हा वेग मीनाक्षीपुरमच्या धक्क्यामुळे वाढला असेल! मूळ हेतू यामुळे साध्य होत असेल तर अशा दृश्यांचे वास्तविक स्वागतच व्हायला हवे–त्यातील अतिरेक टाळण्याचा इशाराही हवाच; पण स्वागत आणि हक्काचा इशारा राहिला बाजूला; ओरड उठली अशी मिरवणूक काढणाऱ्या संघटनांवर बंदी घालण्याची. असा सगळा सध्या पूर्वग्रहदूषित मामला आहे. त्यामुळे अजून काही काळ तरी महाराष्ट्राच्या राजकीय–सामाजिक जीवनातले हे दोन प्रवाह वेगवेगळे राहणे अटळ दिसते. विचार बदलले तरी संस्कार तेच राहतात संस्कारांच्या पातळीवरचा समन्वयच टिकाऊ ठरतो. असे जरी असले तरी वैचारिक व बौद्धिक पातळीवरून समन्वयाची भूमिका मांडत राहण्याला महत्त्व आहेच. हे कार्य द. न. गोखले याच्या लेखाने उत्तम साधले गेले आहे श्री. गोखले यांचे याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.

¤

पत्रिकेच्या संपादकांनी या विषयावर अधिक चर्चा व्हावी म्हणून श्री गोखले यांचा लेख काही जणाकडे पाठवला. यापैकी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. ग. वा. बेहरे व श्री. ना ग गोरे यानी लेखावरील प्रतिक्रिया पत्रिकेला कळवल्या, त्या याच अंकात संपादकांनी छापल्या आहेत. तर्कतीर्थांची प्रतिक्रिया नोंद घेण्यासारखी आहे. तर्कतीर्थांनी म्हटले आहे : 'देशातील सर्व जातीजमातींचे म्हणजे नागरिकाचे हितसंबंध परस्पर-पोषक व परस्पराच्या आत्मोन्नतीस संपूर्णपणे उपकारक असावे लागतात.' असे हितसंबंध समाजरचनेत 'दृढमूल' झालेले असले म्हणजे 'तेथे राष्ट्र म्हणून एक सामाजिक, राजकीय संघटना अस्तित्वात येते.'

तर्कतीर्थांचे हे मत मान्य केल्यास जगात आज एकही देश 'राष्ट्र' ठरू शकणार नाही.

राष्ट्राभिमानासाठी प्रसिद्ध असलेल्या इंग्लंड-मध्ये आजही हुजूर आणि मजूर आहेत. त्यांचे संबंध परस्परांच्या आत्मोन्नतीस संपूर्णपणे उपकारक समजायचे का ? ते नसल्यास आणि नाहीतच–इंग्लंडचे राष्ट्रीयत्व तोवर 'वेटिंग लिस्ट' वर ठेवायचे का ? अमेरिकेतले निग्रो आणि गोरे यांच्यात उघडउघडच वैर-भाव आहे. मग अमेरिकेला 'राष्ट्र' ही पदवी तर्कतीर्थांकडून मिळवायला आणखी किती शतके वाट पाहावी लागेल ? आदि-वासी समाजात हितसंबंध बरेचसे परस्परा-नुकूल, परस्पर पोषक व समानतेवर आधा-रित असतात; पण या समाजात राष्ट्रभाव-नेचा अभावही दिसतो. असे का ?

विष्णुशास्त्र्याचा राष्ट्राभिमान एकारलेला होता, राजा राममोहन रायांसारख्यांच्या, लोकहितवादीच्या, दयानंदांच्या, म. फुल्यांच्या सुधारणावादाला त्यांनी आंधळा व अहंकारी विरोध केला, हा विरोध चूकच होता, असे म्हणता येईल; पण राजा राममोहन राया-दिकांना राष्ट्राभिमानाचे आदिरहस्य चिपळूण-करापेक्षा अधिक जाणवलेले होते हे तर्क-तीर्थांचे मत फार विचित्रच आहे. १८५७ च्या बंडात म्हणा की स्वातंत्र्ययुद्धात म्हणा, ब्रिटिशांचा विजय झाला म्हणून चर्चमध्ये जाऊन आकाशातल्या प्रभूचे आभार मानणारे राजा राममोहन राय जर राष्ट्रवादाच्या आदिरहस्याचे 'साक्षात्कारी' जाणकार माना-यचे, तर झाशीच्या राणीचे पुतळे देशभर उभे करणाऱ्या सगळ्यांना त्याआधी मूर्ख ठरवायला हवे. देशाभिमानाचे आदिरहस्य आदिकवींनीच सांगून ठेवले आहे–जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥ स्वत्वाची प्रखर जाणीव हे स्वत्व जितके व्यापक व विशाल, सर्वस्पर्शी व सर्वसाक्षी असेल तितके चांगले; पण 'स्व'तत्त्वाची जागा, एखादे 'सु'तत्त्व जरी असले,तरी ते घेऊ शकत नाही. सुराज्यापेक्षा स्वराज्य हवे असे टिळक नाही तर का म्हणाले असते ?

□

चिपळूणकर इंग्रजशाहीविरुद्ध उभे ठाकले. फुले ब्राह्मणशाहीविरुद्ध लढले. आज या दोन्ही शाह्या संपल्या आहेत. घाशीराम कोतवाल नाटकात सुरुवातीस समोर येणारी ब्राह्मणशाहीची भिंत आज बहुतांशी ढासळ-लेली–ढेपाळलेली आहे आणि इंग्रज तर गेलाच; पण तो गेला असला तरी आर्थिक पारतंत्र्य संपलेले नाही. सांस्कृतिक गुलामगिरी वाढतच आहे सगळ्याच नवस्वतंत्र देशां-समोरील हे नवें संकट आहे. इग्लंडची जागा अमेरिकेने किंवा रशियाने घेतलेली आहे व पूर्वीच्या ब्राह्मणांच्याऐवजी आता नवे तज्ज्ञ आणि तंत्रज्ञ आले आहेत. पूर्वी 'मंत्र' हस्त-गत करून,तो नसणाऱ्या इतरांवर गुलामगिरी लादली जायची. मंत्राऐवजी आता 'तंत्र' हे काम करीत आहे. त्या वेळी इंग्रजाचे अंधा-नुकरण व्हायचे आता आपली नवी पिढी अमेरिकेकडे डोळे लावून बसलेली आहे. राजकीय स्वातंत्र्य आले; पण आर्थिक व सांस्कृतिक दास्य वाढले. या नव्या दास्या-विरुद्ध, गुलामगिरीविरुद्ध कसे उभे ठाकायचे? भारतीय राष्ट्रवादासमोरील हे आजचे मुख्य आव्हान आहे. चिपळूणकर–फुले यांच्या प्रवृ-त्तींचा काहीएक समन्वय साधूनच हे आव्हान पेलता येईल स्वभाषा, स्वदेश याविषयीचा प्रखर अभिमान नसला तर राष्ट्रवाद उभाच राहू शकत नाही; पण विषमतेने, जातिभेदाने पोखरलेल्या समाजाचे 'स्वत्व'ही बरेचदा पोकळ व निःसत्त्व ठरते. समता व स्वातंत्र्य यांचा समन्वय हवा; पण सध्या तरी असा समन्वय, तो घडवणारी व्यक्ती किंवा शक्ती दृष्टिपथात नाही. कुठे दात आहेत तर कुठे चणे ! हे अंतर कमी व्हावे म्हणून प्रयत्न करणाऱ्यांना श्री. गोखले यांच्या लेखाने थोडा तरी दिलासा नक्कीच मिळेल.

—श्री. ग. मा.

## पुणे वार्ता

# बगीचा ! पंचाहत्तरीतला !

नानासाहेब म्हणजे एक सदाबहार, सदा-सतेज निशिगंध ! तीच शुभ्रता, निर्म-लता आणि देखणेपण.

१५ जूनची प्रसन्न सकाळ. नानाचा अमृत-महोत्सवी वाढदिवस. नानासाहेबांच्या सदाशिवपेठेतल्या घरी दिवाणखान्यात टवटवीत, रंगीबेरंगी फुलांच्या सान्निध्यात तितकेच टवटवीत नानासाहेब बसले आहेत. आजूबाजूची असंख्य फुलं नानांच्या चेहऱ्यावर फुलली आहेत. तेच फुलणं आजूबाजूच्या हितचिंतकांच्या चेहऱ्यावर परावर्तित झालं आहे. कपाळावर मंगल कुंकुमतिलक लावलेले नाना हसतमुखानं सगळ्यांचं स्वागत करताहेत. फुलछड्यांचे गुच्छ घेताहेत. नानासाहेबांचं सगळं घरच सुवासिक झालं आहे. होणारच ! आजूबाजूला मुलगी शुभा, जावई आणि नाती–जाई-सायली शिवाय सोबतीला गुलाब, मोगरे......आणि हित-चिंतकांची झुबड !

शुभ्र तलम धोतर आणि सदऱ्यातले नानासाहेब त्या दिवशी इतके प्रसन्न दिसत होते की, वाटलं वयाची पंचाहत्तरीदेखील एवढ्या हितचिंतकांच्या सान्निध्यात साजरी व्हावी हे किती भाग्याच ! आणि आता-पर्यंतच्या ७४ वर्षांच्या खुणा नानांनी कशा लपवल्या असतील ?

नानांना गुलाबाच्या फुलांचा छोटा गुच्छ दिला. आशीर्वाद देताना म्हणाले, 'मी तुला ओळखलं नाही.' तेवढ्यात गटागटानं माणसं येतच होती. सगळ्यांचे आदरपूर्वक नमस्कार आणि त्यांना नानाचे प्रसन्न आशीर्वाद. येवढ्यात पं. महादेवशास्त्री सौभाग्यवतीसह आले नानांनी शास्त्रीबुवाना वाकून नमस्कार केला. शास्त्रीबुवा म्हणाले, 'आमचं कसलं मोठेपण ! वयाचं मोठेपण !' नाना म्हणाले, 'तसं नाही. हे मोठ्यांचं मोठेपण आहे !' लगेच कॅमेऱ्याची 'क्लिक' ऐकू आली. दिवसभर कॅमेरा नानांच्याच मागे. नानांच्या नाती सांगत होत्या, 'इकडे बघा नाना' आणि त्याला नानांचं उत्साही सहकार्य. तेव्हा आठवली मला नानांची 'बेडूकवाडी' 'चिमुताई घर बांधतात' आणि 'करवंदे.' नानांच्या पंचाहत्तरीच्या आनंदसोहळ्यात ते एकूण पूर्णपणे रमलेले वाटत होते. त्या गर्दीतसुद्धा म्हणाले, 'संध्याकाळी ये. म्हणजे थोडं बोलता येईल.'

तिथून 'साधने'त गेले. साधनेतलं वाता-वरणही त्या दिवशी प्रसन्न वाटलं. नुकतीच नानांच्या घरी जाऊन आल्यामुळं तसं वाटलं असेल कदाचित. तिथे यदुनाथ थत्ते भेटले. त्यांना विचारलं, 'नानासाहेब म्हटल्यावर कुठलं चित्र आठवतं ?' ते म्हणाले, 'पुण्यात सेवादलाच्या शाखेवर ते कबड्डी खेळायला यायचे तेच चित्र माझ्या डोळ्यासमोर आहे,

आपण कोणी विशेष आहोत असं त्यांना कधीच वाटलं नाही. पूर्वी नाना मला शुष्क बुद्धिवादी वाटत; पण गोवा मुक्ति आंदोलनानंतरचे नाना मला जास्त मधुर वाटतात. त्यानंतर त्यांच्या भावजीवनाला नवीन घुमारे फुटल्यासारखे वाटतात; पण तरीही थोडा खास कोकणीपणा त्यांचाच आहे.

यदुनाथजी बोलतच होते—नानासाहेबांच्या साहित्यातल्या किती तरी आठवणी त्यांनी सांगितल्या. हिंदळेगाव, आपली आळी, अमलापुरी, वस्ती नंबर ११ मधलं झोपडपट्टीचं चित्रण. त्यातला संयम आणि आविष्काराचं स्वातंत्र्य जपण्याचा त्यांचा प्रयत्न. त्यांचं उत्कृष्ट बालवाङ्मय. मुलांवर निरतिशय प्रेम असल्याशिवाय बालवाङ्मयाची निर्मिती होऊच शकत नाही. तसंच त्यांचं ललितसुंदर जीवन ज्याचा आविष्कार त्यांच्या प्रत्येक कृतीत आहे. नानांच्या लालित्यात वैचारिक बैठक आहे आणि त्यांचं वैचारिक लेखनही लालित्यपूर्ण आहे.

नानासाहे परखड बुद्धिवादी आहेत,त्यामुळे त्यांच्या जास्त जवळ जाता येत नाही, अशी तक्रार खूपजण करतात; पण ते तसे आहेत का ? विद्याधर पुंडलिक त्यांच्या एकसष्टी समारंभाची आठवण सांगत होते. तेव्हा नाना म्हणाले होते, 'मी सुमतीवर प्रेम केलेला माणूस आहे. एखाद्या स्त्रीवर प्रेम केलेला माणूस कोरडा असूच शकत नाही.'

नानांची राहणी साधी आहे. त्यांच्यात नेतृत्वाची ऐट नाही. मेयर असतानासुद्धा दुधाच्या रांगेत तेच उभे रहायचे, सदाशिवपेठेत सहज फेरफटका मारायचे,सहज म्हणून एखाद्या मित्राकडे सोल्याची उसळ खायला यायचे आणि, 'जीवनाच्या शेवटी हेच प्रसंग मनात रेंगाळतील' असं म्हणायचे.

नानांची रसिकता तरल आहे. एकदा ब्रेन ट्रस्टच्या कार्यक्रमात डॉक्टर आणि सामाजिक कार्यकर्ते 'स्त्रीच्या गालाला खळी का पडते ?' याची अभ्यासपूर्ण चर्चा करत होते. खळी का पडते ? कशी पडते ? नाना म्हणाले, 'प्रेमात पडायला जी खोल जागा लागते ती खळी !'

नाना सुरेख नखचित्रे काढतात, ते कुणालाच माहीत नाही. या सौंदर्यपूजक रसिकतेनं नानांना आजही सदाबहार ठेवलं आहे. राजकारणातदेखील सौंदर्य शोधून ते नेटकेपणाने करणारे नाना ! म्हणूनच ते स्पष्टपणे सांगू शकतात की, 'नैतिक अधःपतनाचा क्षण माझ्या आयुष्यात कधी आला नाही. माझे हात स्वच्छ आहेत.'

नानांची मुलगी शुभा तक्रार करत होती की, आमच्या वाट्याला नाना फारसे आलेच नाहीत. अजूनही येत नाहीत. नानांचं प्रेम हे गृहितच धरायला लागतं. त्या त्या प्रसंगी नानांना काय वाटतं हे आम्हालासुद्धा त्यांची पुस्तकं वाचल्यावरच कळायचं. म्हणजे ते काही कोरडे नाहीत. He is always a loving person !

नानांनी बोलावल्याप्रमाणे संध्याकाळी परत घरी गेले. सकाळच्या उत्साहाला थोडी तृप्तीची झालर लागली होती. नाना म्हणाले, 'आज वेगळं असं काही वाटलं नाही. अशा प्रसंगी हळवा होण्याइतका मी भाउक नाही.' पण सकाळी आणि आतासुद्धा नानांचा प्रसन्न, कृतकृत्य चेहरा मी कसा विसरेन ? आज नाना तृप्ती आणि तृष्णेच्या संगमबिंदूवर आहेत.

सकाळी गेले तेव्हा नाना म्हणाले की, मी तुला ओळखलं नाही. नानांच्या आणि माझ्या एकतर्फी ओळखीची सुरुवात त्या दिवसापासून झाली आहे हे नक्की !

—मेधा देशपांडे

---

मुक्काम मुंबई

## कचऱ्याची बादली आणि आळसटून पडलेले दोन झाडू

निष्काम कर्मयोगाची महती वगैरे गायली जाते खरी; पण फळाची अपेक्षा न धरता कर्म करणं हे म्हणजे तसं कठिणच कर्म आणि बहुधा न जमणारं. खरं म्हणजे कर्म न करता फळ मिळालं तर फारच उत्तम ! अशा परिस्थितीत केल्या कामाचं श्रेय आणि त्यासाठीचं पारितोषिक कोण नाकारील ?

पण असेही एक साक्षात महाभाग निघाले आहेत. नुकताच मुंबईत एक पारितोषिकवितरणसमारंभ झाला; पण हे पारितोषिक ज्याला द्यायचं त्यानं ते इतक्या नम्रपणे नाकारलं की, अखेर समारंभाला उपस्थित रहायचंच मुळी टाळलं ! कोण ही निरिच्छ वृत्ती !

'कचरा हटाव मुवमेंट' नामक एका संस्थेनं दिलेली ही ढाल होती आणि ती ढाल होती मुंबईतल्या सर्वात गलिच्छ वॉर्डसाठी ! १९८२ सालात ही प्रथमच देण्यात आली आहे. १९८१ साली पत्रकारपरिषद भरवून 'कचरा हटाव मुवमेंट'नं आपल्या या अभिनव स्पर्धेची माहिती दिली होती. एवढेच नव्हे, तर स्पर्धकांना या स्पर्धेत सामील व्हायचं आवाहनही केलं होतं ! अर्थात कुणीही स्पर्धक या स्पर्धेत सामील होण्यासाठी हिरीरीनं पुढं आला नाही किंवा कुणी तशा प्रकारचे फॉर्म्सदेखील भरून दिले नाहीत !

अर्थात असे फॉर्म्स भरून दिले नाहीत, तरी देखील सगळे वॉर्डस आपापल्या गलिच्छपणामुळे स्पर्धेत भाग घ्यायला पूर्णपणे पात्र ठरले होते. परीक्षक मंडळांनी मुंबईतल्या सर्वच्या सर्व म्हणजे एकवीस वॉर्डसची पाहणी केली आणि आपला निकाल दिला— 'या वर्षीच्या सर्वात गलिच्छ वॉर्डच्या बहुमानाला 'डॉल' वॉर्ड —कुर्ला वॉर्ड संपूर्णपणे पात्र आहे. तसे गलिच्छपणानं सारेच वॉर्ड डागळलेले आहेत; पण कुर्ला वॉर्डइतका संपूर्ण घाणेरडा वार्ड शोधूनही सापडणं कठिण !'

तेव्हा मग कुर्ला वॉर्डच्या संबंधित अधिकाऱ्यांना ही ढाल देण्याचा समारंभ झाला. समारंभ टाळून ही ढाल घ्यायचं त्यांनी नाकारलं; पण त्यामुळं काही बिघडत नाही. मुंबईतल्या ठिकठिकाणच्या अस्वच्छतेकडे ठळकपणे लक्ष वेधून घेण्याचा 'कचरा हटाव मुवमेंट'चा जो उद्देश होता, तो अगदी पूर्ण

सफल झाला आहे. मध्यभागी कचऱ्याची भरभरून वाहणारी बादली, तिच्या बाजूला दोन झाडू आळसटून निरुपयोगीपणे पडलेले असं चित्र या ढालीवर आहे. बाजूची छोटी पदकं, जिथे विजेत्यांची नावं घातली जातात तीही बादल्याच्या आकाराची आहेत. अशा पहिल्या पदकावर पहिलंवहिलं कुर्ला वॉर्डाचं नाव कोरलं गेलं !

'कचरा हटाव मुवमेंट' प्रत्यक्षात आली कशी ? संस्थेच्या अध्यक्षानी सांगितलं आम्ही काही मित्रमंडळी चार-पाच वर्षांपूर्वी फिरायला गेलो होतो. दिवस पावसाळ्याचे आणि वस्ती कुर्ल्याची झोपडपट्टी. नुकताच तुडुंब पाऊस पडून गेला होता आणि संपूर्ण झोपडपट्टीभर दोन-तीन फूट पाणी साठलं होतं. मुळातच असह्य घाणेरड्या असलेल्या त्या भागाची अधिकच दुर्दशा झाली होती. आधीच सखल भाग. वरून कोसळता पाऊस. तशात सांडपाण्याच्या निचऱ्याची गुतागुतीची आणि अकार्यक्षम व्यवस्था. हे पाणी वाहून वाहून जाणार कधी ? आणि पाणी वाहून गेल्यावरही ठिकणारी जमिनीची ओल कशी संपणार ? हे घाणेरडं पाणी आणखी कुठल्या-कुठल्या रोगाचे नजराणे देऊन जाणार ? झोपडपट्टी आणि मुंबईच्या बकाल वस्त्यांच्या स्वच्छतेचे प्रश्न, आरोग्याच्या चिंता एकदम ठळकपणे नजरेत भरल्या आणि त्यातूनच या 'कचरा हटाव मुवमेंट'चा जन्म झाला.

सर्वांत गलिच्छ वॉर्डला पारितोषिक देणं ही 'कचरा हटाव मूवमेंट'च्या बऱ्याच कार्यक्रमापैकी एक कार्यक्रम आहे. त्यांच्या आणखीही काही योजना आहेत. ७७ साली स्थापना झाली असली, तरी ८२ सालपासूनच संस्थेच्या कामाला खरी गती आली आहे. लायन्स क्लब आणि अशा प्रकारच्या संस्थाकडून त्यांना अर्थसहाय्य मिळतं; पण स्वच्छता मोहिमेसाठी पैशाची आवश्यकता आहे, तशी समाजशिक्षणाचीही आणि हेच काम 'कचरा हटाव मुवमेंट' प्रामुख्याने करते आहे भांडुप, बोरिवली, शिवडी, कुर्ला इत्यादी ठिकाणच्या झोपडपट्ट्या ही त्यांची मुख्य कार्यक्षेत्रं आहेत. शाळा सुरू करणं, मुलांना दूध इत्यादी सकस आहार पुरवणं इथपासून ते तुंबलेली गटारं साफ करणं इथपर्यंतची सर्व प्रकारची कामं 'कचरा हटाव' मुवमेंट हाताळते. नुकतीच त्यांनी कुर्ल्यांच्या झोपडपट्टीत 'स्वच्छ माझं घर' स्पर्धा आयोजित केली होती. लायन्स क्लबच्या सहकार्यानं काही भांड्यांचं वाटपही केलं होतं.

समारंभात बोलताना अध्यक्षांनी या विषयाच्या विविध पैलूंचा समाचार घेतला. मुंबई महापालिकेची सर्वांत स्वच्छ आणि सुंदर वॉर्डसाठी महापौर-ढाल असते; पण केवळ एवढ्यानं स्वच्छता हा मुद्दा संपुष्टात येत नाही, म्हणून हा अस्वच्छता ढालीचा प्रपंच. स्वच्छता ढालीच्या गोडी, गुलाबी आणि आमिषानी जे बदलत नाहीत, त्याना ताळ्यावर आणण्याचा, जागं करण्याचा हा एक प्रतीकात्मक प्रयत्न आहे. उपहास हाच मुळी इथे सरळ भावना व्यक्त करतो, त्याला काय करणार ? कुर्ला हा अस्वच्छ वॉर्ड असल्याचं दोन डॉक्टर आणि तीन सामाजिक कार्यकर्त्यांच्या परीक्षक मंडळानं जाहीर केलं आहे; पण इतरही वॉर्डमध्ये असलेली गुणवैशिष्टयं नजरेआड करून चालणार नाही. उदाहरणार्थ धारावीची झोपडपट्टी. भायखळा भाजीबाजाराची घाण. भायखळ्याच्या पॅलेस सिनेमाजवळच्या स्वच्छतागृहाला तर आरोग्याला शक्य तितकं मारक असल्याचं खास बक्षीस द्यायला हवं. म्हणजे मुंबईचा हा प्रातिनिधिक प्रश्न झाला. मुंबईची जवळपास निम्मी लोकसंख्या आज झोपडपट्टीतून रहाते आणि मानवी वास्तव्याला सर्वस्वी अयोग्य असं वातावरण आणि अपुऱ्या सुविधा या ठिकाणी असतात. या संदर्भात सरकारला आपली जबाबदारी टाळता येण्यासारखी नाही. २२४७० एकरांचं क्षेत्र जे राखून ठेवलेलं आहे, तिथे १० लाख गाळे बांधता येतील. मग सरकार या कामी दिरंगाई का करतं ? बोरिवलीच्या पश्चिमपाडा भागात कनिष्ठ मध्यमवर्ग आणि कनिष्ठवर्ग रहात असलेली मोठी झोपडपट्टी आहे. तिथे अक्षरशः कुठल्याच प्राथमिक सोयी उपलब्ध नाहीत. तिथल्या तीन हजार लोकानी मोर्चा नेऊन अशी मागणी केली की, आम्हाला गाळे बांधून द्या. त्यासाठी आम्हाला पैसे कर्जाऊ द्या आणि आम्ही ते हप्त्या-हप्त्यांनी फेडू; पण सरकारदरबारी त्याची काही वर्णी लागली नाही. गृहनिर्माण व्यवस्थांसाठी केन्द्रीय अंदाजपत्रकानं ५७० कोटी एवढी रक्कम राखून ठेवली आहे; पण आता ही गंगा इथपर्यंत कधी यायची ? 'यश आज नाही तर उद्या'वाल्या महाराष्ट्र-राज्य लॉटरीतून सरकारला नेट ५ कोटीचा नफा होतो. या सरकारी यशाला हातभार, लावणाऱ्या झोपडपट्टीत त्याचा काहीच का वाटा येऊ नये ? जागाचे भाव इतके कडाडताहेत की, मध्यमवर्गीयानादेखील जागा घेणं ही चैनीची बाब होऊन बसली आहे. तिथे कनिष्ठवर्गीयांची काय कथा ? समुद्र अधिक मागे हटवून अलिशान इमारती उभ्या राहतात, त्यांच्यासाठी सरकारी दयेचा पाझर वाहतो; पण गलिच्छ वस्त्या गलिच्छच राहतात. जगातली बेचिराख राष्ट्रंसुद्धा परत वर येऊ शकतात, पण दैन्य, दारिद्र्य, अस्वच्छता, बकालपणा, रोगराई या गाळात बुडालेल्या गरिबांच्या वस्त्या या दिवसेंदिवस अधिकाधिक गाळात रुतत जातात.

अस्वच्छतेच्या या प्रश्नाला राजकारण आहे, समाजकारण आहे आणि अर्थकारणही आहे. एका कारणाकडून आपण दुसऱ्या कारणाकडे आपोआप वळत जातो आणि प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनतो. महाराष्ट्राचे सध्याचे मुख्यमंत्री हे कुर्ल्याचे अर्थात् 'कचरा हटाव मुवमेंट'च्या असल्या औपरोधिक पारितोषिकावर त्यांनी हल्ला करावा हे आलंच. वॉर्डाच्या संबधित अधिकारीवर्गानं देखील ढाल घ्यायचं नाकारून या संदर्भातली आपली जबाबदारी नाकारली आहे, हेदेखील अपेक्षितच आहे. वॉर्डमधल्या अस्वच्छतेबद्दल केवळ काही मूठभर अधिकाऱ्यांना सर्वस्वी जबाबदार धरणं हेही शक्य नाही. ढाल जशी प्रतीकात्मक, तशी ती स्वीकारणेही प्रतीकात्मक, प्रतिनिधी.

कुर्ल्याची झोपडपट्टी ही मुख्य म्हणजे ऐतिहासिक आहे ! मुंबईतील ती सर्वांत जुनी झोपडपट्टी आहे वॉर्डाच्या स्वच्छतेसाठी, प्रसन्नतेसाठी उद्यानं, क्रीडांगणं यासारख्या गोष्टींचा समावेश वॉर्डाच्या नकाशात आहे की नाही ? अधिकृतरीत्या आहे मग त्यावर जी अनधिकृत बांधकामं आणि अतिक्रमणं होतात ती कशी काय चालू शकतात ? असा कोण शुक्राचार्य झारीत अडकला आहे ? या संदर्भात कुठल्या पातळीवरच्या आणि कोणत्या अधिकारपदस्थांचे किंवा बड्या धेंडांचे हात बरबटलेले आहेत ?

कुर्ल्याच्या गजबजत्या वॉर्डमधून त्याला नेमून दिलेला कराचा वाटा जातच असेल.

पृष्ठ ३० वर

## परराष्ट्र .....

# फॉकलंड

## दुसरा दिएगो गार्शिया होणार!

वा. दा. रानडे

अर्जेंटिनाच्या फौजांनी १५ जूनला शरणागती पत्करली व युद्धतहकुबी झाली. इंग्लंडने फॉकलंड बेटांवर पुन: ताबा मिळविला पण ७४ दिवस चाललेल्या या युद्धात इंग्लंडचे २२० सैनिक ठार झाले, सात जहाजे बुडाली किंवा नष्ट झाली. युद्धात इंग्लंडची नष्ट झालेली विमाने व जहाजे यांची हानी भरून काढण्यासाठी त्यास ६० कोटी पौंड खर्च येईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. अर्जेंटिनाचे ४३० सैनिक ठार किंवा जखमी झाले. याशिवाय गूज ग्रीनच्या लढाईत २५० अर्जेंटाइन सैनिक ठार झाले.

युद्धतहकुबी झाली असली तरी संघर्ष संपलेला नाही. आमच्या फक्त फॉकलंड बेटांवरच्या सैनिकांनी शरणागती स्वीकारली; पण आम्ही संघर्ष थांबविलेला नाही, असे अर्जेंटिनाने जाहीर केले आहे व यूनोस हस्तक्षेपाची विनंती केली आहे. शरणागती स्वीकारल्याचे निषेधार्थ अर्जेंटिनाची राजधानी ब्यूनोझायर्समध्ये मोठी निदर्शने झाली. अध्यक्ष गाल्टीएरी यांनी राजिनामा दिला. ब्रिटिशांनी फॉकलंड बेटे परत जिंकून घेतली खरी; पण ती आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी तेथे त्यांना कायम संरक्षणव्यवस्था करावी लागेल. व्हीसी–१० सारखी लांब पल्ल्याची विमाने, तसेच कोणत्याही हवेत हल्ला करू शकणारी फँटम फायटर–बाँबर विमाने यांना स्टॅन्ले विमानतळाचा उपयोग करता यावा यासाठी त्याची दुरुस्ती व सुधारणा करावी लागेल. विमानहल्ल्याच्या धोक्याला तोंड देण्यासाठी १२ ते १८ फँटम विमानांचा ताफा तेथे ठेवावा लागेल; पश्चिम फॉकलंडमध्ये आठ हजार फूट लांबीची आणखी एक धावपट्टी लष्करी विमानांच्या उपयोगासाठी बांधावी लागेल. तीन हजार सैनिकांची शिबंदी फॉकलंडमध्ये ठेवावी लागेल. त्यांना संरक्षण देण्यासाठी आणि बेटाभोवतालच्या भागात टेहळणीसाठी तीस हेलिकॉप्टर विमानांचा ताफाही तेथे ठेवावा लागेल. रडारयंत्रणेचे जाळे उभारावे लागेल. विमानहल्ल्याचा आगाऊ इशारा देणारी विमाने तेथे ठेवावी लागतील. समुद्रमार्गाने होणाऱ्या आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी अर्जेंटाइन समुद्रात एक किंवा दोन पाणबुड्या कायम ठेवाव्या लागतील. जादा सैनिक व लष्करी सामग्री तेथे ठेवायची नाही म्हटले तरी तीन हजार सैनिकांचे शिबंदीसाठी वर्षाला दहा कोटी पौंड खर्च येईल. पहिल्या वर्षी अधिक खर्च येईल. इंधन, वाहतूक, सुटे भाग यासाठी खर्चाची तरतूद करावी लागेल. याशिवाय सैनिक आणि लष्करी सामग्रीत थोडी वाढ करावी लागेल. अणुशक्तीवर चालणारी एक जादा पाणबुडी ठेवावी लागेल हे लक्षात घेता, एकूण संरक्षणखर्च येत्या पाच वर्षांसाठी वर्षाला ३० कोटी पौंड करावा लागेल. बेटे जिंकून घेण्यासाठी इंग्लंडला २०० कोटी पौंड खर्च करावा लागला व त्यानंतर एवढा खर्च करून केवळ प्रतिष्ठेसाठी ही बेटे ताब्यात ठेवायची का याचा विचार इंग्लंडला करावा लागेल.

फॉकलंड बेटांच्या सार्वभौमत्वाचा मूळ प्रश्न अनिर्णित आहे. बेटांवर आपले सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठी अर्जेंटिनाने एप्रिलमध्ये ती लष्करी बळावर ताब्यात घेतली आणि आता इंग्लंडने युद्ध करून लष्करी बळावर ती पुन्हा जिंकून घेतली! सार्वभौमत्वाचे निकष कोणते? लष्करी बळाने ते प्रस्थापित करणे कितपत योग्य हे प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होतात.

दक्षिण अटलांटिकमध्ये असलेली ४६१८ चौरस मैल क्षेत्रफळाची व अवघी दोन हजार वस्ती असलेली ही बेटे १८३३ पासून इंग्लंडच्या ताब्यात होती; पण अर्जेंटिना त्यावर दावा सांगत होते. आपल्या शिरगणतीत या बेटांवरील लोकसंख्येचा समावेश अर्जेंटिना नेहमी करीत आलेला आहे. त्याने या बेटांना 'मालविना' हे नाव दिले आहे. आम्हाला इंग्लंडशीच संबंध चालू ठेवायचे आहेत असा कौल तेथील रहिवाशांनी १९६४ मध्ये दिला. बेटावरच्या रहिवाशांची ब्रिटिश अधिकाऱ्यांनी हकालपट्टी केली आणि तेथे ब्रिटिश नागरिकच रहात असल्याने त्यांनी इंग्लंडच्या बाजूने कौल द्यावा हे स्वाभाविकच होते; पण अर्जेंटिनाने ते मान्य केले नाही. हा वाद दोन्ही देशांनी शांततेने मिटवावा अशी शिफारस संयुक्त राष्ट्र संघटनेने १९६५ मध्ये केली. १९७१ मध्ये दोन्ही देशांत एक करार झाला. अर्जेंटिना आणि फॉकलंड यांच्या दरम्यान नियमित हवाई व सागरी वाहतूक सुरू करावी, तसेच टपाल, तारा, टेलिफोन व दळणवळण, सोयी वाढवाव्यात असे या कराराने ठरलं. अर्जेंटिनाचे फॉकलंडवरील सार्वभौमत्व जरी इंग्लंडने मान्य केले नाही तरी हवाई, सागरी आणि टपाल, दळणवळणास मान्यता देऊन अर्जेंटिनाचे फॉकलंडशी असलेले विशेष संबंध इंग्लंडने मान्य केले.

मूळ रहिवासी आता बेटांवर नसल्याने बेटांवरील रहिवाशांचे मत अजमावून सार्वभौमत्वाचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग फॉकलंडच्या बाबतीत लागू पडत नाही. ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक, आर्थिक, व्यापारी अशा अनेक प्रकारच्या संबंधांचा विचार करूनच सार्वभौमत्व ठरवायला हवे. तसा विचार करता अर्जेंटिनाचाच फॉकलंडवरचा हक्क प्रस्थापित होतो. भारतालगतच्या समुद्रात असलेली अंदमान-निकोबार-लखदीव ही बेटे जशी भारताची तशीच फॉकलंडबेटे अर्जेंटिनाची. ब्रिटिशांनी तेथे वसाहत केली म्हणून ती ब्रिटनची होत नाहीत.

आता प्रश्न असा की, अर्जेंटिनाने आपले सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठी तेथे आपल्या फौजा पाठवून ती ताब्यात घेणे योग्य होते का? त्याने तसे केल्यामुळेच हे युद्ध उद्भवले. याबाबतीत गोव्याचे उदाहरण दिले जाते. त्याचा उल्लेख फॉकलंडसंबंधीच्या माझ्या पूर्वीच्या लेखात मी केलेला आहे. शांततेच्या मार्गाने गोव्याचा प्रश्न सुटत नाही हे स्पष्ट झाल्यावर शेवटचा मार्ग म्हणून भारताने गोव्यात लष्करी कारवाई केली. फॉकलंडचा प्रश्न त्या टप्प्याला आलेला नव्हता. वाटाघाटींचा मार्ग पूर्णपणे अवलंबिला गेलेला नव्हता. म्हणून अर्जेंटिनाने लष्करी कारवाईचा मार्ग अवलंबिणे योग्य नव्हते.

ब्रिटनने बेटे पुन: जिंकून घेतली. आता पुढे काय? प्रश्न एवढ्यावरच संपत नाही. आठ हजार मैल अंतरावरून या बेटांच्या संरक्षणाचा खर्च पेलणे ब्रिटनला फार काळ शक्य नाही. तेव्हा दिएगो गार्शियाच्या बाबतीत जशी व्यवस्था ब्रिटिशांनी केली तशीच ते फॉकलंड बेटांच्या बाबतीत करण्याची शक्यता आहे. दिएगो गार्शिया बेटे इंग्लंडने अमेरिकेला दिली तसेच फॉकलंडबेटांची व्यवस्थाही अमेरिकेकडे येण्याचा संभव आहे आणि ही बेटे दिएगो–गार्शियासारखाच दक्षिण अटलांटिकमध्ये अमेरिकेचाच मोठा तळ बनतील. दक्षिण ध्रुवप्रदेशाच्या शोधासाठी आणि नियंत्रणासाठी बड्या राष्ट्रात स्पर्धा सुरू होईल त्या वेळी या बेटांना महत्त्व येईल. सार्वभौमत्वाच्या तात्त्विक हक्कापेक्षा बड्या राष्ट्रांच्या राजकीय व आर्थिक हितसंबंधाच्या दृष्टिकोनातूनच या बेटांच्या भवितव्याचा प्रश्न सोडविला जाईल. अर्जेंटिनालाही या योजनेत सहभागी करण्यात येईल. □

## अवती भवती

शरद कृष्णन्

## □ पक्ष-यंत्रणा मजबूत करण्याचे प्रयत्न

अलिकडेच झालेल्या निवडणुकीमध्ये इंदिरा काँग्रेसला अपेक्षेप्रमाणे यश मिळू शकले नाही. पक्षाची निवडणुकीमधील कामगिरी समाधानकारक असल्याचे गोडवे जाहीररीत्या गायले जात असले तरी एकंदरीत जे मिळाले त्यापेक्षा जे गमवावे लागले त्याचेच पारडे जड असल्याने पक्ष-यंत्रणेला चालना देऊन संघटना मजबत करण्याचे इंदिराजींच्या मनात आहे. अलिकडेच त्यांनी अचानकपणे पक्षाच्या केंद्रीय कार्यालयास भेट दिली तेव्हा तेथे सर्वत्र सामसूम असलेले दिसले. पक्षाचे चिटणीस अथवा अन्य पदाधिकारी तेथे उपस्थित नव्हते. पक्षाचे काम जवळजवळ थंडावले असून कोणताही प्रश्न निर्माण झाला की, तो सोडवण्याची जबाबदारी केवळ इंदिराजींवर सोपवण्याची पक्षाची सध्याची प्रवृत्ती आहे. आता राष्ट्रपतिपदाची निवडणूक हाता-तोंडावर आली आहे. हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत इंदिरा काँग्रेसचा उमेदवार घोषित झालेला असेल; परंतु नेमकी कोणाची वर्णी लागेल याची पक्षामध्ये जबाबदारीचे पद भूषविणाऱ्या मंडळींनाही शेवटपर्यंत कल्पना देण्यात आलेली नाही. राज्याच्या मुख्यमंत्रिपदामध्ये बदल करायचे असतील तर ते इंदिराजी सुचवतील त्याप्रमाणेच केले जातात. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना त्याची कल्पना नसते. पक्षांतर्गत निवडणुका नावाचा प्रकार असतो याचेही जवळजवळ विस्मरण झाले असून राज्यपातळीवर आणि जिल्हा पातळीवरही पक्ष-यंत्रणा ही केवळ इंदिराजींच्या मर्जीने उभी राहिली आहे पक्षांतर्गत निवडणुका घेण्याची इंदिराजींना इच्छा आहे; परंतु पक्षामधील एका गटाला या निवडणुका नको आहेत. पक्ष-यंत्रणा कमकुवत असावी व सर्वोच्च नेता बलिष्ठ असला पाहिजे असेच या मंडळींना वाटते. कारण सर्वोच्च नेत्याची कृपा असेल तर आपले छान चालते असे या मंडळींना वाटते. परिणामी एके काळी प्रभावी असलेल्या ए. आय. सी. सी. व पार्लमेंटरी बोर्ड यांसारख्या यंत्रणा निष्प्रभ ठरल्या आहेत. पूर्वी वर्षातून दोनदा, किमान पक्षी एकदा तरी ए. आय. सी. सी.चे अधिवेशन भरत असे. अनेक जबाबदार कार्यकर्त्यांना अशा वेळी आपले मनोगत व्यक्त करता येत असे; परंतु सध्या पक्ष कार्यकर्त्यांना दुरावला आहे. पक्षामध्ये जबाबदारीचे पद भूषवणारी मंडळी इंदिराजींच्या कृपाप्रसादाने आपल्या जागी टिकून आहेत. त्यांची स्वतःची अशी ताकद नाही. त्यामुळेच या मंडळींना कार्यकर्त्यांचे मोहोळ आपल्या भोवती उभे करता येत नाही. अलिकडे झालेल्या निवडणुकीच्या वेळी खुद्द इंदिराजींनी प्रचार-मोहिमेमध्ये मोठ्या प्रमाणावर भाग घेतला. त्यांच्या झंझावाती दौऱ्यामुळे अनेक ठिकाणी इंदिरा काँग्रेसला अनुकूल असे वातावरण तयार झाले; परंतु पक्ष-यंत्रणा मजबूत नसल्याने आणि दुसऱ्या व तिसऱ्या स्तरावरील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह नसल्याने या अनुकूल वातावरणाचा मतदार खेचून आणण्याच्या दृष्टीने फारसा उपयोग झाला नाही. ठाणे लोकसभा पोटनिवडणुकीच्या संदर्भात मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी याबाबत सुस्पष्ट कबुली दिली. हरियाना, हिमाचल प्रदेश, प. बंगाल येथील विधानसभा निवडणुकीच्या वेळीही हे जाणवले. या निवडणुकीची प्रमुख सूत्रे राजीव गांधी संभाळत होते. तिकिटवाटपाबाबतचे अखेरचे निर्णय हे त्यांच्या संमतीनेच घेतले गेले. त्यांची कचेरी असलेल्या २ मोतीलाल नेहरू मार्ग या ठिकाणाहून श्री. अरुण नेहरू यांनी पक्षाची सूत्रे हलवली; परंतु राजीव गांधी आवश्यक ते वातावरण निर्माण करू शकले नाहीत. राजकारणाची दगदग त्यांना फारशी मानवण्यासारखी नाही. त्यांचे एकंदर वागणे कसे शाही राजपुत्रासारखे असते याचा तपशील त्यांची वहिनी मनेका गांधी यांनी अलिकडेच पुरवली. त्यांनी पुरवलेल्या माहितीप्रमाणे राजीव गांधींचा दिनक्रम सकाळी ९॥ च्या पुढे सुरू होतो. सकाळी ९॥ ते १२ पर्यंत ते त्यांच्या मूडप्रमाणे थोडेफार काम करतात. दुपारी १ ते ४ त्यांना विश्रांती लागते. या वेळात ते व्हिडिओ–फिल्मसद्वारा स्वतःचे मनोरंजन करून घेतात. आपल्या स्वतःच्या भाषणाच्या टेप्स ऐकून स्वतःवरच खूष होतात. स्वतः इंदिराजी अजूनही दिवसाचे १६–१७ तास काम करत असल्या तरी त्यांच्या या चिरंजिवांना कामाचा असा धबडगा मानवत नाही. राजीव गांधींना अलिकडील निवडणुकीच्या वेळी परिपूर्ण संधी देण्यात आली होती; परंतु ते आपला ठसा उमटवू शकले नाहीत. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण होऊ शकत नाही. निवडणूक–निकालाबाबत इंदिराजी कधी काही भाकित करत नाहीत; परंतु राजीव गांधींनी अनेक हास्यास्पद विधाने केली. प. बंगालमधील परिस्थितीची सर्वांना परिपूर्ण कल्पना असूनही प. बंगालमध्ये आपल्या पक्षाला निर्विवाद बहुमत मिळेल असे त्यांनी चांगले पाच–सात वेळा बोलून दाखवले. त्यांच्या या विधानाची टिंगल–टवाळी त्यांच्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून झाली. या निवडणुकीच्या वेळी राज्यस्तरावरील प्रबळ विरोधी गटांना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला. त्याच दृष्टीने मध्यप्रदेशात अर्जुनसिंग; विद्याचरण शुक्ला यांची दिलजमाई करण्यात आली. हरियानामध्ये भजनलाल व बन्सीलाल यांच्यामध्ये सुसंवादित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अर्थात या प्रयत्नांनाही अपेक्षित यश मिळू शकले नाही. खुद्द इंदिराजींची पक्षांतर्गत लोकप्रियता ही प्रामुख्याने त्यांच्या हाती असलेल्या अमर्याद सत्तेमुळे आणि जनमानसावर त्यांचा जो प्रभाव आहे त्यामुळे टिकून आहे. त्यांच्याकडून एकाला राजी करण्याच्या प्रयत्नात दुसरा नाराज होत असल्याने सारी पक्षयंत्रणा तशी पोखरलेली आहे. तसेच आंध्रप्रदेशामध्ये वेंकटराम आणि महा-

राष्ट्रामध्ये बाबासाहेब भोसले यांना ज्या पद्धतीने मुख्यमंत्रिपद बहाल करण्यात आले त्यामुळेही अनेक जबाबदार कार्यकर्ते नाराज झाले आहेत. मते खेचून आणण्याचे इंदिराजींचे सामर्थ्य झपाट्याने कमी होत आहे आणि पक्षयंत्रणाही दुर्बल झाली आहे. सर्व प्रयत्न करूनही राजीव गांधींचे नेतृत्व आकार घेऊ शकत नाही आणि अन्य काही राज्यांमधील निवडणुका तर तोंडावर आहेत. या साऱ्या परिस्थितीची इंदिराजींना जाणीव असल्याने मान टाकलेल्या आपल्या पक्षाची उभारणी करण्याच्या दृष्टीने त्या स्वतः प्रयत्नास लागलेल्या आहेत. पूर्वी पक्षयंत्रणा सुसंबद्ध असल्याने कार्यक्षम कार्यकर्त्यांना टप्प्याटप्प्याने प्रगती साधता येत असे. प्रत्यक्ष काम करून आपल्या कर्तृत्वावर मोठी झालेली माणसे काँग्रेस पक्षामध्ये पहावयास मिळत. आज अशी संधीच उपलब्ध होत नाही अशी तक्रार असून पक्षाचे कामकाज ज्या पद्धतीने चालवले जाते त्याबद्दल कार्यकर्ते नाराज आहेत. या नाराजीला प्रातिनिधिक स्वरूप आले अथवा पक्षाचे पदाधिकारी आणि सत्ताधारी यामध्ये संघर्ष निर्माण झाला तर केंद्रीय नेते हस्तक्षेप करून एक तर थातुर-मातुर तडजोड घडवून आणतात अथवा राज्यस्तरावर पक्षनेतृत्वात बदल करून मोकळे होतात. या अशा निर्णयामुळे कार्यकर्ते नाराज होतात. पक्षयंत्रणा शिथिल होते आणि स्वकर्तृत्वावर वाटचाल करण्याची संधीच उपलब्ध होत नाही. एके काळी अत्यंत सुसंघटित यंत्रणा असलेला हा बलदंड पक्ष सध्या विलक्षण निष्प्रभ झाला असून पूर्णपणे इंदिराजींच्या ताब्यात गेला आहे आणि आता त्याची पकड ढिली पडत असल्याने सत्ता राबवणाऱ्या आजही सर्वांत बलिष्ठ असलेल्या या पक्षाच्या भवितव्याबद्दल खुद्द इंदिराजींनाच चिंता वाटत आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांमधील मरगळ दूर व्हावी आणि पक्ष पुन्हा सुसंघटित व्हावा यासाठी इंदिराजी काही महत्त्वपूर्ण पावले उचलण्याचा संभव आहे. पक्षाचे अध्यक्षपद त्या आपल्या विश्वासामधील कोणाकडे तरी सुपूर्त करण्यास उत्सुक आहेत. अर्थात याबाबत प्रत्यक्ष कृती केव्हा होईल हे मात्र सांगता येत नाही.

## ☐ ऑल इंडिया रेडिओ.... 'आकाशवाणी'

माहिती आणि नभोवाणी मंत्रालयाची जी सल्लगार समिती आहे त्या समितीवर संसद सदस्य असतात. या समितीने केलेल्या अनेक शिफारशींपैकी एक शिफारस अशी होती की, ऑल इंडिया रेडिओ हा शब्द काढून टाकून त्याऐवजी आकाशवाणी या शब्दाचा वापर करावा. इंग्रजी बातम्यांच्या आधीही याच शब्दाचा वापर करून बातमीदाराने बातम्या द्याव्यात. हिंदी पुरस्कार समितीने हा निर्णय उचलून धरला. त्यात हिंदीचा आग्रह धरला जातो अशा हरियानामध्ये निवडणुका होणार होत्या. ऑल इंडिया रेडिओऐवजी आकाशवाणी या शब्दाचा वापर केला तर मतदारावर त्याचा अनुकूल परिणाम होईल असे वाटल्याने अगदी सहजगत्या हा बदल करण्यात आला. 'धिस इज आकाशवाणी' अशी घोषणा होऊ लागली. दोन-चार दिवस सारे सुरळीत झाले. दरम्यान माहिती आणि नभोवाणीमंत्री नामदार वसंत साठे आपल्या पूर्वनियोजित दौऱ्याप्रमाणे परदेशी रवाना झाले. इकडे दक्षिणदेशी राज्य करणारे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम्. जी. रामचंद्रन, राज्य न करणारे द्रविड मुन्नेत्र कळघमचे नेते करुणानिधी यांना हा बदल रुचला नाही. काही तरी भलतेच होते आहे अशी त्यांची धारणा झाली. कोणी तरी घोषणा केली की, हिंदीचा वाढता वापर व्हावा म्हणून धडपडणाऱ्या कोणा अतिरेक्यांकडून हिंदी लादण्याचा हा प्रयत्न आहे. हिंदी लादले असे म्हटले मात्र की, सारा तामिळनाडू खडबडून जागा होतो. त्याप्रमाणे बघता बघता या आकाशवाणी शब्दावरून वादळ उठले. पं. जवाहरलाल नेहरू यांनी दक्षिणात्यांवर हिंदी लादले जाणार नाही असे जे आश्वासन दिले होते त्याचा उघड उघड भंग होत असल्याचे बोलले जाऊ लागले. डीएम्‌केचे खासदार इंदिराजींना भेटले. सारे महत्त्वपूर्ण प्रश्न मागे पडून 'आकाशवाणी' शब्द हटाव यासाठी संघर्ष करण्याची भाषा बोलली जाऊ लागली. माहिती व नभोवाणी मंत्रालयामार्फत असे सांगण्यात आले की, ऑल इंडिया रेडिओ हा शब्द पूर्णपणे काढण्यात आलेला नाही. परदेशांसाठी असलेल्या एक्स्टर्नल सर्व्हिसेसमध्ये याच शब्दाचा वापर चालू आहे; पण या खुलाशाने मंडळीचे समाधान झाले नाही. माहिती व नभोवाणी मंत्रालयाचे उपमंत्री अरिफ महमद खान यांनी त्याच्या मद्रासभेटीच्या वेळी 'आकाशवाणी' या शब्दाचा उगम दक्षिणेतच असल्याचे सांगितले. ते म्हणाले, 'म्हैसूर संस्थानचे जे आकाशवाणी केंद्र होते ते या शब्दाचा वापर करत असे. एकदा हा बदल स्वीकारल्यावर आता पुन्हा त्यावर विचार करण्याचे कारण नाही.' अशा प्रकारे या प्रकरणात आपण जणू काही अखेरचा निर्णय देत आहोत असे भासवून मंत्रीमहोदय मद्रासहून दिल्लीला परतले आणि दिल्लीला आल्यावर त्यांनी जे पहिले बातमीपत्र ऐकले त्यामध्ये 'धिस इज ऑल इंडिया रेडिओ गिव्हिंग यू द न्यूज' हे घोषवाक्य होते. हा अचानक बदल कसा घडून आला याचा अचंबा खुद्द मंत्रीमहोदयांनाही वाटला असावा; पण त्याचे काय झाले की, या फडतूस गोष्टीचे कोलित हाती पडून दक्षिणेत उगाच आगडोंब उसळू नये म्हणून दस्तुरखुद्द इंदिराजींनीच माहिती आणि नभोवाणी मंत्रालयाला आदेश देऊन टाकला की 'आता आकाशवाणी पुरे. ऑल इंडिया रेडिओ चालू करा' आणि या आदेशाची लगोलग कार्यवाहीही झाली. वाईटपणा साठेसाहेबांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या वाट्याला आला आणि तामिळनाडूमध्ये जरा काव काव सुरू होताच त्यांना खूष करून इंदिराजींनी हा प्रश्न मिटवून टाकला. उगाच नाही अम्मा दक्षिणेत इतक्या लोकप्रिय आहेत ! ☐


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**


लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

मळका कुडता-पायजमा व पगडी परिधान केलेले धिप्पाड शरीरयष्टीचे ते दाढीधारी किसान पाहताना, त्यांच्या मुद्रेवरील भाव जोखताना मला निपाणीच्या बाजारात तंबाखूच्या पुडचा घेऊन धावाधाव करणारे वेगळ्या शरीरयष्टीचे नि वेषभाषामंडित शेतकरी जाणवू लागले. त्यात आमच्यापैकी कुणाला कपाशी उत्पादक दिसले असतील, कुणाला ऊस-उत्पादक तर कुणाला कांदा उत्पादक....



# शरद जोशींबरोबर ...पंजाबात

**लेखक : अरविंद वामन कुलकर्णी**

**लेखांक : पहिला**

अलिबागेहून प्रा. म्हात्रे आणि मी एक नवी कल्पना घेऊन २१ ता. ला पुण्याला आलो होतो. कल्पना होती शेतकरी–संघटनेचा प्रकाशनविभाग सुरू करण्याची. आंबेजोगाई आणि वर्धा येथील संघटनेच्या शिबिरांच्या ज्या टेप्स आम्ही ऐकल्या त्या खूपच परिणामकारक वाटल्या होत्या. याशिवाय श्री. शरद जोशी यांचे काही इंग्रजी लेखही हाताशी होते. इतरही साहित्य नजरेसमोर होते. या सर्वांचे प्रकाशन ग्रंथरूपाने केले तर शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व टीकाकार या सर्वांच्या दृष्टीने ते लाभदायक ठरेल असे वाटल्याने प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे आणि प्रा. सुरेश घाटे या दोघांनी टेप्स नकलविण्याचे किचकट काम जोमाने अलिबागेतच बहुतांशी पुरे केले होते. त्या वह्याही सोबतीला होत्या. श्री. शरद जोशी, भास्करराव बोरावके आणि माधवराव मोरे यांना मी पत्राने त्यासंबंधी कळविलेही होते; पण दूधआंदोलनाच्या तयारीत फार गुंतलेले असल्यामुळे यापैकी कुणालाही या कल्पनेकडे तातडीने लक्ष देण्यास सवड मिळाली नव्हती.

पुण्यास आल्यावर समजले की, जोशी सांगली भागाच्या दौऱ्यावर गेले आहेत; पण दुसऱ्याच दिवशी जोशी परत आले. आम्ही तिघेही मग चाकणनजीकच्या आंबेठाण येथील जोशींच्या शेतीवर गेलो. आमच्या कल्पनेवर बरीच चर्चाही झाली. परत आल्यावर योगायोगाने श्री. भास्करराव गांगुर्डेही आले. त्यांना ही कल्पना खूपच आवडलेली दिसली. मोठ्या पुस्तकांबरोबर कार्यकर्त्यांसाठी छोट्या छोट्या पुस्तिका प्रसिद्ध करण्याबाबत श्री. जोशींचा फार आग्रह होता. शेवटी ते कामही क्रमाक्रमाने करायचे ठरले. जूनमध्ये छपाई हाताशी घ्यायची असे ठरवीत असतानाच शरद जोशींनी मला एका वेगळ्याच गोष्टीत गुंतविले.

बोलता बोलता जोशी मला म्हणाले, ‘तुम्ही आमच्याबरोबर पंजाबला का येत नाही?’ पंजाबला ‘अखिल भारतीय किसान युनियन’चा मेळावा होता. खन्ना या गावी २८, २९, ३० मे रोजी बैठक व मेळावा आयोजित करण्यात आलेला होता. या आधी १९८० साली हैद्राबाद येथे प्रांतोप्रांतींचे किसान–नेते एकत्र आले होते. त्यांनी ही राजकारणनिरपेक्ष संघटना उभी केली होती. तामीळनाडूचे श्री. नारायणस्वामी नायडू हे अध्यक्ष, दिल्लीचे मेजर ईश्वर दयाळ त्यागी हे उपाध्यक्ष आणि पंजाबचे श्री. बलबीरसिंग राजेवाल हे जन. सेक्रेटरी म्हणून निवडले गेले होते. महाराष्ट्रात त्याच वेळी कांदा व ऊसआंदोलने चालू होती. त्यामुळे हैद्राबादला कुणी जाऊ शकले नव्हते. २३ एप्रिल रोजी धुळे येथे जो दूध–उत्पादकांचा मेळावा झाला, त्याला पंजाबातून श्री. बलबीरसिंग राजेवाल मुद्दाम आले होते. त्याच वेळी त्यांनी खन्ना येथील या मेळाव्याला हजर राहण्याचे निमंत्रण सर्वांना दिले होते. या मेळाव्यासाठी भारतातील प्रांतोप्रांतींच्या किसान–नेत्यांना अर्थातच निमंत्रणे देण्यात आलेली होती. (गंमत अशी की, श्री. नारायणस्वामी नायडू यांनी स्वतंत्र राजकीय पक्षात त्यांच्या किसानसंघाचे रूपांतर केल्याची वार्ता २४।२५ मे ला आली होती.)

मला व म्हात्र्यांना पंजाबच्या मेळाव्यासंबंधी सर्व ठाऊक होते;

पण तिकडे जाण्याचा आम्ही विचारही केला नव्हता. सुट्टीत त्या दृष्टीनेच आम्ही कामेही बेतली होती. शरद जोशीच्या या अनपेक्षित निमंत्रणामुळे आम्हाला भाबावल्यासारखेच झाले. मी काही उत्तरच दिले नाही; पण जोशी विनाउत्तर गप्प राहायला तयार नव्हते असे दिसले. शेवटी 'येईन' असे मी सांगितले आणि प्रथम कार्यक्रमाच्या तपशिलाचा कागद पाहायला मागितला. कार्यक्रम अगदी भरगच्च दिसला. खन्नाचे तीन दिवस झाल्यानतर ३१ ता. ला मानसा (जि. भतिंडा), १ जूनला नवा शहर (जि. जालंधर), २ जूनला फिरोजपूर, ३ जूनला गोविंदबालसाहिबा (जि. लुधियाना) अशा ठिकाणी मेळावे व सभा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. मला आकर्षित करणारी एक गोष्ट यात होती. ती म्हणजे ही सर्व ग्रामीण भागातील ठिकाणे होती, म्हणजे दिवसभर जो संबंध यायचा होता तो पंजाबातील त्या त्या भागाशी व किसानाशी यायचा होता. शहरात बसून ग्रामीण समस्याचे चिंतन होणार नव्हते. अपेक्षित श्रोतृवर्ग त्यामुळे शहरी असणार नव्हता. महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या प्रयेशी हे सारे मिळणारे–जुळणारे होते.

आणखी एक उत्तेजित करणारा कार्यक्रम पत्रिकेवरील विशेष म्हणजे खन्ना येथे २८, २९ व ३० ची सकाळ. या काळात फक्त 'घटने'वर चर्चा व्हायची होती. महाराष्ट्रात शेतकरी संघटनेच्या अशा लिखित 'घटने'बाबत सतत पृच्छाही केली जात होती. शेतकरी संघटना मौन पाळून होती. तेव्हा या सर्वच गोष्टींबद्दलचा ऊहापोह या बैठकीच्या निमित्ताने व्हायचा होता. तशी आलेली ही एक सधीच होती.

'नेसत्या कपड्यानिशी चला' असे जोशी म्हणाले असले तरी ते शक्य नव्हते. इतक्या लाबचा आणि दहाएक दिवसांच्या मुदतीचा प्रवास एकदम अंगावर कोसळलेला. तेव्हा जुजबी का होईना तयारी आवश्यक होती. ती केली आणि बुधवार दि. २६ मे रोजी संध्याकाळी पावणेसात वाजता पुणेस्टेशनवर हाजीर झालो. तिथे आमचे स्वागत पोलिसाकरवीच झाले. गुप्तचर खात्याचा एक अधिकारीही सोबत यायचा होता. (या खात्याच्या कार्यक्षमतेचे मात्र कौतुक करायला हवे. पंजाबातील भ्रमंतीत तर त्याचे डोळे आमच्यावर टेकलेले होतेच; पण २६ च्या संध्याकाळी 'जेहलम' मध्ये शिरताना हजर असलेले हे खाते ५ जूनला दुपारी ३॥ वाजता 'जेहलम'मधून उतरणाऱ्या आम्हा दोघांच्या स्वागताला पुणेस्टेशनवर हजर होते. बिचारे, दुपारी १२॥ पासून स्टेशनवर हजर असावेत. गाडीला झालेल्या उशीराचा त्रास आम्हालाच फक्त झाला नाही; या मंडळींनाही झाला तर !)

तिकिटाच्या रिझर्वेशनची काही गफलत झालेली होती. ती फार वेळ न लागता लवकर मिटली. दुसऱ्या वर्गाच्या शयनयानात आम्ही शिरलो, बर्थस् ताब्यात घेतल्या. मला मोठी गंमत वाटत होती. 'श्रीमंत शेतकऱ्यांचा कैवारी' म्हणून ज्याची प्रतिमा महाराष्ट्रात जाणीवपूर्वक घडविली जात होती असा हा शरद जोशी दोन्ही हात सामानात गुंतवून रेल्वेस्टेशनचे दादर चढून उतरून दुसऱ्या वर्गाच्या डब्यात शिरत होता! त्रासदायक गोष्ट म्हणजे पहिल्या वर्गाने प्रवास करण्यास पात्र असलेल्या गुप्तचर खात्याच्या अधिकाऱ्यास त्यामुळे दुसऱ्या वर्गाने प्रवास करावा लागणार होता !

## दौंड स्टेशनवर

ठीक साडेसातला 'जेहलम'ने पुणे सोडले. पहिला थाबा दौंडचा होता. तेव्हा एक गंमत झाली. मी आणि जोशी गप्पा मारत होतो. विषय अर्थातच शेती प्रश्नांशी निगडित होते. काही वेळाने माझे लक्ष समोरच्या बाजूला पुस्तक वाचत बसलेल्या एका तरुणाकडे गेले. तो अनिल अवचटाचे 'संभ्रम' वाचीत होता. मला एकदम त्याच्याविषयी कुतूहल वाटू लागले. दौंडला डब्यातील बरीच मंडळी उठली, त्यात तो तरुणही उठला. ते पाहून मी आमचे बोलणे मध्येच सोडले आणि त्याला गाठले. तो वाचीत असलेल्या पुस्तकाविषयी मुद्दाम चौकशी केली. आम्ही काही बोललो. त्यानेही आमची चौकशी केली. मी कुणाशी बोलत होतो या त्याच्या प्रश्नाला मी 'शरद जोशी' असे उत्तर देताच तो चमकला. त्याच्या शेजारच्या तरुणाने तर डब्यातून बाहेर पडणाऱ्या सर्वांना उद्देशून एक आरोळीच दिली, 'अरे, थांबा! या डब्यात शरद जोशी आहेत.' मग एकदम सारे परतले. जोशी शांत होते; पण मला चक्रावल्यासारखे झाले. ती मंडळी गेली आणि थोड्या वेळाने खिडकीशी बसलेल्या जोशींना कुणी तरी विचारले, 'या डब्यात शरद जोशी आहेत का हो?' सदरहू गृहस्थ व त्यांच्याबरोबरचे लोक प्रत्येक डब्यात ही चौकशी करीत आलेले दिसले. जोशींनी 'हो' असे उत्तर दिल्यावर ते आत शिरले. 'कुठे आहेत?' या त्याच्या प्रश्नाला मी जोशीकडे बोट दाखवून न बोलता उत्तर दिले. त्या गृहस्थांना काय सांगू काय नको असे झाले. त्या भागातील दरिद्री शेतकऱ्याला मार्गदर्शन करायला जोशींनी यायला हवे असा त्याचा आग्रह सुरू झाला. तिथली सर्व माहिती तो त्याना देऊ लागला. जोशींनी यायचे कबूल केले तेव्हा स्वारी स्थिरावली. नंतर रेल्वेचे टी. सी. कंडक्टर व पोलीसही येऊन जोशींना नमस्कार करून गेले. एक प्रौढ पोलीस सॅल्यूट करून सावकाशपणे म्हणाला, 'साहेब, आम्हीही शेतकऱ्याघरचेच आहोत!' गाडी एकदाची दौंडहून हलली. झाल्या प्रकाराबद्दल काही बोलणे शक्यच नव्हते. जोशी त्यांच्या नेहमीच्या स्टायलीत मंदपणे हसत होते. मला मात्र चोरट्यासारखे झाले !

मग आम्ही डबे सोडले. प्रत्येकाच्या पुढ्यात असलेला ढीग पाहून जोशी फक्त म्हणाले, 'मला वाटल्याप्रमाणेच झाले आहे. प्रत्येकाच्या घरच्यानी इतर रिकामे येणार या हिशेबाने डबे भरलेत!' जेवणे झाली नि आम्ही तिघानी तीन बर्थस् धरले. चौथा रिकामा होता तो भास्करराव बोरावके यांच्यासाठी. ते मनमाडला यायचे होते थोड्याच वेळात जोशी नि सकपाळ झोपले. मी मात्र जागाच होतो. १–१॥ च्या सुमारास मनमाड आले. मी मुद्दाम दारात जाऊन उभा राहिलो. भास्कररावाना हाक घालावी असा इरादा होता; पण आमच्या डब्याच्या दिशेने सरकणाऱ्या एका घोळक्यातून भास्कररावच ओरडले, 'अरे वा, कुलकर्णी, तुम्हीही आलात, छान!' मग पुन्हा गोधळाची एक लाट उसळली. भास्कररावाचा (आणि शेतकरी सघटनेचाही) उजवा हात असलेला बबन इथेही म्होरक्या होता. त्यानेच कोपरगावाहून भास्कररावांची बॅग भरून आणली होती. दुधाच्या प्रश्नासाठी भास्करराव व प्रल्हादराव कराड–पाटील ८-१० दिवसांपूर्वीच गुजरायेला गेले होते. तेथील काम पुरे करून पंधरा–वीस मिनिटांपूर्वीच भास्करराव एका गाडीने मनमाड स्टेशनवर उतरले

होते. बॅगेची फक्त अदलाबदल करून स्वारी पुन्हा आमच्याबरोबर पंजाबला निघाली होती. राष्ट्रसेवादलाच्या संस्कारात वाढलेले भास्करराव बोरावके ही शेतकरी संघटनेला लाभलेली फार मोठी देणगी आहे. संघटनेच्या दृष्टीने किती तरी जोखमीच्या गोष्टी ते स्वतंत्रपणे करतात. त्या विनाआवाज करणे हे भास्कररावांचे वैशिष्ट्य. कधी भाषणबाजी नाही, आग्रह नाही, रुसवा-फुगवा नाही की, रागसंताप नाही. आज शेतकरी सघटनेत त्यांच्याइतका अनाग्रही, शांत नि मनमिळाऊ माणूस कुणी असेलसे वाटत नाही. बाजूला राहणे आणि आपल्या सौम्य पद्धतीने सतत काम करणे हा त्याचा विशेष. लक्षात येण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांची हास्यानुकूलता हा माणूस एरवी गंभीर वाटतो; पण हसायला लागला म्हणजे उभ्या अंगाने हसतो. हसताना गडगडून मोठा आवाजही काढतो ! दूध आंदोलनाची जवळजवळ सर्व सूत्रे त्याच्या हाती आहेत. हे काम सुरू झाल्यापासून भास्करराव घरी किती वेळ असतात हा एक संशोधनाचाच विषय होईल शेतीबद्दलचे त्यांचे ज्ञानही मोठे नि प्रेमही मोठे. तसेच पशुपालनाबाबत नि फळबागाबाबत. शिवाय वृत्ती अनात्मकेंद्रित. नेहमीच झीज सोसून समाजसेवा करण्याच्या अव्यवहारी रोगाने पछाडलेली. तेव्हा भास्करराव आल्याने सर्वांना फार समाधान झाले. त्यातच केव्हा तरी झोप लागून गेली.

दुसऱ्या दिवशी रात्री नवाला दिल्लीला पोहोचेतोवर गप्पा आणि थर्मस अप्च्या जोरावरच आम्ही भडकत्या उन्हाला तोड देऊ शकलो. जोशींची चतुरस्रता त्यांच्याशी गप्पा मारताना सतत जाणवते. अनेक विषयांसंबंधी ते बोलत होते. त्यांच्या विचाराचा वेगळेपणाही त्यातून जाणवत होता. आम्हाला प्रथमच समजले की, अडचणींच्या रस्त्यावर लांबच्या मजला मारणारे ते ट्रेकर आहेत. स्वित्झर्लंडला असताना ट्रेकर्स क्लबचे ते सभासद होते. शनिवार व रविवारचे सुट्टीचे दिवस ते ट्रेकिंगमध्येही बऱ्याच वेळा घालवत. साडेचार हजार मीटर उंचीपर्यंतचा आल्प्स् पर्वताचा माथाही त्यांनी गाठलेला आहे. मराठी कवितांचे त्यांचे वाचन चांगले आहे सावरकर, कुसुमाग्रज हे त्याचे आवडते कवी. त्यांच्या किती तरी कविता त्यांना पाठ आहेत. एकूणच त्यांची स्मरणशक्ती चागली आहे. मोठमोठ्या ग्रंथांतील कोनाकोपऱ्यातील म्हणता येतील असे संदर्भ तपशिलासह ते अचूकपणे देतात. शेती या विषयावरील तर त्याचे ज्ञान तडाखेबंद आहे. एखादा दिवस त्यांच्या सहवासात काढला की, लक्षात येते या माणसाला कोणताही विषय वर्ज्य नाही. प्रवासात एकदा वसंत बापटांच्या 'दख्खन राणी' या कवितेचा त्यानी असाच उल्लेख केला. त्यातील चार-सहा ओळी प्रथम सांगितल्या. थोडे थांबले आणि नंतर मात्र जवळजवळ सारी कविता ठसक्यात म्हणून दाखविली !

## संघटनेचे नवे स्वरूप कसे असावे ?

शेतकरी संघटनेविषयी काही चर्चा निघणे अपरिहार्य होते. संघटनेच्या अभिप्रेत आराखड्याविषयी, केडरच्या स्वरूपाविषयी आणि कार्यकर्त्यांना देणे आवश्यक असलेल्या कार्यक्रमाविषयीचे प्रश्न आपोआप निघाले. सर्वांत महत्त्वाचा प्रश्न 'पुढे काय ?' हा होता. शेतकरी संघटनेचे अनेक कार्यकर्ते, हितचिंतक आणि विरोधक अशा सर्वांनाच जाणवणारे व त्यांच्याकडून विचारले जाणारे हे प्रश्न होते. ते निघाले की, जोशींचा चेहरा थोडा चिंतनमग्न होई. खांद्यावर घेतलेल्या फार मोठ्या जबाबदारीची सदैव त्यांच्या मनात वावरणारी जाणीव अशा वेळी एकदम पृष्ठभागावर आल्यासारखे होते. त्याचे यावर जे सागणे असे त्याचा सारांश असा सांगता येईल :- शेतकऱ्यांबद्दल सुरू केल्या गेलेल्या या चळवळीची ही प्रथमावस्था आहे. शेतीमालाच्या रास्त भावांचा प्रश्न ही या चळवळीची प्रेरणा आहे. त्या दृष्टीने आर्थिक हक्कासाठी शेतकऱ्यांना जागे करणे इतकेच मर्यादित कार्य कार्यकर्त्यांनी करावयाचे आहे. आज तरी भविष्यकाळापेक्षा वर्तमानकाळावरच संघटनेने जास्त करून लक्ष केंद्रित करायला हवे. संघटनेच्या अर्थविषयक विचारांचा जो प्रसार करील तो संघटनेचा कार्यकर्ता. पावतीपुस्तके, सभासदांच्या याद्या आणि कार्यकर्ते ते अध्यक्ष अशी रूढ पदाधिकाऱ्यांची उतरंड याची आज तरी जरुरी नाही. त्यांच्या योजनेमुळे नको त्या तणावांना निमंत्रण दिल्यासारखे होईल. वर्तमानकालावरील पक्कड ढिली होईल. आजवर संघटनेचे याविना अडलेले नाही. तिचा प्रसार चागलाच होतो आहे. गरजेनुसार आवश्यक ते रूप ती उद्या नक्कीच घेईल.

जोशींची ही भूमिका अनेकांना अमान्य आहे, याची त्यांना स्वतःलाही जाणीव आहे. तसेच रूढ विचाराच्या चौकटीत, हुकुमशाहीचा आरोपही येऊ शकेल इतपत कच्चे दुवे अशा दृष्टिकोणात आहेत, याचीही त्याना जाणीव आहे. इतकेच नव्हे तर सर्वांचे पूर्ण समाधान करील असे उत्तरही आपण देऊ शकत नाही याचीही त्यांना कल्पना आहे. दृष्टेपणाचा आव आणणे त्यांना जमणारे नाही. त्यामुळे स्वतःच्या अपुरेपणाचीही जाणीव आहे. **अर्थव्यवस्थेच्या एका रूढ पोलादी चौकटीला धक्का देण्याचे काम ते करीत आहेत.** लाखो लोकाची चळवळ त्याना आर्थिक पातळीवरून ढळू द्यायची नाही. त्याबाबतीत ते अतिशय सावध आहेत. अशा वेगळ्या भूमिकेवरून उभ्या केल्या जाणाऱ्या संघटनेचा साचा रूढ कल्पनेत बसणारा नसेल याची त्याना पक्की जाणीव आहे रूढ कल्पनेतील निर्जीव झालेल्या साच्यामुळे ते अस्वस्थ आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील साध्या गणेशोत्सव कमिटीपासून तो लोकसभेपर्यंतची या साच्याची रूपे म्हणजे काही मिळवू पाहणाऱ्या, 'धडपड्या' माणसाच्या स्वार्थपूर्तीची साधने बनलेली आहेत, वैयक्तिक महत्त्वाकाक्षापूर्तीपायी झगड्याचे आखाडे बनलेले आहेत, हे आता खरे तर सर्वांनाच पटलेले आहे. यामुळेच सहकाराचे स्वाहाकारात रूपातर होते, चार पदाधिकाऱ्याची चलती हेच साध्य बनते, तेव्हा असे साचे एका दृष्टीने कालबाह्य ठरू लागलेले आहेत, याचीही सर्वांना जाणीव आहे; पण तरीही शहाणेसुवर्ते लोकही अशा साच्यांचा सतत आग्रह धरतात हा संकेतशरणप्रवृत्तीचाच विजय म्हणण्याचा मोह होतो; पण सार्वजनिक कार्याबाबत लोकशाहीचा स्वीकार केलेल्या समाजात याची जागा घेईल अशा दुसऱ्या साच्याचा शोध अजून अज्ञात आहे, म्हणूनच रूढ साच्याचा आग्रह धरला जातो. शेतकरी संघटनेसारख्या नवे शक्तीकेंद्र बनणाऱ्या संस्थेला अंतर्गत निवडणुकांच्या आधारे आपली बटीक बनविणे हा निवडणूक-तंत्र-निपुण राजकारणी मंडळींचा सहज खेळ आहे, याची टीकाकारांना कल्पना नाही असे नाही; पण अशा साच्याच्या आग्रहाच्या शृंगापत्तीत स्वतःला अडकवून घेणे त्यांना नाईलाजानेच करावे लागते. मुळात जोशींची शेतीमालाच्या रास्त भावाची मागणी त्यांना

अपरिचित; अमान्य. तर्काच्या आधारावर त्याचे खंडन अशक्य झाल्याने आलेला संताप. अर्थकारणासह शेतकऱ्यांचा पाठिंबा जातो आहे म्हणून त्यात राजकारणीही सामील. मग साहजिकच छोटे शेतकरी–मोठे शेतकरी, शेतकरी–शेतमजूर, उत्पादक–ग्राहक, खेडे–शहर अशा प्रश्नाना दिला गेलेला जन्म.

या साऱ्या पृच्छाच्या मागे केवळ आकसच सर्वत्र आहे असे नाही. तसे शरद जोशींनी किंवा शेतकरी संघटनेने समजणे अतिशय घातक ठरेल सुदैवाने शरद जोशीना हे भान आहे. क्वचित् कधी ते टीकाकारांबद्दल उपहासाने बोलले असतीलही; पण तसे बोलणे तात्कालिकच होय. टीकाकाराची साऱ्याची अपेक्षा त्याच्या मनात सतत जागी आहे असे दिसते. प्रामाणिकपणे अशा एखाद्या उपयक्त साऱ्याचे रूप ते शोधताहेत. अजून ते गवसलेले नाही याची कबुलीही ते देतात; पण त्याविषयीच्या चर्चेच्या गर्तेत शेतकरी संघटनेचा गाडा आज रुतवायला ते तयार नाहीत. घाईगर्दीने एखादा साचा स्वीकारून चळवळीचे मातेरे करायची तर त्याची बिलकूल तयारी नाही. जोशींची ही भूमिका सर्वांना पटेलच असे नाही. (ती पटावी असा त्यांचा आग्रहही दिसत नाही.) जोशींशी बोलताना एक गोष्ट मात्र जाणवत होती, ती म्हणजे आज ते स्पष्ट करीत नसले तरी त्याच्या विचाराना काही तरी रोख गवसतो आहे.

प्रवासात विरंगुळा देणारा सर्वांत महत्त्वाचा विषय म्हणजे हिंदी भाषा हा होता. पंजाबात बातचीत करायची तर किमान हिंदी भाषा यायला हवी याची सर्वांना जाणीव होती; आणि नागपूरचे श्री विजय जावंधिया सोडले तर आमच्या ग्रुपमध्ये हिंदी बोलेल असा कुणीच नव्हता. कामचलाऊ हिंदी हेच सर्वांचे भांडवल होते. शरद जोशीना दिल्लीच्या वास्तव्यामुळे थोडा फार हिंदीचा मौखिक परिचय होता. युनोच्या नोकरीत असताना एका बैठकीत अस्खलित फ्रेंच भाषेत भाषण करून त्यांनी एकदा सर्वांना चकित केले होते ! पण या दौऱ्यात हिंदी भाषा कितपत हात देईल याबद्दल ते साशंक होते. तेव्हा असे ठरले की, गाडीत हिंदीतच बोलायचे. वाचायचे तेही हिंदीतच. म्हणून काही हिंदी मासिकेही विकत घेतली गेली; पण हा बेत काही तडीस गेला नाही. प्रारंभी आम्ही मराठीचाच बोलण्यासाठी वापर केला. पुढे भास्करराव आल्यावर हिंदीचा अवलंब करण्याची पुन्हा उबळ आली; पण भास्कररावानी अशी घेलकी चार दोन वाक्ये फेकली की जोशीसह सर्वांनाच एक कटू सत्य जाणवून गेले. हिंदीचा आग्रह असाच पुढे रेटला तर येते ते हिंदीही निश्चितच बिघडणार होते ! तेव्हा गाडीतला वेटर नि प्लॅटफॉर्मवरील विक्रेते यांच्याशी संवाद साधतानाच फक्त देशभाषा योजण्याचे तत्त्व अमलात आणले गेले !

भास्कररावांनी गुजराथेतून खूपच आशादायक वार्ता आणली होती. दलबदलू धोरणामुळे अलिकडे ज्याच्या समाचारावरील पकडीस ओहोटी लागलेली असली तरी राजकीय भूमिकेसाठी का होईना, किसानांना तिथे एकत्र आणणारा प्रभावी नेता चिमणभाई पटेल हाच होय ते प्रकृतिअस्वास्थ्याखातर बंगलोरला गेले होते. दुधाच्या प्रश्नाबाबत त्याचा उपयोगही झालाच तर एका मर्यादेपर्यंत होणार होता. कारण गुजराथेत ज्यांचा फार मोठा जोर आहे अशी पटेलमंडळीच प्रामुख्याने शेतीव्यवसायाशी संबंधित असली तरी तिकडे दुग्धव्यवसायाचा संसार पूर्णपणे अलग आहे. विक्रीसाठी का उपजीविकेचे एक साधन म्हणून पटेल दुधाकडे पाहात नाहीत. त्याचे दुग्धउत्पादन प्रामुख्याने घरगुती वापरासाठी असते. तिकडे दुधाचे उत्पादन गाई–म्हशीची खिल्लारे घेऊन जागा बदलत हिंडणारे अहीर वगैरे समाज करतात. आणंदसारख्या डेअरीला तेच दुधाचा पुरवठा करतात. मुंबईला येणारे दूधही त्याच्याकडूनच जमा केले जाते. गुजराथेतील दूधउत्पादकाच्या संघाचे अध्यक्ष श्री. मनुभाई शहा हे असून सर्वच समाजात त्याना चांगले वजन आहे. जनता पक्षाच्या बाबूभाई पटेल याच्या राजवटीत ते एक मंत्री होते. आजही या पक्षाचा एक ज्येष्ठ नि निरलस कार्यकर्ता म्हणून त्याचा लौकिक मोठा आहे. भास्कररावांनी व प्रल्हादराव कराड–पाटलानी त्यांची व बडोद्याच्या इतर काही कार्यकर्त्यांची भेट घेतली होती. महाराष्ट्रातील दूध–व्यवसायाची वस्तुस्थिती पुराव्याधारे त्यांना पटवून देण्यात शेतकरीसंघटनेच्या या दोन्ही शिलेदारानी विजय मिळविला होता. त्याचे उक्तीने आणि प्रसंग आला तर कृतीने पाठिंबा देण्याचे अभिवचन मिळवून हे दोघे परतले होते. महाराष्ट्राप्रमाणे गुजराथेतील किसान–चळवळीने शेतीमालाला रास्त भाव मिळविण्याच्या एक कलमी कार्यक्रमाचा स्वीकार करावा या जाणिवेचे बीजही या फेरीत पडले होते. दुधाबद्दलचे महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे, सर्व माहिती देणारे पत्रक पाहून ते नेते बरेच प्रभावित झाल्याचेही समजले. श्री. मनूभाई शहांना मराठी चांगले येते नि महाराष्ट्राबद्दल त्याना एकूणच जास्त रस आहे.

आमची गाडी रात्री ९ वाजता दिल्लीला पोहोचली. स्टेशनवरच श्री. विजय जावंधिया आणि श्रीकांत तराळ ही नागपूरहून खन्नाच्या अधिवेशनासाठी आलेली जोडी भेटली. जावंधिया तिशीतला तर श्रीकांत पंचविशीतला तरुण. दोघेही शेतकरी संघटनेचे विदर्भातले आघाडीचे कार्यकर्ते. श्रीकांत तर विशीत असतानाच १९७८ च्या चाकणच्या कांदा आंदोलनानिमित्ताने शरद जोशीकडे आकृष्ट झालेला. कापूस-उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरचे शेतकरी-संघटनेचे हे दोघेही खास सल्लागार. सरळ स्वभाव, जबर निष्ठा आणि कोणत्याही कामाला तयारी ही दोघांची समान वैशिष्ट्ये. दोघेही शास्त्रशाखेचे विद्यार्थी; पण सध्या शेतीचा व्यवसाय करणारे. त्यामुळे त्यातील खाचाखोचा दोघानाही ठाऊक. ताज्या दमाची ही तडफदार जोडी मिळाली आणि आमचा ग्रुप खऱ्या अर्थाने पूर्ण झाला.

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
–डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

## कांदा उत्पादक–गहू उत्पादक

भयंकर गर्दी आणि तिकिटांचा काहीसा गोंधळ यामुळे आम्हाला 'जेहलम' दिल्लीलाच सोडावी लागली. विजय जावंधियाच्या नेतृत्वाखाली मग आम्ही दिल्लीच्या त्या महाभयंकर आवाज करणाऱ्या उघडचा सहा सीटवाल्या रिक्षात बसून बसस्टँडवर आलो. अंबाला येथे जाणारी एक बस १०॥ वाजता घेतली आणि २ वाजता अपरात्री अंबाल्याला पोहोचलो. तिथे गेल्यावर समजले की, खन्नाला जायला पहाटे ४॥ शिवाय बस नाही. टॅक्सीची चौकशी केली; पण भाडे आम्हाला परवडणारे नव्हते. तेव्हा हिमाचल प्रदेशच्या फ्रूट स्टॉलवर सर्वांनी दोन दोन ग्लास सफरचंदाच्या रसाचे प्राशन केले. (उपयुक्त माहिती–ग्लासला एक रुपया पडतो !) आणि बस स्टँडवरच पथारी पसरली ! पहाटेच्या गाडीला विलक्षण गर्दी होती. विजयनं कशीबशी तिकिटे मिळविली. प्रवास उभ्याने करणे भाग होते. मला हे सारेच चमत्कारिक वाटत होते. जोशींची काळजी कार्यकर्त्यांनी घ्यायला हवी होती; पण ते तरी काय करणार बिचारे ? जोशींना मात्र याचे काही वाटत नव्हते. ते त्यांच्या नेहमीच्या मूडमध्येच होते. गाडीत आम्ही शेजारी उभे होतो. मला ते म्हणाले, 'आपण यापेक्षा बाल्कनीत बसू या.' बाल्कनी म्हणजे बसचे छप्पर. त्यावर बसून प्रवास करण्याची इकडची पद्धत आहे. मी त्याला जोराचा विरोध केला. मनोमन मात्र वाटत होते, वेळ आली तर हा आय. ए. एस. झालेला, परदेशात खूप मोठ्या हुद्द्यावर १०–१२ वर्षे काम केलेला आणि आता 'श्रीमंत' शेतकऱ्यांचा नेता म्हटला जाणारा शरद जोशी, विनातक्रार सेहगल किंवा पंकज मलिकचे एखादे गाणे गुणगुणत छपरावरूनही बसचा प्रवास करील !

खन्नाला सकाळी ६।–६॥ ला पोहोचलो. स्टँडवर अर्थातच कुणी नव्हते. त्यात प्रारंभी जी माणसे भेटली ती सारी पंजाबी जाणणारी. शेवटी विजयने हिंदी जाणणारा एक टॅक्सी–ड्रायव्हर धरून आणला. स्वारी अगदी वल्ली होती. किसान युनियनचे ऑफिस त्याला ठाऊक नव्हते; पण ते शोधण्याचा विश्वास जबरा होता. तसे सारीकडे किसान युनियनचे फलक व झेंडे लागलेले होते; पण ते सारे तीस तारखेच्या सभेचे होते. बराच वेळ शोधाशोधी करण्यात गेला. शेवटी जोशी त्याला म्हणाले, 'भाई, मेहेरबानी करो और हमे गेहूके मडी पर ले चलो.' 'तिथे काय करणार ?' असे पुटपुटत त्याने आम्हाला गव्हाच्या बाजाराच्या ठिकाणी नेले.

पंजाबचे पहिले खरे दर्शन आम्हाला तिथे झाले. एका मध्यवर्ती अशा एक मजली प्रशस्त इमारतीभोवतालच्या भल्या मोठ्या मैदानवजा आवारात पहावे तिकडे फक्त गहू आणि गव्हाची पोती दिसत होती. अनेक ट्रॅक्टर्स, त्यांना जोडलेल्या ट्रॉलीज, बैल–रेडे–घोडे जोडलेल्या गाड्या सर्व रस्त्यावर खड्या होत्या. प्रत्येकीत शिगोशीग भरलेली गव्हाची पोती होती. सारी वाहने आणि गहू जणू काही ठाणबद्ध झालेला. फक्त लगबग चाललेली होती ती तिथल्या नोकरवर्गाची आणि गहू आणणाऱ्या किसानाची. मळका कुर्ता–पायजमा व पगडी परिधान केलेले धिप्पाड शरीरयष्टीचे ते दाढीधारी किसान पाहताना, त्यांच्या मुद्रेवरील भाव जोखताना मला निपाणीच्या बाजारात तंबाकूच्या पुड्या घेऊन धावाधाव करणारे वेगळेच. शरीरयष्टीचे नि वेशभाषामंडित शेतकरी जाणवू लागले. त्यात आमच्यापकी कुणाला कपाशी–उत्पादक दिसले असतील, कुणाला ऊसउत्पादक तर कुणाला कांदाउत्पादक दिसले असतील. यातून जाणवून गेले ते एकच की, भारतात भिन्न भिन्न प्रांतांत जमीन, हवामान, पाण्यासारख्या साधनांची उपलब्धता यामुळे वेगवेगळी पिके घेतली जात असली तरी ती घेणारा शेतकरी बारकाईने पाहता एकच दिसतो. एकात्मकतेची जाणीव रुजवायला भर देता येईल असे हे केव्हढे तरी मोठे, व्यापक दालन आहे !

इथे आम्हाला त्या शेजारीच असलेल्या एका किसान युनियनच्या ऑफिसवजा इमारतीचा पत्ता लागला. तिथे आम्ही गेलो. कुणी नसल्यामुळे थांबावे लागले. थोड्या वेळाने एक वृद्ध गृहस्थ आले. कामावर असलेल्या काही लोकांशी बोलणी झाल्यावर ते आमच्या रोखाने धावले. त्याना जाणवलेला आनंद त्यांच्या डोळ्यांत दिसत होता. झालेल्या त्रासाबद्दल त्यांनी प्रथम आमची माफी मागितली. ते होते कर्तारसिंग बी. डी. ओ. च्या जागेवरून सेवानिवृत्त झाल्यामुळे त्याना सारेजण 'बीडीओसाहेब' म्हणत होते. त्यांच्याशी बोलताना समजले की, आदल्या रात्री तीन वाजेपर्यंत किसान युनियनच्या कार्यकर्त्यांनी आमची खन्ना रेल्वे–स्टेशनवर वाट पाहिली होती. तोवर त्यांची एक तुकडी बसस्टँडवरही उभी होती. शेवटी झोपेत आम्ही लुधियानाला गेलो असू, या कल्पनेने सारेजण घरी परतले होते. थोड्या वेळाने ते लुधियानाहून येणाऱ्या गाड्या पाहणार होते. हे सारे ऐकून, नाही म्हटले तरी आम्हा सर्वांचा अहंभाव थोडा सुखावला.

मेळाव्यासाठी येणाऱ्या प्रतिनिधींच्या निवासाची सोय त्यांनी काही शेतकरी–कुटुंबात केली होती. आमच्यासाठी मुक्रर केला गेला होता एक जीतसिंगनामक शेतकरी. तिथे आम्हाला नेण्यात आले. हा माणूसही रात्री तीनपर्यंत स्टेशनवर बसून परतलेला होता. तगडा जीतसिंग आणि त्याचे सारे कुटुंबिय भलतेच प्यारे लोक होते. तेहतीस एकराची शेती स्वारी करीत होती. एक मुलगा हाताशी शेतीत होता. त्याच्या घरी आमचे स्वागत अतिशय प्रेमाने झाले. त्याच्या फार्महाऊसवरच आम्ही उतरलो होतो तिथेच तो राहात होता. आंघोळी वगैरे उरकल्यावर आम्ही सारे छानपैकी श्रमपरिहार होऊन उत्तेजित झालो; महाराष्ट्रातल्या जेवणालाही ओलांडणारा जबरदस्त 'नाश्ता' झाला आणि चर्चेच्या पहिल्या सत्राला जायला आम्ही तयार झालो. या काळातील उल्लेखनीय गोष्ट एकच—माझी ओळख करून देताना शरद जोशींनी मला प्राध्यापक म्हटले होते. तेव्हा ती माणसे अवाक होऊन मला न्याहाळीत होती. काही गफलत होते आहे हे लक्षात घेऊन जेव्हा जोशींनी त्याचे प्रोफेसर असे शब्दांतर केले तेव्हा ते सारे खळाळून हसले. जीतसिंह आम्हाला म्हणाला, 'कुलकर्णी कोण आहे ते नेमके समजले हे बरे झाले. कारण आमच्याकडे प्राध्यापक हा शब्द कुंभार या अर्थी योजिला जातो !' आम्हीही मडकीच घडवितो वगैरे सांगायची मला उबळ आली होती; पण मी ती आवरली. सर्वजणांनी एकदा हसून घेतले आणि बाहेर उभ्या असलेल्या टॅक्सीच्या दिशेने प्रयाण केले. 'घटने'वरील चर्चा सुरू व्हायची होती. आमच्यासाठी सर्वजण थांबले होते. (क्रमशः)

पुढील लेखांक–'तत्त्वमंथन'

# कोण असेल ती बिचारी ?

फिरोझ रानडे

श्यामला ओमानला येऊन आता चांगले सात-आठ महिने झाले होते. कचेरीच्या व कामाच्या दृष्टीने तो चांगलाच 'ओमानला' होता. येथील कचेरीची वेळ सकाळी साडे-सात ते दुपारी दोन अशी होती.

गेल्या वीस–पंचवीस वर्षांच्या नोकरीत श्यामची कचेरी–वेळ साधारण ९॥ ते ५ अशी होती व त्यातून तो किंचित साहेब असल्यामुळे अर्धा–पाऊण तास उशिरा गेले तरी चालत असे. किंबहुना अधिकारी लोकाचा हा एक अलिखित अधिकारच आहे असे सर्व सरकारी खात्यात मानले जावयाचे. त्यामुळे हे भटजीबुवा ९–९॥ वाजता चांगले जेवून *खावून, सुपारी–तंबाखूचा बार भरून मग* कचेरीला जाण्याकरता निघत.

पण ओमानी पद्धत वेगळी होती· सर्व सरकारी कचेऱ्या सकाळी साडेसातला सुरू होत. येथे राजपत्रित अधिकारी असा वेगळा वर्ग नसल्यामुळे सर्वांना साडेसात म्हणजे अगदी साडे–सात वाजता हजर रहावे लागत असे. फार तर पाच–दहा मिनिटे उशीर खपवून घेतला जात असे. ह्यामुळे श्यामला सकाळी ६–६। वाजता तातडीने आंघोळ करून व घाईघाईने उपासमोड करून जावे लागत असे. कचेरीत चहा वा एखादे थंड पेय व सॅन्डविच ह्यापेक्षा जास्त काही खाण्या-पिण्याची सोय नव्हती. कचेरी सुटून घरी येईपर्यंत दोन–अडीच वाजत. भूक पण खूप लागत असे. मग जेवावयाचे व चांगली दोन–अडीच तास तण्णावून द्यावयची असा कार्य-क्रम सुरू झाला.

प्रथम–प्रथम ह्या वेळापत्रकाचा श्यामला फार जाच व्हावयाचा; पण जसे जसे दिवस जाऊ लागले तसे तसे त्याला ह्या पद्धतीतला फायदेपणा लक्षात येऊ लागला होता. हिंदु-स्थानात दुपारचे झोपावयाचे म्हणजे फक्त रविवारी, बँकांना सुट्टी असेल त्या दिवशी व 'बंद' असेल त्या त्या दिवशीच. आता येथे दुपारच्या झोपेची चंगळ होऊ लागली होती. श्यामचे जे काही मित्र खाजगी कंपन्यांमधून काम करीत त्यांना परत ४ वाजता कचेरीत जाऊन सात वाजेपर्यंत काम करावे लागत असे. आपली मित्रमंडळी काम करत आहेत व आपण मात्र चांगले दोन–अडीच तास झोपतो आहोत ह्या कल्पनेने त्याच्या दुग्ध-रूपी आनंदात ह्या कल्पनारूपी साखरेची भर पडून त्याचा आनंद काठोकाठ वाहू लागत असे! असेच वेळापत्रक हिंदुस्थान सरकार का नाही बरे आखत ? असाही प्रश्न *त्याला झोपी जाण्याच्या तयारी करण्याच्या* वेळी पडू लागला होता.

जसे हे सकाळी ७॥ वाजता कचेरीत जाणे व २॥ वाजता परत येणे प्रथम प्रथम अवघड वाटत होते तसेच आणखी काही गोष्टीचे पण अवघड व काही वेळा अपमाना-स्पद वाटत असे. सकाळी उठून खिडकीतून बाहेर पहावे तर कोणी केरळीय बांधव रस्त्यावरचा केर काढताना, पिंपातला केर गोळा करताना व तो मोठ्या गाड्यात भर-ताना दिसत असे. श्याम प्रथम आला त्या वेळी ओमान इतके स्वच्छ आहे हे बघून त्याला खूप आनंद झाला होता; पण नंतर हे स्वच्छ ठेव-ण्याचे, झाडू मारण्याचे काम हिंदी मंडळी करतात हे बघून त्याचा आनंद मावळला होता.

त्याचप्रमाणे सकाळी कचेरीत येत असताना कोणी सरदारजी गवत कापतो आहे, कोणी सरदारजी बागेला पाणी घालतो आहे हे बघून त्याचे मन खूप उदास होत असे. आम्हा हिंदी लोकांना किती खालच्या दर्जाची कामे करावी लागतात बरे ?

श्यामच्यासारखे कोणी बरा पगार मिळणारे हिंदी भेटले की, गप्पा मारताना ह्या कनिष्ठ काम करणाऱ्या हिंदी लोकांचा विषय निघत असे. कोणी तावातावाने म्हणत की, 'सरकारने म्हणजे हिंदी सरकारने कायद्याने अशा लोकाना येथे येण्यावर बंदी घालावयास पाहिजे व फक्त चांगल्या हुद्द्यावरच्या लोकांनाच येथे येऊ दिले पाहिजे. कारण असे कनिष्ठ काम करणारे लोक पाहिले म्हणजे खूप अपमानास्पद वाटते.'

'अहो, ह्या बिचाऱ्यांना हिंदुस्थानात नोकरी मिळता मिळत नाही. मिळाली तर पगार काय मिळतो ? त्यात चार तोंडे खाणार काय व बचत करणार काय ? त्यापेक्षा त्याचा कमीत कमी पगार–चार-पाच हजार रुपये असा पक्का करायला पाहिजे !' दुसरे कोणी बरा पगारवाले आपले मत मांडत.

'हिंदुस्थानात ह्या साल्याचे कसे नखरे चालतात ? तेथे रस्ता झाडणाऱ्यांना भंगी म्हणतात–अस्पृश्य समजतात व तीच स्पृश्य-मंडळी येथे अस्पृश्याचे काम करतात. ह्याचे साल्यांचे फोटो काढून हिंदुस्थानात पाठ-वले पाहिजेत त्यांच्या नातेवाइकाना !' *आणखी एक बरा पगारवाला; पण दुसऱ्या* जातीचा !

ही सगळी फक्त चर्चाच असल्यामुळे प्रत्येकजण आपले मत अगदी मोकळेपणे मांडत असे व काय करावे ह्याबद्दल मतभेद असला तरी हे सगळे प्रकरण फार अपमाना-स्पद आहे व त्यामुळे हिंदुस्थानच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचतो ह्याबद्दल सगळ्याचे एकमत होत असे.

आता असे अपमानास्पद प्रसंग येत, तसे आनंदाचे व अभिमानाचे पण प्रसंग येत असत. कोणा हिंदी बांधकाम करणाऱ्या संस्थेला कोणते मोठे काम मिळाले वा बुद्धिबळाच्या चढाओढीत कोणा हिंदी माण-साला पहिले बक्षीस वगैरे मिळाल्याचे वाचले म्हणजे उगाचच आनंदाचे भरते येई. त्यातून तो बक्षीस मिळवणारा मराठी असेल तर त्या उगाचचच्या आनंदात उगाचच भर पडत असे ह्या आनंदाला उगाचच म्हणण्याचे कारण असे की, ह्या बांधकाम मिळण्याने व कोणा मराठी माणसाला बक्षीस मिळण्याने वैयक्तिक असा काही लाभ नव्हता; पण आपल्या देशाच्या, आपली बोली बोलणाऱ्या

माणसाला काही सन्मान मिळाला की कसे बरे वाटते. जसे त्या झाडू मारणाऱ्या वा बागेला पाणी घालणाऱ्या हिंदी बांधवाना बघून उदास व्हावयास होत असे वा अपमानास्पद वाटत असे तसेच.

पण परवा जो प्रसंग कळला तो अपमानास्पद वाटण्याच्या पलीकडली जी स्थिती असते त्याच्यातला होता.

श्यामच्या समोरच्या टेबलावर एक पाकिस्तानी बसतो. एका सकाळी त्याच्याकडे एक सत्तर–पंचाहत्तर वर्षांचा, काळाभोर, डोळ्याने अधू असा एक ओमानी लंगडत लंगडत आला व त्या पाकिस्तान्याला एक उर्दूमध्ये पत्र लिहिण्याविषयी गळ घालू लागला. पत्र हिंदुस्थानात, महाराष्ट्रात मिरज ह्या गावी पाठवावयाचे होते.

त्या म्हाताऱ्या ओमानी माणसाने चार पाच महिन्यांपूर्वी मिरज येथे जाऊन एका वीस-बावीस वर्षांच्या मुलीशी लग्न केले होते. हे त्याचे कितवे लग्न होते कोणास ठाऊक; पण त्याची मुलगी अशीच वीस-पंचवीस वर्षांची होती. त्याला नातवंडे होती. हा काही मोठा श्रीमंत माणूस नव्हता तर साधा चपरासी व लग्नाकरिता त्याने लोकांकडून पैसे उसने घेतले होते म्हणे.

ओमानी नियमाप्रमाणे लग्नानंतर तावडतोब मुलीला आणता येत नाही. येथे आल्यावर लग्न झाल्याचे कळवावे लागते. मग व्हिसा मिळतो तो पाठवावयाचा. मग तिला येता येते. त्या मिरजच्या मुलीच्या भावाने पैसे पाठवण्याकरिता म्हणून पत्र लिहिले होते. कारण पैशाशिवाय पासपोर्ट बनणे वगैरे अवघड होते.

तो म्हातारा बायकोला आणण्याकरता खूप उतावळा झाला होता व त्या पाकिस्तान्याकडून 'मी पैशाची व्यवस्था करतो आहे; पण जितके लवकर येता येईल तेव्हढे ये' अशा अर्थाचे पत्र लिहवून घेत होता. पत्र लिहून झाले. पत्र लिहिण्याबाबत 'शुकरन–शुकरन' म्हणत तो म्हातारा लंगडत लंगडत निघून गेला.

आता अशा तऱ्हेचे ओमानी माणसाचे व हिंदी मुस्लिम मुलीचे लग्न हो काही अनहोनी गोष्ट राहिली नव्हती. सगळ्या गल्फ भागातले शेकडो अरब हिंदुस्थानात, हैद्राबाद वा मिरजला जाऊन लग्न करून येत असतात. अशी लग्ने होतात. आई-बाप आपल्या मुलींना अक्षरश: विकतात, हे श्यामने बऱ्याच वेळा वाचले होते. सरकारने त्याबाबत काही कदम उठवले आहेत. काही तरुण मुसलमान सुधारकांनी ह्याच्या विरुद्ध आवाज उठवल्याचे पण त्याच्या वाचनात आले होते. त्या वेळीसुद्धा त्याला खूप वाईट वाटले होते; पण आता हा काळा, डोळ्याने अधू, लंगडा माणूस हिंदुस्थानातून एका वीस–बावीस वर्षांच्या मुलीशी लग्न करून आलेला अगदी त्याच्या समोर उभा होता! ते बघून श्यामचे मन फारच विषण्ण झाले.

कोण असेल ती बिचारी? ह्या माणसात काय बघून त्यांनी आपली मुलगी दिली असेल? खरंच त्यांची मुलगी असेल की, कोणाची तरी पळवून आणलेली असेल? असे प्रश्न तर त्याच्या मनात आलेच; पण त्याबरोबरच हे सगळे हिंदी लोकांना, हिंदी मुस्लिमांना किती अपमानास्पद आहे नाही? असाही त्याच्या मनात विचार आला व तो फार अस्वस्थ झाला.

दुसऱ्या दिवशी श्याम व त्याच्याच कचेरीत काम करणारा एक बंगाली व एक मद्रासी आपसात बोलत असता ह्या म्हाताऱ्याच्या लग्नाचा विषय निघाला. हे सगळे प्रकरण मोठे अपमानास्पद आहे असेच सगळे म्हणाले; पण आपण ह्याबाबत काय करणार? असाही प्रश्न त्यांनी एकमेकाना विचारला; पण आपल्याला काय करावयाचे आहे त्याच्याशी? शेवटी तो मुस्लिमांचा प्रश्न आहे असेही सर्वांचे मत पडले.

खरंच आपण काय करणार? येथे ओमानमध्ये नाही तर अगदी हिंदुस्थानात तरी आपण काय केले आहे? अगदी गेल्या पिढीपर्यंत नवरा ४०–४५ वर्षांचा व बायको १३–१४ वर्षांची अशी स्थिती होती. तीसुद्धा महाराष्ट्र, बंगाल वगैरेसारख्या पुढारलेल्या प्रांतात. मग ओरिसा, बिहार, राजस्थान वगैरे प्रांताचे काय विचारावे?

'शारदा' नाटक अशाच विषयावर आहे ना? त्याला झाली असतील आता सत्तर–ऐंशी वर्षं. त्याच्याआधी अवघ्या दिडशे वर्षांपूर्वी अशीच चार–चार लग्ने करण्याची चाल होती व नवरामुलगा सत्तर–ऐंशी वर्षांचा व मुलगी दहा–बारा वर्षांची जेमतेम!

दोन–चार दिवसांनंतर श्यामने त्या पाकिस्तान्यांजवळ हा विषय काढला, 'का रे, हिंदुस्थानात ही मुस्लिमांची धार्मिक बाब आहे म्हणून सरकार काही करू शकत नाही; पण मग ह्यांनी पाकिस्तानात जाऊन लग्न केले तर काय होते? ह्याबद्दल काही सरकारी नियम आहे काय?'

'आमचेकडे सरकारी नियम वगैरे नाही; पण समाजात अशा लग्नाविरुद्ध असे काही जहाल लोकमत आहे की, कोणी आई–बाप वा मुली अशा तऱ्हेचे लग्न करायला धजतच नाहीत.' तो म्हणाला. आता खरं-खोटं देव जाणे; पण हे मात्र खरे की, हिंदुस्थानमधल्या हैद्राबादची वा मिरजची जशी 'ख्याती' आहे तशी पाकिस्तानातल्या कोणा गावाबद्दल नव्हती. 'आमची गोष्ट वेगळी व हिंदुस्थानातल्या मुस्लिमाची गोष्ट वेगळी' हे वर तो मोठ्या अभिमानाने म्हणाला.

अशाच धर्तीची गोष्ट त्याने इजिप्ती, सुदानी लोकांबरोबर काढली. ते लोक मोठ्या अभिमानाने सांगत होते, "आमच्या देशातली कोणीही मुलगी, कितीही गरीब असू दे 'ह्या' म्हणजे ओमानी लोकांशी लग्न करणार नाही!"


"अरे, पण हिंदुस्थानात लग्न करणाऱ्या मुली मुस्लिमच ना? त्याचे तुम्हांला काही वाटत नाही?" असा प्रश्न श्यामच्या मनात आला; पण तो प्रश्न विचारण्यात अर्थ नाही हे त्याला माहीत होते. हे इजिप्ती लोक स्वत:ला उच्च समजतात व हिंदुस्थानातल्या मुस्लिमांना तर 'खरे' मुसलमानच समजत नाहीत हे त्याला माहीत होते.

आता रहाता राहिले हिंदी मुसलमान. त्यांना ह्या साऱ्या गोष्टीचे काय वाटत असेल बरे? श्यामच्या कचेरीत कोणी हिंदी मुसलमान मोठ्या हुद्द्याच्या जागेवर नव्हता. जे कोणी होते ते ड्रायव्हर, वगैरे तऱ्हेचे होते व तेही आपल्या रत्नागिरी–मालवण वगैरे भागातले, शुद्ध कोकणी पद्धतीचे, मराठी बोलणारे!

श्यामचे त्यांचे चांगले जमत असे. एक तर त्यांच्याशी चक्क मराठीत बोलता येत असे व ते येथे बरेच वर्षे राहिले असल्यामुळे सर्वसामान्य ज्ञानाकरता त्यांचा उपयोग व्हावयाचा. कधीकधी श्याम त्यांना अडल्यानडल्याला मदत करत असे. त्यातला हमीम

पृष्ठ २५ वर

# लाल राज्यात सात दिवस



१९७७ मध्ये प्रथम मार्क्सवादी सरकार
प. बंगालमध्ये सत्तेवर आले.
१९७९ मध्ये ' माणूस 'ने खास प्रतिनिधी
पाठवून या सरकारच्या दोन वर्षांच्या
कामगिरीचा आढावा घेणारी
विस्तृत पुरवणी सादर केली.
त्या वर्षीच्या २ जूनच्या वर्षारंभ अंकात.
खास प्रतिनिधी – **छाया दातार**

आता मार्क्सवादी सत्ता प. बंगालमध्ये
चांगलीच स्थिरावलेली आहे.
तिची ही तेथे जाऊन केलेली वास्तपुस्त.
तिच्या ख्यालीखुशालीची ही चौकशी.
मार्क्सवाद्यांची पकड यापुढे अधिकाधिक
घट्ट होत जाणार की भावनाप्रधान
बंगालीबाबू नव्या स्वप्नांच्या, पर्यायांच्या
शोधाला निघणार ?
सध्या तरी मार्क्स आणि टागोर यांचे
तेथे छान सहअस्तित्व चालू आहे....

## वार्तापत्र पहिले । निखिल वागळे

उन्हाळयात एखाद दिवस आंघोळ केली नाही की अंगाचा नुसता चिकचिकाट होतो.

कलकत्त्याने तर गेल्या कित्येक वर्षांत आंघोळच केली नसावी !

शहरभर अस्ताव्यस्तपणे पसरलेला गजगजाट आणि जिथे शक्य होईल तिथे या गजगजाटाला धरून लोंबकळणारी माणसं.

हावडा स्टेशनवर उतरून प्रत्यक्ष शहरात प्रवेश करताना घडलेलं कलकत्त्याचं दर्शन हे असं होतं. पुढं आठवडाभर या शहरात हिंडताना या दृश्यात फरक पडला तो या गजगजाटाच्या थराची जाडी आणि राठपणा जाणवण्यापुरताच.

बाकी कलकत्त्याच्या रस्त्यांचं, गल्लीबोळांचं कौतुकच करायला हवं. विस्कळितपणा कसा अगदी तरबेजपणे अंगाखांद्यावर खेळवत असतात. मुळात रस्त्यांची रुंदी प्रशस्त या सदरात मोडणारी नाही. त्यात भुयारी रेल्वेमुळे अर्धा भाग उखडलेला. उरलेल्या अर्ध्या भागात शक्य तितक्या संथपणे खडखडाटत पुढे सरकणारी ट्राम, गर्दीने तिरप्या होऊ पहाणाऱ्या सरकारी बसेस, खाजगी मिनीबसेस, हातरिक्षा–सायकलरिक्षावाले आणि असे अनेकजण. या सगळ्यांना बंगाली सुस्तपणा जपत सामावून घ्यायचं ही निश्चितच खायची गोष्ट नव्हे !

बंगालीबाबूंच्या मात्र हे सारं रक्तातच भिनलं आहे. ' कि भालो ? आमार कलकत्ता...आमार दादादिदी...' इथपासून त्यांच्या कलकत्ताप्रेमाची टेप सुरू होते ती अगदी भुयारी रेल्वेसाठी खोदून ठेवलेल्या रस्त्यांकडे कौतुकभरला दृष्टिक्षेप टाकूनच संपते. या बाबूमोशायला खरोखरच या विस्कळितपणात काही गैर वाटत नाही. ' हे असंच चालायचं । याला पर्याय नाही !!' यासारखे मंत्र त्यांच्याकडून लहानपणीच घोकून घेतले जात असावेत. सकाळी नऊ वाजता ढीगभर

भात आणि गोड्या माशांची आमटी ओरपून घराबाहेर पडणारा असा टिपिकल बंगाली निरखणं यासारखं मनोरंजक काम नाही. बंगाली पद्धतीनं नेसलेलं शुभ्र धोतर आणि तेवढाच कडक स्टार्चचा सदरा घालून तब्येतीत पान चघळणाऱ्या या महाशयाकडे पाहून कुणीही बेधडकपणे सुस्तपणाची व्याख्या करावी. जास्तीत जास्त पंचवीस पैसे तिकीट असलेल्या आणि कमीत कमी कुठच्याही अंतरावर पोचायला सहज तासभर घेणाऱ्या ट्राममध्ये अगदी उभ्याउभ्यासुद्धा या बाबूची छान झोप होते. तोपर्यंत ऑफिसमध्ये पोचायला बारा वाजलेले असतात आणि सिझन जर फुटबॉलच्या सामन्यांचा असेल तर या बाबूला कुणी काम करायला सांगणं या इतका त्याच्या बंगालीपणाचा घोर अपमान नाही!

अगदी पूर्ण पाच वर्षं आणि आता पुन्हा एकदा, कम्युनिस्ट सत्तेखाली राहूनसुद्धा यात काही फरक नाही. 'दहा वर्षांपूर्वीचा नक्षलवादी थयथयाटही आम्ही पचवला, मग कम्युनिस्टांचं ते काय?' असाच सूर सध्या कलकत्त्याच्या गल्लीबोळातून ऐकू येतो. एक वेळ कम्युनिस्ट बदलतील; पण आम्ही आमचा वर्षानुवर्षं पोसलेला बंगालीपणा सोडणार नाही असंच जणू या बंगाली 'भद्रलोकांचं' म्हणणं आहे.

¤

—आणि अलिमुद्दिन स्ट्रीटवरच्या सी. पी. एम. च्या ऑफिसलाही याची पुरेपूर जाणीव असावी. आपण जास्त क्रांतिकारकपणा दाखवायला गेलो तर हा बंगाली 'भद्रलोक' आपल्याला भिरकावून द्यायलाही कमी करणार नाही हे त्यांनी ६७ आणि ६९ साली अनुभवलेलं आहे. त्यापेक्षा थोडंसं या बाबूंच्या कलाकलानं घेतलं, त्याचाच एक भाग बनून आपण राहिलो आणि बंगालीपणाच्या झेंड्याचा आधार घेत हळूहळू पाय रोवले तर अंतिमत: फायदाच आहे, हे या हुशार कॉम्रेड्सनी ओळखलं आहे. शिवाय एके काळी आणि अजूनही काही प्रमाणात कम्युनिस्ट असणं हे बंगाली मध्यमवर्गियांच्या फॅशनचाच एक भाग होतं, हेही ते विसरलेले नाहीत. 'आम्ही एका डाव्या राज्यात रहातो, हे राजकीयदृष्ट्या प्रगल्भ असं राज्य आहे' या विधानांनी सुशिक्षित बंगाल्यांना आजही गुदगुल्या होतात. अशा गुदगुल्या होत रहाणं कम्युनिस्टांच्या दृष्टीनं फायद्याचंच आहे. म्हणूनच मार्क्सवाद्याच्या यशाचं विश्लेषण करताना प्रमोद दासगुप्तांसारखा धूर्त पुढारी अक्षरश: पावलोपावली बंगाली माणसाला चुचकारतो, त्याचं कौतुक करतो. अगदी कलकत्त्यासारख्या शहरात पराभवाचा फटका बसूनही मार्क्सवादी नेता बंगाली मध्यमवर्गियांना दोष देत नाही ते यामुळेच.

या मर्यादांची जाणीव असल्यामुळेच की काय, अलिमुद्दिन स्ट्रीटवरचं हे अलिशान ऑफिस उभारताना कम्युनिस्टांना काही गैर वाटलं नसावं! उपलब्ध परिस्थितीचा पुरेपूर फायदा उठवायचा, मिळेल त्या साधनांचा वापर करून आपलं अंतिम लक्ष्य (नेमकं कोणतं?) गाठायचं ही कम्युनिस्टांची पूर्वापार दूरदृष्टी, याच दूरदृष्टीतून, सत्त्याहत्तर साली पहिल्यांदा सत्तेचं पाठबळ लाभताक्षणीच सी. पी. एम. च्या ऑफिसची ही नवी भव्य इमारत आकाराला आली आहे आणि हीच दूरदृष्टी त्याना सत्ता टिकवायला उपयोगी पडणार आहे. गेल्या पाच वर्षांतली ही पक्षाची कमाई आता पुन्हा निवडून आल्यावर अधिक जोमाने जोपासली जाईल, किंबहुना त्यात भर पडेल हे निश्चित!

अलिमुद्दिन स्ट्रीटचा हा भाग तसा बकालच म्हणायला हवा. एंटाली मार्केटच्या या परिसरात छोटे-मोठे वर्कशॉप्स, भंगारची दुकानं आहेत, तसेच पत्र्याचे ठेलेही अनेक. मार्केटच्या आसपासचा बहुतेक भाग फेरीवाल्यांनी अडवलेला. सहाजिकच गलिच्छपणा अपरिहार्य. त्यात फुटपाथवर फुटलेल्या पाइपच्या धारेत अनेकजण मनसोक्त नहात असलेले. गलिच्छपणात पाणी मिसळलं की एक वेगळाच रंग चढतो, याचा प्रत्यय जागोजागी येत होता. बहुसंख्या मुस्लिमांची थोडक्यात सांगायचं तर मुंबईच्या महमदअली रोडची ही पुनरावृत्ती. एखाद्या कम्युनिस्ट किंवा समाजवादी पक्षाचं ऑफिस असावं असाच हा भाग आहे याची जाणीव पावलोपावली होत होती.

अलिमुद्दिन स्ट्रीटवर दोनच मोठ्या इमारती आहेत एक मुलींच्या शाळेची आणि तिच्या बाजूलाच नवी कोरी, चकचकीत मार्क्सवाद्यांच्या ऑफिसची. नाक्यावरूनच इमारतीवर फडकणारा लाल बावटा दिसला नसता तर हे कम्युनिस्टाचं ऑफिस मानणं कठीणच होतं. एखाद्या खाजगी कंपनीच्या ऑफिसइतकीच टापटीप आणि नेटकेपणा या इमारतीत आहे. दारातच चार-पाच हातरिक्षावाले आशाळभूत नजरेने बसलेले. आपलं बैलासारखं जिणं कम्युनिस्ट राज्यात जाईल वगैरे खोटी आशा त्याना नक्कीच नसावी, तर सत्ताधाऱ्यांच्या या कोठीतलं एखादं गिऱ्हाईक आपल्याला मिळावं आणि आजच्या रात्रीच्या भाकरीचा प्रश्न सुटावा एवढाच त्यांच्या त्या इमारतीकडे डोळे लावून बसण्याचा माफक अर्थ असावा!

गेटवरच दरवानानं मला रोखलं. सकाळचा फोनचाही अनुभव फारसा उत्साहवर्धक नव्हता. 'मला प्रमोद दासगुप्तांशी बोलायचंय' असं सांगितल्यावर 'मी दासगुप्ताच बोलतोय' असं उत्तर मिळालं होतं. नंतर तो दुसराच कुणी दासगुप्त असल्याचं कळलं. त्यानं फोन आणखी दोघांकडे दिला; पण प्रमोद दासगुप्तांची अपॉइंटमेंट घेण्यासाठी कोणाला भेटायचं हे त्यांच्यापैकी कुणीच सागू शकलं नाही. एखाद्या सरकारी कचेरीत सहजपणे येऊ शकणारा हा अनुभव सी. पी. एम. कडून नक्कीच अपेक्षित नव्हता. म्हणून दरवानानं अडवलं तेव्हा आणखी कोणत्या नोकरशाही चक्रात अडकावं लागणार या चिंतेत होतो.

पण दरवानाच्या अजून सत्ता तेवढी अंगवळणी पडलेली नसावी. 'अनिल विश्वासना भेटायचंय' म्हटल्यावर त्यानं पटकन् आत सोडलं.

इमारतीच्या प्रशस्त पोर्चमध्ये तीन-चार नव्या कोऱ्या फियाट्स आणि दोन जीप्स उभ्या. गाड्यांच्या गर्दीत दडू पहाणारा मागं एक पुतळा. पुतळ्याला पार्श्वभूमी म्हणून तिरकस लावलेला लाल झेंडा. पक्षाचं निशाण नेमकं पुतळ्याच्या डोक्यामागं. देवादिकांच्या तसबिरीमध्ये डोक्याभोवती वलय असतं तसाच काहीसा लावणाऱ्याचा हेतू असावा. हा पुतळा कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक मुझफर अहमद यांचा असल्याचं नंतर कळलं. भारतात कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात कॉम्रेड डांग्याबरोबर याचाही समान वाटा होता असं मला सांगणाऱ्यानं आवर्जून सांगितलं!

इमारतीत शिरल्यावर डाव्या हाताला टेलिफोन ऑपरेटर्सची केबिन. प्रशस्त स्वागतकक्ष. तिथे तीन-चार जण बसल्या-बसल्या डुलक्या घेणारे. पक्षाचे जिल्ह्यातले कार्यकर्ते असावेत.

उजव्या हाताला पक्षाचं सायंदैनिक 'गणशक्ती' चं कार्यालय. मला ज्यांना भेटायचं होतं ते अनिल विश्वास इथेच वृत्तसंपादक होते. पक्षाचा सगळा जनतासंपर्क तेच बघतात.

'गणशक्ती'च्या कार्यालयात टेलिप्रिंटरची घडघड सोडली तर बाकी काहीच हालचाल नव्हती. तीन-चार डोकी खालमानेने कामात गढून गेलेली दिसत होती. हे या वृत्तपत्राचे सब-एडिटर्स असावेत, असा त्यांच्या एकूण कारकुनी आवेशावरून मी अंदाज बांधला आणि एकाच्या टेबलापुढं जाऊन उभा राहिलो. थोडा वेळ तो सद्गृहस्थ वर बघेल अशी वाट पाहून मग शक्य तितक्या नम्रपणे विचारले, 'अनिल विश्वास कुठे भेटतील ?'

'काय साली कटकट !' असा भाव चेहऱ्यावर आणून त्या महाशयांनी एका अर्ध्या पार्टिशनआडच्या रिकाम्या खुर्चीकडे बोट दाखवलं.

'कधी येतील?' मी माझी ओळख करून देत चिकाटी सोडली नाही.

यावर 'बाहेर वाट बघा' असं उत्तर मिळाल्यानं माझ्यासमोर स्वागतकक्षात येऊन बसण्यापेक्षा काही उपाय नव्हता.

तिथे मघाशी पेंगणारी माणसं अजून पेंगतच होती. त्यांपैकी एकाला मी 'तुम्ही पक्षाचे कार्यकर्ते का? कुठल्या जिल्ह्यातले ?' वगैरे विचारलं, तर त्यानं आपल्या शेजारी पेंगणाऱ्या एकाला उठवलं आणि 'यांना विचारा' असं सांगितलं.

'पोस्ट अॅण्ड टेलिग्राफ युनियन' त्यानं बहुधा झोपेतच उत्तर दिलं आणि पुन्हा तो पेंगू लागला.

आता माझ्यासमोर स्वस्थ बसण्याखेरीज दुसरा इलाज नव्हता. जरा आजूबाजूच्या भागात भटकावं तर दुपारचे ऐन तीन वाजलेले. अक्षरश: जाळणारं ऊन !

इतक्यात ऑफिसच्या पोर्चमध्ये एक निळी फियाट शिरली. माझ्या शेजारच्या माणसानं त्या पेंगणाऱ्यांना घाईघाईनं उठवलं. ऑफिसात इकडे-तिकडे फिरणारे लोक आपापल्या जागावर गेले.

'हे प्रमोददा' कठड्याचा आधार घेऊन वरच्या मजल्यावर जाणाऱ्या त्या म्हाताऱ्याकडे बोट दाखवत माझ्या बाजूचा तो पोस्ट अॅण्ड टेलिग्राफवाला कुजबुजला.

प्रमोद दासगुप्तांबद्दल मी बरंच ऐकलं होतं. ज्योती बसू मुख्यमंत्री असले तरी डाव्या आघाडीचे खरे किंगमेकर प्रमोददा. त्यांच्या धोरणीमुळं आणि रणनीतीमुळंच मार्क्सवाद्यांना आज हे दिवस दिसताहेत असं कलकत्त्यात अनेकजण सांगतात. अस्थम्याचा विकार जडलेला हा काळासावळा, आडव्या बांध्याचा म्हातारा प्रकृतीची पर्वा न करता पक्षाची धुरा वाहतोय. त्याच्याविषयी अनेक कथा सांगितल्या जातात. तत्त्वनिष्ठा एवढी की, ते म्हणे खादीच्या धोतर-सदऱ्याचे दोनच जोड बाळगतात, रात्री स्वत: धुऊन दुसऱ्या दिवशी वापरतात, असं मार्क्सवादी कार्यकर्ते कौतुकाने सांगतात. (अर्थात हा गांधीवादी मार्ग झाला ही कल्पनाही त्यांच्या मनाला शिवत नाही ही गोष्ट वेगळी !)

प्रमोददाची जरब विलक्षण असावी. त्यांच्या नुसत्या उपस्थितीनं सगळ्या ऑफिसनं आळस झटकल्याचं दिसत होत.

मंत्रिमंडळ बनवण्याच्या गडबडीत डाव्या आघाडीची मंडळी असल्याने प्रमोददांचा भेट काही आपल्याला आज मिळत नाही या हिशोबानं मी उठलो. जरा ऑफिस तरी बघावं म्हणून वरच्या मजल्यावर गेलो. भिंतीवर मार्क्स, लेनिन, स्टालिनपासून ज्योतिमय बसूंपर्यंत सर्वांचे फोटो. इथंही मुझफ्फर अहमद होतेच. अगदी फुलसाईज !

खोल्याखोल्यातून किरकोळ बांध्याची खादीधारी मंडळी दिसत होती. आपल्याकडच्या समाजवादी पक्षाच्या कचेरीची आठवण देणारं हे दृश्य.

इतक्यात एकानं मला हटकलं आणि खाली पाठवलं. एक किरकोळ बांध्याचा, बुटका आणि चाळीस सालच्या सिनेमा-हिरोप्रमाणे नॅरोबॉटम पॅंटमध्ये शर्ट खोचलेला माणूस माझ्याकडे त्रासिक नजरेनं पहात होता. त्याच्यासोबत मघाशी रिकाम्या खुर्चीकडे बोट दाखवणारा तो सद्गृहस्थ.

'हे अनिल विश्वास. त्यानं ओळख करून दिली.

मी माझ्या येण्याचं कारण सांगितलं. 'ठीक आहे, तुम्ही उद्या सकाळी नऊ वाजता या; पण परवानगीशिवाय असं आमच्या ऑफिसात फिरणं बरोबर नाही', त्यानं तेवढ्यात मला सुनावलं. मी प्रमोददाची वेळ मिळाली या आनंदात त्याकडे दुर्लक्ष केलं; पण प्रमोददाची मुलाखत ही काही तेवढी सोपी गोष्ट नाही, हे पुढं सतत चार दिवस मला कॉंग्रेसी मंत्र्याकडे घालावे लागतात तसेच हेलपाटे घालायला लागल्यावर समजलं.

---

## अँग्री ओल्ड मॅन !

कलकत्त्यातल्या सर्व राजकीय पक्षांमध्ये सध्या एक आणि एकमेव सारखेपणा दिसतो. तो म्हणजे प्रत्येक पक्षाच्या कार्यालयात दिसणारी म्हाताऱ्यांची गर्दी. पन्नाशीकडे झुकलेली किंवा त्याहीपलीकडे पोचलेली ही मंडळी एवढा कसला काथ्याकूट करतात कुणास ठाऊक; पण तासन्तास तळ ठोकून असतात. याचा अर्थ तरुण नाहीतच असा नाही; पण आहेत ते निबर झालेले आणि राजकारण धंदा म्हणून स्वीकारल्याचा भाव चेहऱ्यावर वागवणारे. ज्या दिवशी मंत्रिमंडळाची यादी जाहीर झाली त्या दिवशीच्या पत्रकारपरिषदेत डाव्या आघाडीचे अध्यक्ष प्रमोद दासगुप्ता खूपच कातावलेले होते. अगदी गलेलठ्ठ रसगुल्ले आणि गुलाबजामुन वाटल्यानतरही त्यांच्या तोंडाची चव बदललेली नसावी. पत्रकाराच्या प्रश्नांना ते उत्तर देत होते, तिरसटलेल्या स्वरातच. यावर 'आनंद बझार पत्रिके'च्या एक ज्येष्ठ पत्रकाराने मारलेला शेरा नोंदनीय आहे. तो म्हणाला, 'काय करणार बाबा ? हे सगळं ऐकून घ्यायला पाहिजे. सध्या कलकत्त्यात याच 'अँग्री ओल्ड मॅन'च राज्य आहे !'

खरं आहे, निदान कलकत्त्यातल्या राजकीय पक्षाच्या कचेऱ्यात तरी या अँग्री ओल्ड मॅनचीच सत्ता आहे. दहा वर्षांपूर्वी इथल्या गल्लीबोळांतून घुमसणारा अँग्री यंग मॅन सध्या फार तर सिनेमा थिएटरात सापडू शकेल ! *

---

सी. पी. एम. च्या ऑफिसमधून बाहेर पडेपर्यंत संध्याकाळ झाली होती. पोर्चमधल्या गाड्यांची संख्या आणखी वाढली होती. एक-दोघेजण मोठे गिफ्टबॉक्स घेऊन वरच्या मजल्यावर जात होते. स्वागतकक्षातही बरीच नवी माणसं दाखल झाली होती. टेलिफोन-ऑपरेटर्सची केबिन मात्र पाच वाजून गेल्यामुळं बंद झाली होती.

बाहेर आलो तर बाजूलाच पक्षाचं जुनं ऑफिस दिसलं. राखाडी रंगाची ही शेवजा इमारत नव्या ऑफिसच्या झोकापुढं अगदी काळवंडून गेलेली दिसत होती. सध्या तिथे 'गणशक्ती' चा प्रेस आहे; पण कागदाचे गठ्ठे घेऊन जाणारे तीन-चार कामगार सोडले तर तिथे फारशी हालचाल दिसत नव्हती.

परिसरातले लोक, ऑफिसशेजारचाच पानवाला किंवा मला नंतर बसस्टॉपवर भेटलेला अँनूल हुदा हा उर्दू शिक्षक याना मात्र मार्क्सवाद्याच्या या बदलत्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अजिबात काही वाटत नव्हत. 'सत्ता मिळाल्यावर हा बदल व्हायचाच' हे या मंडळींचं मत. 'सी. पी. एम. वाले काही साधुसंत नाहीत; पण कॉंग्रेसवाल्यासारखे गुंडगिरी तर करत नाही ना?' एवढाच त्या अँनूल हुदाचा माफक सवाल होता.

सी. पी. एम. च्या गेल्या पाच वर्षातल्या कारभाराकडे बघताना, त्यांच्यातल्या बदलाचं निरीक्षण करताना मलाही यापुढं हीच माफक अपेक्षा ठेवायला लागणार होती.

**या राज्यात सत्तेवर असलेले लोक कम्युनिस्ट आहेत यापेक्षा कम्युनिस्ट सत्ताधारी झालेत, ते कम्युनिस्ट आहेत यापेक्षा ते सत्ताधारी आहेत याचं भान बाळगणं भाग होतं.** अलिमुद्दिन स्ट्रीटवरच्या सी. पी. एम. च्या ऑफिसनं ही जाणीव पहिल्याच भेटीत दिली हे महत्त्वाचं.

□

सत्तेमुळं कम्युनिस्टाच्या व्यक्तिमत्त्वात बदल झाला हे जरी खरं असलं तरी गेल्या पाच वर्षांत त्यानी ज्या पद्धतीनं आणि परिश्रमानं सत्ता राबवली ती केवळ डाव्या चळवळीच्या दृष्टीनंच नव्हे तर विरोधी पक्षाच्या दृष्टीनेही मैलाचा दगड ठरावा. सत्त्याहत्तर साली जनता लाटेत (मुद्दामच बोलायचं तर इंदिरा-विरोधी लाटेत) हा पक्ष सत्ताधीश झाला. आता मात्र त्यानी स्वतःची हवाच नव्हे तर अगदी कसलेली जमीन तयार केली आहे. 'राज्यात आमच्या पक्षाचे सुमारे दहा हजार पूर्ण वेळ कार्यकर्ते आहेत' असं मला स्वतः प्रमोद दासगुप्तानी सांगितलं. गावागावातून या कार्यकर्त्यांचं जाळं विणलेलं आहे. राज्यातलं एकही खेडं असं नाही की, जिथं काय चाललय याचा अहवाल पक्षाच्या मध्यवर्ती ऑफिसला मिळत नाही. सरकारी निर्णय-प्रक्रियेतही नोकरशहापेक्षा या कार्यकर्त्यांना, त्याच्या अनुभवाना महत्त्व आहे. 'कार्यकर्त्यांचं ऐकून एखादी गोष्ट केली, तर कुणी काही म्हणणार तर नाही ना?' असा भोंगळ साधनशुचितावादी प्रश्न एकाही मार्क्सवाद्याला पडल्याचं मला दिसलं नाही. किंबहुना कार्यकर्त्यांवरचा विश्वासच मंत्र्याना आपले निर्णय ठामपणे राबवण्यासाठी उपयोगी पडतो. बरद्वान जिल्ह्यात घडलेली एक घटना या दृष्टीने बोलकी ठरावी. महसूलमंत्री विनयकृष्ण चौधरी राज्यातल्या खेड्यापाड्यातून दौरे करत असतात. चौधरींची रहाणी एवढी साधी आहे की, त्यांना मंत्री म्हणून वेगळं काढताच येणारं नाही. (डाव्या आघाडीच्या बहुसंख्य मंत्र्याबद्दल हेच म्हणता येईल.) चौधरी कोणत्याही गावात जातात तेही साध्या जीपमधून. बरद्वान जिल्ह्यात अशाच एका शेतमजुरांच्या बैठकीला ते गेले होते. मजुरांच्या गावच्या तलाठ्याबद्दल काही तक्रारी होत्या. त्यांनी त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना सांगितल्या. कार्यकर्त्यांनी म्हणूनच चौधरींना बैठकीला बोलावलं होतं. बैठकीत त्यानी सर्वांसमोर कार्यकर्त्यांची बाजू घेऊन तलाठ्याला झाडलं. दुसऱ्या दिवसापासून तलाठी सरळ. मजुरांमध्ये कार्यकर्त्यांचं वजनही वाढलं. पक्षाच्या पुढच्या कामाच्या दृष्टीनं हे महत्त्वाचं ठरतं. आज गावागावातून पक्षाचे कार्यकर्ते पाय रोवून आहेत त्याचं कारण हेच. सत्तेवर आल्यानंतर पक्षाच्या किसानसभेनंतर विक्रमी सदस्य नोंदवले आहेत. 'गावातले शेतमजूर, छोटे शेतकरी स्वत.च आम्हाला सदस्य करा म्हणून कार्यकर्त्यांकडे येतात. 'हे सरकार आपलं आहे' ही भावना सी. पी. एम. बद्दल ग्रामीण भागात आढळते. अन्यथा ४६ लाख १६ हजार ९६१ एवढी किसानसभेची सदस्यसंख्या होणं अशक्यच होतं.

ग्रामीण भागात आपण रुजलो तर सत्तेवरून आपल्याला हाकलणं कुणालाही शक्य होणार नाही हे ओळखल्यामुळेच की काय, सत्त्याहत्तर साली सत्तेवर आल्यावर ताबडतोब मार्क्सवाद्यानी ग्रामीण भागाकडे आपलं लक्ष केंद्रित केलं. त्याआधी पक्षाची पाळंमुळं प्रामुख्यानं शहरी भागात, विशेषतः मध्यमवर्गातच होती. पक्षाच्या नेत्यांपैकी बहुसंख्य उच्चवर्णीय आहेत याचं कारण तेच. हरेकृष्ण कोणार, अब्दुल्ला रसूल यांच्यासारख्या किसाननेत्यानी त्या वेळी शेतकरी-शेतमजुरात जायचा प्रयत्न केला होता; पण त्याला पक्षाकडून तेवढा प्रतिसाद मिळाला नव्हता. याचं एक कारण कोणार किंवा अब्दुल्ला रसुल याचं नेतृत्व उच्चवर्गातून आलेलं नव्हतं असही दिलं जातं! आजही इथल्या सी. पी. एम. मध्ये शहरी विरुद्ध ग्रामीण हा संघर्ष थोड्याफार प्रमाणावर अस्तित्वात आहेच. ज्योती बसूचं नेतृत्व लोकप्रिय असल तरी पक्षातल्या अनेक कार्यकर्त्यांना ते शहरी वाटत. स्वतः बसू इंग्लंडात शिक्षण झालेले. त्यामुळ बंगालीपेक्षा इंग्रजी त्याना जास्त जवळची. रोजच्या व्यवहारातही त्याचा अधिक भर इंग्रजीवरच असतो. नुकत्याच झालेल्या शपथविधीच्या वेळीही त्यानी इंग्रजीतूनच शपथ घेतली याचा पक्षातल्या एका गटाला विलक्षण राग आहे. बसूंच्याच मंत्रिमंडळातले एक मंत्री प्रभास राय या विचारसरणीचे मानले जातात. यदा पक्षांतर्गत निवडणुकांच्या वेळी त्यानी आपल्या चोवीस परगणा जिल्ह्यात छोटसं बंडच केलं. पक्षाने ठरवून दिलेल्या पॅनेलविरुद्ध त्यानी स्वत.चं पॅनेल उभं केलं आणि ते निवडूनही आलं. आज मार्क्सवादी नेते उघडपणे याला फारसं महत्त्व देत नसले तरी प्राप्त परिस्थितीच्या या रेटयाची त्याना पुरेपूर कल्पना आहे. ग्रामीण भागात पाय रोवताना तिथल्या नेतृत्वाचाही स्वीकार करायला हवा, नाही तर ग्रामीण कार्यकर्ते नाराज होतील, ही जाणीव किसानसभेचे अध्यक्ष शांतिमय घोष यानी मात्र स्पष्टपणे बोलून दाखवली. ही पक्षाची प्रगतीच आहे. आम्ही खऱ्या सर्वहारावर्गाकडे जात आहोत असं त्याचं म्हणण.

गावातल्या माणसाला आपलस करण्यासाठी मार्क्सवाद्यानी वापरलेले मार्ग मात्र नक्कीच मार्क्सवादाच्या ठरीव पोथीत बसणारे

नाहीत ! चक्क गांधीवादाचा हा अनुनय ठरावा. स्वत: मार्क्सवादी हे अर्थातच मान्य करत नाहीत; पण पंचायत राज्याची कल्पना गांधीची, ती मार्क्सवादात कुठे सांगितलीय, असं विचारल्यावर मात्र ते मौन धारण करतात. सत्याहत्तर साली सत्तेवर आल्यावर मार्क्सवाद्यांनी पहिली गोष्ट केली ती म्हणजे लगेच पुढच्या वर्षी पंचायतीच्या निवडणुका घेतल्या आणि पंचायतीचे अधिकार वाढवले. आज राज्यातल्या पंचायती बी. डी. ओ. पातळीवरचे निर्णयही घेऊ शकतात याचं कारण हेच. एवढी कृपादृष्टी केल्यावर पंचायती मार्क्सवाद्यांच्या ताब्यात राहल्या नसत्या तरच नवल. या पंचायतीच आज सी. पी. एम. च्या 'सुदृढ' सत्तेच्या रक्तवाहिन्या आहेत. 'ऑपरेशन बर्गा' सारखी योजना या पंचायतीमुळेच यशस्वी होऊ शकली आणि यंदाच्या निवडणुकीतल्या डाव्या आघाडीच्या यशाचं 'ऑपरेशन बर्गा' हे मुख्य कारण आहे.

वास्तविक कुळांची नोंदणी करायचा आणि जमीन कसणाऱ्या कुळाला पिकाचा अर्धा हिस्सा मिळाला पाहिजे हा कायदा मंजूर केला सिद्धार्थ शंकर रे याच्या कॉंग्रेसी मंत्रिमंडळाने; पण कॉंग्रेस नेहमीप्रमाणे आपल्या परंपरेला जागली आणि अंमलबजावणीची बोंब झाली. फक्त साडेतीन लाख कुळं नोंदली गेली. सी. पी. एम. ने मात्र गेल्या पाच वर्षांत गावोगावच्या आपल्या कार्यकर्त्यांच्या मदतीने ११ लाख कुळांची नोंद केली. एकूण पंचेचाळीस लाखांच्या घरात ही संख्या असावी असा अंदाज आहे. म्हणजे अजून अर्धअधिक कामही पुरं झालेलं नाही; पण मार्क्सवाद्यांच्या बाजूनं गावन्‌गाव उभं रहायला एवढं पुरेसं ठरलं.

या 'ऑपरेशन बर्गा'त गैरप्रकार झाले नाहीत असं नाही; पण फार थोडे. यापैकी सर्वांत गंभीर प्रकार बीरभूम जिल्ह्यातलाच असावा. इथल्या करीया गावच्या वीस कुटुंबांना ते कॉंग्रेसचे समर्थक आहेत म्हणून मार्क्सवाद्यांनी हुसकावलं. त्यांच्या जागी कुळं म्हणून स्वतःच्या कार्यकर्त्यांची नोंदणी केली. आणखी काही ठिकाणी असले असले प्रकार झाले आहेत असं विरोधी पक्ष सांगतात; पण तपशील मात्र काहीच देत नाहीत. सुरुवातीला करीया गावचा गैरप्रकार विरोधकांनी उघडकीस आणला तेव्हाही नेहमीच्या प्रचाराचा एक भाग म्हणून त्याकडे कुणी लक्ष दिलं नाही. यावरून विरोधकांची पत लक्षात यावी. करीया हे गाव तसं केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या गावाजवळचं. त्यामुळं इथल्या गैरप्रकाराला अगदी आधीच प्रसिद्धी मिळायला हवी होती; पण पत्रकार तिथे फिरकेनात, तेव्हा मुखर्जींच्यांच माणसांना भागलपूरची डोळेफोड बाहेर काढणाऱ्या एस. एन. एम. अबदीना घेऊन तिथं जावं लागलं. अबदींनी या गैरप्रकाराबद्दल लिहिलं खरं पण त्यामध्येही 'असे प्रकार अपवादात्मकच. 'ऑपरेशन बर्गा'चा एकूण परिणाम चांगलाच आहे' हे आवर्जून नमूद केलं.

सत्तेमुळं येणाऱ्या भ्रष्टपणापासून मार्क्सवादी पूर्णपणे दूर राहिलेत असं मात्र नाही. याबाबत एकच खात्री देता येईल की बहुसंख्य मंत्री वैयक्तिकरीत्या स्वच्छ असले तरी पक्षासाठी पैसा घेण्यात काही गैर आहे असं मानलं जात नाही. याबाबत एका व्यापाऱ्याची प्रतिक्रिया मजेदार होती. तो म्हणाला, 'कॉंग्रेसच्या राज्यातल्या भ्रष्टाचाराला काही निर्बंध नव्हते. एकाला पैसे दिले तर दुसरा हजर. पुन्हा काम होईलच याची खात्री नाही. सी. पी. एम. च्या राज्यात तसं नाही. पैसे कुणाला द्यायचे हे नेमकं ठरलेलं असतं. कामही निश्चितपणे होतं. दहा वेळा हेलपाटे घालावे लागत नाहीत. करप्शनसुद्धा कसं ऑर्गनाईज्ड आणि केडर बेस्ड आहे!'

बहुधा हीच वृत्ती कलकत्त्यातल्या उद्योगपतींची असावी. सदुसष्ट किंवा एकोणसत्तर साली सी. पी. एम. इथे सत्तेवर आली तेव्हा ही मंडळी वचकूनच होती. मार्क्सवाद्यांचेही ते त्या वेळी शत्रू नंबर एक होते. घेराव, टाळेबंदी, संप या तंत्रांचा जागोजागी वापर होत होता. सहाजिकच कधी एकदा ही लाल पीडा जाईल असं या मंडळींना वाटलं असलं तर नवल नाही. सत्याहत्तर सालच्या जनता लाटेतही त्यांनी

---

## पुढचं पाऊल

गेल्या पाच वर्षांतलं मार्क्सवाद्यांचं सर्वांत मोठं काम म्हणजे कुळांना दिलेले अधिकार आणि किमान वेतन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेले प्रयत्न. पुढच्या पाच वर्षांत त्यापुढे जायचा डाव्या आघाडीचा मनसुबा आहे. खरं तर वर्षापूर्वीच त्यांनी यासाठी प्रयत्न सुरू केलेत; पण राष्ट्रपतींच्या परवानगीसाठी घोडं अडलं आहे.

देशातल्या इतर राज्यांप्रमाणे कमाल जमीन धारणा कायदा बंगालमध्येही लागू असला तरी पळवाटाही अनेक आहेत. सध्याच्या कायद्याखाली फक्त वहिवाटीखालची जमीन येते. सहाजिकच अनेक जमीनदार हजारो एकर जमीन गायरानाखाली दाखवून आपल्या ताब्यात ठेवतात. हे लक्षात आल्यावर पश्चिम बंगाल विधानसभेने गेल्या वर्षी एक दुरुस्ती मंजूर केली. त्यानुसार सर्व तऱ्हेच्या जमिनीला कमाल जमीन धारणा कायदा लागू होईल. या दुरुस्तीची अंमलबजावणी झाली तर राज्यात एकाही व्यक्तीकडे जमीन रहाणार नाही असा मार्क्सवाद्यांचा दावा आहे.

गेलं वर्षभर ही दुरुस्ती राष्ट्रपतींच्या सहीसाठी पडून आहे. वास्तविक पश्चिम बंगाल विधानसभेतल्या इंदिरावाल्यांनीही याला पाठिंबा दिला होता; पण दुसरीकडे मंजुरी मिळू नये म्हणून ते प्रयत्न करताहेत. या वेळच्या निवडणुकीनंतर या प्रयत्नांना जोरच येईल. कारण शेतमजूर, छोटे शेतकरी यांची शक्ती लाल बावट्याखाली एकवटलीय तर प्रतिक्रिया म्हणून श्रीमंत शेतकरी, जमीनदार कॉंग्रेसची गुंडगिरी पोसताहेत. नवीन दुरुस्ती जर मंजूर झाली तर या मंडळींचे हितसंबंध पार धुळीला जातीलच; पण मार्क्सवाद्यांची पाळंमुळं अधिक पक्की होतील याच भीतीने राज्यातले इंदिरावाले सध्या दिल्लीवाल्या बाईंकडं डोळे लावून बसलेत. *

---

मार्क्सवादी सत्तेवर येऊ नयेत म्हणून शक्य ते सर्व प्रयत्न केले. जनता पक्षाची मार्क्सवाद्याबरोबर युती होऊ नये म्हणून हे उद्योगपती सतत दक्ष होते. त्यासाठी चंद्रभानू गुप्ता, पी. सी. सेन या जनता नेत्यांच्या पदरात लाखो रुपये घालायलाही त्यानी कमी केलं नाही; पण अखेर मार्क्सवादी जिंकलेच! उद्योगपतीनाही त्यांच्याशी जमवून घेण्याशिवाय पर्याय नव्हता. मात्र या वेळचा मार्क्सवाद्याचा त्यांना आलेला अनुभव अक्षरशः सुखद होता. एकाही उद्योगात मार्क्सवाद्यांनी भांडण उकरून काढलं नाही. अनेक ठिकाणी सिटू प्रबळ होतीच. सिटूवाल्यांना खूष ठेवलं की काम भागू लागलं. काँग्रेसच्या राज्यात नाना तऱ्हेचे युनियनवाले हप्त्यासाठी सतावत. इथे तोही प्रकार राहिला नाही. सिटूवाल्यांनी कुठेही कामगार चळवळीला उग्र स्वरूप घेऊ दिलं नाही. कम्युनिस्ट राज्यात भांडवलदार गुण्यागोविंदानं नांदल्याची ही पहिलीच वेळ. मुख्यमंत्री ज्योती बसूंनी तर याही पुढे जाऊन बहुराष्ट्रीय कंपन्यांना आमंत्रण दिलं. हिंदुस्थान लिव्हरच्या नव्या कारखान्याच्या पायाभरणीसाठी ते स्वतः हजर राहिले. सहाजिकच यंदाच्या निवडणुकीत व्यापारी–उद्योगपतीनी मार्क्सवाद्याना मुक्तहस्ते मदत केली असली तर नवल नाही. ही मदत घेण्याइतके मार्क्सवाद्यांनी चढवलेल्या या सत्तेच्या पेहरावाचे खिसेही सहिष्णु होते हे विशेष !

सत्ता मिळाल्यावर मार्क्सवाद्यांनी आणखी एक तंत्र अवलंबलं. आपल्या केडरच्या जोरावर ते शक्य त्या सर्व संस्था काबीज करत सुटले. अर्थात् हे त्यांनी लोकशाही पद्धतीनेच केल्याने त्यात गैर असं काहीच म्हणता येणार नाही ! जिल्ह्याजिल्ह्यातल्या शाळा, सोसायट्या, बँका आज सी. पी. एम. च्या ताब्यात आहेत. कॉलेजच्या निवडणुकात ह्या सत्तेचा वापर झाला. यातून स्टुडंट्स हेल्थ सेंटरसारख्या छोट्या संस्थाही सुटल्या नाहीत. संजयकुमार गांगुली नावाचा इथल्या झेवियर्स कॉलेजचा विद्यार्थी माझ्याबरोबर होता. आज तो मॅकॅनिकल इंजिनियर म्हणून कलकत्त्याच्या उपनगरातल्या एका चेनफॅक्टरीत काम करतोय. समाज कार्याची आवड म्हणून हा तरुण हेल्थ सेंटरमध्ये काम करायचा. रक्तदान शिबिरं आयोजित करणे, एखाद्या विद्यार्थ्याला मोफत वैद्यकीय मदत मिळवून द्यायची, एवढ्यापुरतच या संस्थेचं काम; पण सत्तेवर आल्यावर मार्क्सवाद्यानी इथेही आपली माणसं घुसवली आणि संजयसारख्या अ–राजकीय तरुणाना हुसकावून लावलं. संजय या लाल हडेलहप्पीविरुद्ध कडवटपणे बोलत होता. वास्तविक त्याची सहानुभूती मार्क्सवाद्याकडेच; पण तो पक्षाचा सदस्य नाही; *पण आज तो मार्क्सवाद्यापासून दूर गेला आहे.* आपल्या या बळकाव-तंत्रामुळे मार्क्सवाद्यांनी अनेक सहानुभूतिदारही गमावले आहेत.

पण या सगळ्याहून एक जोरदार आणि गंभीर असा फटका मार्क्सवादी खाताहेत. इतर पक्षाची स्थिती यापेक्षा फार वेगळी आहे अशातला प्रकार नाही; पण हे पक्ष बंगालमध्ये 'शक्ती' कधीच नव्हते. राजकीय सौदेबाजीतली प्यादी इतकंच त्यांचं अस्तित्व. सी. पी. एम. ही इथली 'शक्ती' होती आणि वेगळ्या प्रकारे का होईना आजही आहे. म्हणूनच या फटक्याचा वेग त्यांच्याबाबत अधिक जाणवतो; आणि इथल्या भावी राजकारणाच्या दृष्टीनेही तो महत्त्वाचा ठरणार आहे.

आजवर मार्क्सवाद्याकडे मोठ्या संख्येने तरुण कार्यकर्ते येत असत. पाच वर्षांपूर्वी विरोधात असताना पक्षाच्या सभेला सहज लाखभराची गर्दी उसळायची आणि त्यात तरुणाची बहुसंख्या असायची. पक्षाचे मोर्चे, मिरवणुका यातही विशी–तिशीचे युवक आघाडीवर असत. आज मात्र चित्र बदलेलं दिसतं. अलिमुद्दिन स्ट्रीटच्या मागच्याच रस्त्यावर स्टुडंट्स फेडरेशनचं ऑफिस आहे. अंधारातला जिना पार करून मी तिथे गेलो तर दोन–चार निबर चेहऱ्याची पोरं बसलेली. एकाच्या हातात ट्रान्झिस्टर आणि बाकी भोवती गोळा होऊन फुटबॉलची मॅच ऐकत असलेले. फेडरेशनचे अध्यक्ष मनीव रॉय यांना विद्यार्थी का म्हणावं हा प्रश्नच होता. सेक्रेटरी समीर पुटा-टन्डीयाही तिशीपलीकडचे असावेत. मठ्ठ चेहऱ्याचे हे दोघंही 'युवक' माझ्या एकाही प्रश्नाचं उत्तर धडपणे देऊ शकले नाहीत. सत्तेवर आल्यानंतर आमची मेम्बरशिप वाढली एवढंच थोर कार्य त्याच्या लेखी जमा असावं.

मार्क्सवाद्याकडे युवक येत नाहीत यालाही पार्श्वभूमी आहे. विरोधात असताना मार्क्सवादी जी भाषा करत होते ती आज बदलली आहे पंचविशीच्या युवकांना आवेशाची तहान असते. सत्तेचं आणि सरकारनं केलेल्या कामाचं गुणात्मक विश्लेषण वगैरे गोष्टी नंतर, ही त्यांची वृत्ती. पूर्वी मार्क्सवाद्यांकडे हा आवेश होता, असंतोषाच्या लाटेवर ते आरूढ होऊ शकत होते. आज भूमिका बदलल्यावर हा आवेश कुठून आणायचा ? सत्ता मिळाल्यावर भाषा का बदलली असा संतप्त सवाल एखाद्या युवकानं केला तर काय उत्तर द्यायचं ? हे कोडं मार्क्सवाद्यांना सतावतंय. सदुसष्ट, एकूणसत्तरमध्ये मार्क्सवादी अपयशी ठरल्यावर त्यांच्याकडे असलेले अनेक तरुण नक्षलवाद्याकडे गेले आणि सत्तरच्या सुमाराला या चळवळीनं अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलं हा इतिहास ताजा आहे. आज नक्षलवादी दिशाहीन आहेत, त्यांची चळवळ मृतावस्थेलाच पोचली आहे, ही सी. पी. एम.च्या दृष्टीनं त्यातल्या त्यात जमेची गोष्ट; पण मग निराश झालेल्या या युवकानं जायचं कुठं ? परिणामी 'सब साले चोर' ही वृत्ती सध्या युवकाना वेढून राहिलेली दिसते. कुठल्याही चळवळीचं, पक्षाचं आकर्षण त्याना राहिलेलं नाही. मुळात चळवळच नाही तर आकर्षणाचं काय घ्या ! राजकीयदृष्ट्या प्रगल्भ मानल्या जाणाऱ्या बंगालला ही निश्चितच शरमेची गोष्ट आहे. मार्क्सवाद्याच्या दृष्टीनं हा एक धोकाच आहे. ज्या शक्तीच्या जोरावर त्यानी विरोधात असताना पाय रोवले तीच जर त्याच्यापासून दूर *जाऊ लागली तर करणार काय ?*

¤

चार दिवस सतत हेलपाटे घातल्यावर एका सकाळी प्रमोद दासगुप्ताचीभेट झाली. मंत्रिमंडळाच्या शपथविधीचा हा आदला दिवस. मंत्रिमंडळ बनवताना डाव्या आघाडीतल्या घटक पक्षात झालेल्या रुसव्याफुगव्यांमुळं प्रमोददा वैतागलेले असावेत. तोंडातला गलेलठ्ठ चिरूट अस्वस्थपणे चावत ते आपल्या प्रशस्त खोलीत बसले होते. चेहऱ्यावरचे भाव पूर्णपणे त्रासिक आणि विचारात बुडल्यासारखे. आदल्या दिवशी सध्याकाळी शेजारचाच मीटिंग-रूममध्ये झालेल्या पत्रकार परिषदेतही प्रमोददाचा हाच मूड होता. खातेवाटपाबाबत जाहीररीत्या समझोता झाला असला तरी गुंता अजून पूर्णपणे सुटलेला नसावा.

माझ्याबरोबरच्या अनिल विश्वासच्या समोर प्रमोददांनी एक कात्रण धरलं आणि थोड्या रागातच म्हणाले, 'वाच !'

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांचा 'लंडन टाइम्स'मध्ये आलेला तो वृत्तांत होता. शीर्षक – 'स्मार्ट कॅम्पेनिंग बाय मिसेस गांधी.' वृत्तांत पूर्णपणे बाईंच्या बाजूचा. सहाजिकच प्रमोददांचा पारा चढला !

अनिल विश्वासनं त्या कात्रणावर नजर फिरवली आणि 'काय ही भांडवलदारी वृत्तपत्रं लिहितात !' अशी एक टिपिकल कम्युनिस्ट तुच्छता चेहऱ्यावर आणून तो हसला. वर्षानुवर्षाच्या सवयी सहजगत्या जात नाहीत हेच खरं !

यंदाच्या निवडणुकीत डाव्या आघाडीतला पूर्वीपेक्षा जास्त (२३८) जागा मिळालेल्या असल्या तरी त्या प्रामुख्यानं ग्रामीण आणि निमशहरी भागात. कलकत्त्यासारख्या राजधानीच्या शहरात अकरा म्हणजे अर्ध्या जागा इंदिरावाल्यांना मिळाल्या. अशोक मित्र, मोहमद अमीन, पार्थ डे, बुद्धदेव भट्टाचार्य वगैरे मंत्री पराभूत झाले. एकापरीनं मार्क्सवाद्यांच्या कारभाराला शहरी जनतेकडून मिळालेला हा नकारच. प्रमोददांच्या मुलाखतीची सुरुवात याच प्रश्नापासून होणं स्वाभाविकच होतं.

'पक्षाची झालेली ही पीछेहाट आहे असं नाही का तुम्हाला वाटत ?' असं मी विचारताच प्रमोददांनी हसून अनिल विश्वासकडे बघितलं. अनिल विश्वासला काय तो इशारा समजला आणि तोच उत्तर देऊ लागला. पुढे मुलाखतभर जिथे प्रमोददा सांगत तिथे अनिलच बोलत असे. आपल्या वयोवृद्ध नेत्याचा त्रास कमी करण्यासाठी मार्क्सवाद्यांनी केलेली ही योजना असावी.

'पीछेहाट आहे असं नाही म्हणता येणार. तसं पाहूलं तर कलकत्त्यातल्या आमच्या मतात वाढच झाली आहे. जवळजवळ एक लाख पस्तीस हजारांनी आमची मतं वाढली, तर काँग्रेसची पाच हजार चारशेनी कमी झाली. आम्हाला ४८% मतं मिळाली आहेत, तर काँग्रेसला ४६% म्हणजे एका दृष्टीनं आमची स्थिती सुधारली आहे. आमचे काही नेते हरले हे खरं. शहरी भागातल्या अर्ध्या-कच्च्या राजकीय ध्रुवीकरणाचा तो परिणाम आहे. सहा जागांवर तर आम्ही अगदी कमी मतांनी हरलो. पुन्हा सर्वच शहरी भागात असं घडलेलं नाही. दुर्गापूर, खरगपूर वगैरे भागात आम्ही जिंकलो आहोत. म्हणजे शहरातल्या अगदी किंचितशा भागात आम्ही हरलो असं फार तर म्हणता येईल.'

प्रमोददांच्या वतीनं अनिल विश्वासनं दिलेलं हे उत्तर पक्षाची बाजू मांडण्याच्या दृष्टीने ठीक असलं तरी पराभवाची वस्तुस्थिती मात्र त्यामुळं झाकली जात नाही. मध्यमवर्गीय मतदारांच्या अपेक्षा पुऱ्या झाल्या नाही की तो पटकन नाराज होतो. मग अपयशामागची कारणंही ऐकून घ्यायची त्याची तयारी नसते. हा अनुभव देशातल्या इतर भागातही येतोच. मार्क्सवादी सत्तेवर आले तेव्हा त्यांनी राज्यातली वीजस्थिती, दळणवळणयंत्रणा सुधारण्याचं आश्वासन दिलं होतं. दोन्हीमध्ये थोड्याफार सुधारणा झाल्याही आहेत; पण लोकांना जाणवण्याइतपत नाहीत. वेळी-अवेळी दिवे जाणं हा कलकत्त्याच्या दिनक्रमाचाच एक भाग बनलाय. सतत आठेक वर्ष हे चालू आहे. एका बंगाली बाबूनं तर या अंधाराचीही समान वाटणी व्हावी, एका भागात लोडशेडिंग कमी, दुसरीकडे जास्त असं होऊ नये म्हणून सरकारवरच खटला दाखल केला आहे.



प्रमोद दासगुप्ता : डाव्या आघाडीचे किंगमेकर

या लोडशेडिंगच्या बाबतीत मात्र वेगळाच प्रकार ऐकायला मिळाला. वीजकामगारांची संघटना इंदिरा काँग्रेस आणि नक्षलवाद्यांच्या हातात आहे. ही मंडळी कित्येकदा घातपाताचे प्रकार करून काम रोखतात. मार्क्सवाद्यांना वीज कामगारांत शिरकाव करणं अजून तरी जमलेलं नाही. पूर्वी गनी खान चौधरी राज्यात ऊर्जामंत्री असताना त्यांनी मालदा आणि आसपासच्या जिल्ह्यांतून बऱ्याच माणसांची भरती इथल्या नोकऱ्यांतून केली. याच मंडळींची स्वामीनिष्ठा आज मार्क्सवाद्यांविरुद्ध कामाला येतेय असं बोललं जातं.

शैक्षणिक धोरणाचा फटकाही मार्क्सवाद्यांना या निवडणुकीत बसला. शिक्षणमंत्री पार्थ डे पराभूत झाले. प्राथमिक शाळांतून इंग्रजी काढून टाकण्याचं धोरण बंगालीबाबूंना अजिबात पसंत नाही, हेच यातून दिसतं. आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत हा बाबू अतिशय दक्ष आहे. मुलांना प्राथमिक शाळेत इंग्रजीच नाही म्हटल्यावर तो बिथरला. असाच प्रकार रवींद्रनाथांच्या 'सहज पाठ'च्या बाबतीत डाव्या सरकारनं शाळांतून हे पुस्तक बंद करायचं ठरवलं आणि एकच गदारोळ झाला. 'सहज पाठ' कालबाह्य आहे हे डाव्यांचं म्हणणं; पण बंगालीबाबू कुठं ऐकायला तयार आहे ? रवींद्रनाथ हा तर त्याच्या भावनेचा प्रश्न. मी ज्यांना ज्यांना विचारलं त्यांपैकी अनेक बंगाल्यांनी

'सहज पाठ' वाचलेलंही नव्हतं; पण रवींद्रांचं पुस्तक रद्द करणं चुकीचं आहे असं यापैकी प्रत्येकजण ठामपणे सांगत होता. मात्र माजी ऊर्जामंत्री मित्रा वेगळंच सांगतात.

**हे पुस्तक रद्द केल्यानं ' विश्वभारती 'ला मिळणारी तीस लाखांची रॉयल्टी थांबणार होती. ती थांबू नये म्हणून हा सगळा गदारोळ निर्माण करण्यात आला, असं मित्राचं म्हणणं.**

डाव्या आघाडीनं अभ्यासक्रमातही आपल्या विचारसरणीनुसार अनेक बदल केले म्हणूनही लोकाचा राग आहे.

हावड्यासारख्या भागातल्या सी. पी एम. च्या पराभवाची कारणं मात्र वेगळी आहेत. मोठ्या प्रमाणावर ज्यूट मिल्स असलेला हा भाग. ज्यूट कामगार मुख्यत: बिहारी किंवा ओरिसातले. हा सगळा मार्क्सवाद्यांचा मतदार; पण गेले काही आठवडे ज्यूट मिल्सचा संप चालू असल्यानं हा कामगार गावी जाऊन बसला आहे. याचा परिणाम मार्क्सवाद्याच्या मतांवर होणं स्वाभाविक होतं.

काही औद्योगिक कामगारांत मात्र इंदिरावाल्यांनी हेतुतः निराळाच प्रचार केला. सी. पी. एम. हा बंगाल्यांचा पक्ष आहे, तुमचे हितसंबंध ते जपणार नाहीत असं त्यांनी बिगर-बंगाली कामगारांच्या डोक्यात घातलं आणि सी. पी. एम. ची आणखी काही मतं कमी झाली.

गेल्या पाच वर्षांतल्या डाव्या राजवटीवर घेतला जाणारा आक्षेप म्हणजे त्यानी मूलभूत गोष्टी काहीच केल्या नाहीत. उदा. जमिनीचं वाटप वगैरे. प्रमोददांना मी याबद्दल विचारलं तर ते उसळलेच ! ' आम्ही मूलभूत परिवर्तन घडवू असं कुणी सांगितलं तुम्हाला ? आम्ही असं कधी म्हटलेलं नाही. बूर्ज्वा, सरजामशाही व्यवस्थेत हे शक्य नाही. भारतीय घटनेच्या चौकटीत राहूनच आम्ही काम करतोय. या मर्यादेतच आम्हाला काम कराव लागणार आहे. मग हे शक्य कसं होईल ? आम्ही बेकारी, अज्ञान, गरिबी हटवू असं लोकांना कधीच सांगितलेलं नाही. हे मूलभूत प्रश्न आहेत.'

' पण प्रमोददा, गेल्या पाच वर्षांतलं तुमच्या सरकारचं वर्तन एखाद्या सोशल डेमॉक्रॅटसारखं नव्हतं का ? म्हणजे तुम्ही वापरलेले मार्ग, पंचायत राज्याची गांधींची कल्पनाही तुम्ही स्वीकारलीत. सत्ता राबवताना तुमच्या पक्षात झालेलं हे परिवर्तन मानायचं का ?' मी

आता प्रमोददांनी हातातला चिरूट अॅशट्रेवर ठेवला. ' कसलं परिवर्तन ? आम्ही शासन हे संघर्षाचं साधन मानतो. आमच्या ध्येयाकडे जाण्याची ही एक शिडी आहे आणि माझ्या सर्व कॉम्रेड्सना हे स्पष्टपणे माहीत आहे. अर्थात आम्ही मार्क्सवादी–लेनिनवादाचा मार्ग सोडलाय हा आरोप मी कधीही मान्य करणार नाही. या विचारसरणीमध्येही विशिष्ट परिस्थितीत सरकार बनवायला मुभा आहेच.'

शिक्षणविषयक धोरणाविषयीचे वगैरे प्रश्न प्रमोददानी धुडकावूनच लावले. ' जे गदारोळ करतात त्यांनाच विचारा !' त्यांनी मला बजावलं. पुढच्या पाच वर्षांत मात्र आम्ही अधिक अधिकारांसाठी जोमानं भांडणार असं ते पुन्हा पुन्हा सांगत होते.

मार्क्सवाद्याच्या यशाच्या दृष्टीनं दुसरी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे किसानसभेचे अध्यक्ष शांतिमय घोष. मुख्य ऑफिसला लागूनच असलेल्या इमारतीत किसानसभेचं ऑफिस आहे. त्यांना भेटायला गेलो तेव्हा मला सी. पी. एम. ची शिस्त अनुभवायला मिळाली. घोषबाबू ऑफिसात नव्हते. भिंतीवरचा चिनी शेतकरी आणि संथाळ जोडप्याची लाकडी मुंडकी निरखून संपली तेव्हा मी तिथेच बसलेल्या कार्यकर्त्याकडे वळलो. थोड्या–फार चौकशा केल्या तर त्या कार्यकर्त्यानं मला स्पष्टपणे सांगितलं, ' मी तुमच्या प्रश्नांची उत्तरं देऊ शकणार नाही. आम्ही फक्त जिल्ह्यातल्या आमच्या लोकांशी बोलतो. तुमच्यासारख्या बाहेरून आलेल्या माणसाशी आमचे सेक्रेटरी लेव्हलचे लोक बोलतील, असा इथला नियम आहे.'

इतक्यात घोषबाबू आले. घामाने चिंब झालेले कपडे आणि पायातल्या करकरणाऱ्या वहाणा. कुठेही तोरा नाही की, एवढ्या प्रचंड संघटनेचा–सत्तेचा माज नाही.

किसानसभेचं स्वरूप स्पष्ट करताना घोषबाबू म्हणाले, ' शेतकरी, शेतमजूर, कुळं असा सगळा शेतकीवर्ग आमच्या संघटनेत आहे. प्रत्येक वर्गाचं मागणीपत्र मात्र वेगळं असतं. एकाच संघटनेत राहिल्यानं परस्पर सामंजस्य निर्माण होणं शक्य होतं. आम्ही फक्त ज्याच्याकडे जमीन आहे, पण जे स्वत: शेती करत नाहीत आणि जे प्रत्यक्ष जमीन करतात एवढाच फरक करतो.'

आज राज्यातल्या अडतीसहजार गावांत आमचे सदस्य आहेत, हे सांगताना सत्तेचा आपल्या संघटनेला फायदा झाला हे घोषबाबूंनी मान्य केलं; पण संघटनेमुळं सरकारचाही फायदा होतो हे सांगायलाही ते विसरले नाहीत.

' ऑपरेशन बर्गा ' मुळं ज्या जमीनदारांचे हितसंबंध दुखावले ते सूडाने पेटतात. कुळाची नोंदणी करताना गेल्या पाच वर्षांत आमचे अडीचशे कार्यकर्ते मारले गेले असं सांगताना घोषबाबू म्हणाले, ' सरकार हे सर्वहारावर्गाच्या हातातलं हत्यार आहे. वर्गसंघर्ष तीव्र करण्यासाठी हे हत्यार ते वापरतील.'

सत्ताधीश कम्युनिस्टाच्या तोंडून वर्गसंघर्षाची ही भाषा मी पहिल्यादाच ऐकत होतो. घटनेची चौकट वगैरे प्रत्येक मार्क्सवाद्याचा आवडता विषय असावा. घोषबाबूंनीही मला ते ऐकवलं.

निघताना घोषबाबू म्हणाले, ' माझं वय किती असावसं वाटतं तुम्हाला ?'

' पन्नासच्या आसपास.' मी

' पन्नास ? आय अॅम रनिंग सिक्स्टी सेव्हन यंग मॅन ...'

' सिक्स्टीसेव्हन !'

' मग ? क्रांतिकारक चळवळी माणसाला नेहमीच तरुण आणि उत्साही ठेवतात !' घोषबाबूंनी जाताजाता मला ऐकवलं.

कदाचित हे खरंही असावं. माझा मात्र नेमकं काय हा निर्णय होत नव्हता. क्रांतिकारक चळवळ की, सत्तेचं सुख ? घोषबाबूंच्या बाबत चळवळ वगैरे खरंही असेल; पण इतर मार्क्सवाद्याच्या बाबत ... ?

¤

या वेळच्या विधानसभा निवडणुकीमुळं पश्चिम बंगालमधली राजकीय ध्रुवीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असं मानणारा एक मोठा वर्ग कलकत्त्यात आहे. डावी आघाडी विरुद्ध इंदिरा कॉंग्रेस असं सरळ-

सरळ मतविभाजन दिसतंही आहे; पण त्यामुळं ध्रुवीकरण झालं असं मानणं थोडं घाईचंच होईल असं मला वाटतं. ध्रुवीकरणाच्या प्रक्रियेला अधिक वेग प्राप्त झालाय हे मात्र निश्चित. राज्यात भा. ज. प. चा एकही उमेदवार निवडून येऊ शकत नाही, नक्षलवादी संतोष राणाही पराभूत होतो, जनता–लोकदल हे राष्ट्रीय पक्ष जमीनदोस्त होतात, हे अन्यथा कशाचं लक्षण मानायच ?

बंगालच्या मतदाराला सध्या तरी दोनच पर्याय दिसतात. तिसऱ्या शक्तीच्या मृगजळापाठी धावणं त्याला पसंत नाही. पुढच्या पाच वर्षांत या प्रक्रियेला नेमकंपण येईल. आज कलकत्त्यासारख्या शहरी भागात इंदिरा काँग्रेसच्या पारड्यात पडलेली सर्व मतं कायमची कम्युनिस्ट–विरोधी आहेत असं म्हणता येणार नाही. तसंच उलटही म्हणता येणार नाही. एक वेळ कम्युनिस्टाच्यापाठी स्वतःचं नेमकं मत गोळा होऊ शकेल; पण इतर पक्षांची तेवढी गंभीर दखल मतदारांनी घ्यावी अशी परिस्थितीच नाही आज इंदिरावाल्याना मतं मिळताहेत ती कम्युनिस्ट राजवटीबद्दलच्या नाराजीतून आणि दिल्लीवाल्या बाईच्या करिष्म्यामुळं. ती इंदिरा काँग्रेस पक्षाची मतं आहेत असं मानणं जरा धाडसाचंच ठरेल.

डाव्या आघाडीतले इतर पक्षही मार्क्सवाद्यांच्या पुण्याईवर भरवसा ठेवून आहेत. अन्यथा कालपरवापर्यंत मार्क्सवाद्यांशी लाठ्या–काठ्या घेऊन मारामाऱ्या करणारे फॉरवर्ड ब्लॉक, आर. एस. पी किंवा सी. पी. आय. वाले आज त्यांच्याबरोबर गुण्यागोविंदानं नांदतात, वेळप्रसंगी त्याची दटावणीही सहन करतात, याची संगती कशी लागणार ?

याचा अर्थ डाव्या आघाडीत सर्व आलबेल आहे असा मात्र नव्हे. एंटाली मार्केटपासून जवळच आर. एस. पी. चं ऑफिस आहे. लेनिन सरानी हे या रस्त्याचं नाव. पूर्वीची ही धरमतला स्ट्रीट. लाल राज्यातच इथं लेनिन अवतरला.

लोहाराचे भाते, भंगारवाले यांच्या गर्दीतून आर. एस. पी. च्या इमारतीचा जिना शोधून वर जाणं तसं कष्टाचंच होत. अर्धीअधिक इमारत कोसळलेली. उरलेला भाग टेकूंच्या आधारावर. वर एका अंधाऱ्या खोलीत दोन म्हातारे बसलेले. सगळं फर्निचरही जुनंपुराणं. आजूबाजूला पुस्तकांनी भरलेली कपाटं आणि जिथे शक्य तिथे जळमटाचं नक्षीकाम.

सत्तेतल्या भागीदारीमुळं आर. एस. पी. वाल्यांना सुदृढपणा लाभल्याचं त्यांच्या ऑफिसवरून तरी दिसत नव्हतं. मी त्या दोघा म्हाताऱ्यापैकी एकाला विचारलं, 'तुम्ही नाही सी. पी. एम. सारखं नवं ऑफिस बांधलं ?'

म्हातारा खोच समजल्यागत हसला.

दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांतून आघाडीतले फॉरवर्डब्लॉकचे मंत्री जतीन चक्रवर्ती यानी रायटर्स बिल्डिंगमध्ये केलेला थयथयाट वाचताना मला त्या पडक्या बिल्डिंगचा, म्हाताऱ्याच्या हसण्याचा अर्थ समजत होता. खातेवाटपातून झालेल्या मतभेदामुळं चक्रवर्ती नाराज

## शंभर टक्के मतदान !

यंदाच्या निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये अनेक गैरप्रकार झाल्याचा आरोप इथल्या विरोधी पक्षातर्फे केला जातोय. कॉंग्रेस (स)चे प्रियरंजन दासमुन्शी यांनी तर याविरुद्ध राष्ट्रपतीकडेच धाव घेतली आहे. मतपेट्या पळवणं, मतदानकेंद्रं लुटणं वगैरे आरोप मार्क्सवाद्यावर केले जात असले तरी त्यानी यापैकी काहीही केलेलं नाही याची खात्री सामान्य माणूसही देईल. गुंडगिरीचे हे काँग्रेसी मार्ग मार्क्सवाद्यांनी कटाक्षाने दूर ठेवले आहेत.
याचा अर्थ मार्क्सवादी साधुसंत आहेत, असा मात्र नाही. आपल्या बळकाव तंत्राचा उपयोग त्यांनी मतदानातही केला; पण थोडा वेगळ्या रीतीने. यासाठी त्यांनी गावोगावच्या आपल्या केडरचा उपयोग करून घेतला अनेक मृत व्यक्तींची, पत्ता बदललेल्यांची नावं मतदारयादीत असतात. अशी मतं हेरून त्याच्या जागी मार्क्सवाद्यानी आपल्या कार्यकर्त्यांना मतं द्यायला लावली म्हणे ! एकेका मतदारसंघात अशी पाच-पाच हजार मतं नोंदल्याचं मला सुप्रसिद्ध पत्रकार वरून सेनगुप्तानी सांगितलं. शिवाय मार्क्सवाद्यांची यंत्रणा एवढी प्रभावी की, एका मतदारसंघातलं काम पार पाडून कार्यकर्ते पुढच्या कामगिरीवरही सहजगत्या जाऊ शकत असत. इथल्या काही मतदारसंघात ९५ ते १०० टक्क्यापर्यंत मतदान झाल्याचं दिसतं ते यामुळंच. खोटं मतदान झाल्याच्या आरोपादाखल विरोधी पक्ष हाच पुरावा पुढं करतात. जनताचे पी. सी. सेन म्हणाले, 'पचाण्णव टक्के मतदान होण्याइतकी बंगालची लोकशाही जर गेल्या पाच वर्षांत प्रगल्भ झाली असेल, तर मार्क्सवाद्यांनी क्रांतीच केली असं म्हणायला पाहिजे !'
यावरचं मार्क्सवाद्यांचं उत्तरही ठरलेलं आहे–' मतदानाच्या ठरलेल्या वेळात शंभर टक्के मतदान होईल या दृष्टीनेच मतदान-यंत्रणेची आखणी केलेली असते. मग एवढं मतदान होऊ शकत नाही असं म्हणणं हा निवडणूक आयोगावरचाच अविश्वास आहे.'
सगळ्यात मजेची गोष्ट म्हणजे बंगालीबाबूला या सगळ्याचं काहीच वाटत नाही. मतपेट्या पळवणं, निवडणुकीतली खुनाखुनी वगैरे प्रकार त्याच्या एवढे अंगवळणी पडलेत की, खोटं मत नोंदवणं 'यात काय एवढं ?' असा भाव त्याच्या चेहऱ्यावर असतो.
सध्या कलकत्त्यात सर्वात जास्त खपणाऱ्या 'आनंद बझार पत्रिके'ने नवाच उपक्रम सुरू केला आहे. निरनिराळ्या मतदारसंघांतल्या मतदानाची आकडेवारी ते दररोज छापताहेत. त्याने तरी बंगालीबाबू जागृत होईल असं त्यांना वाटत असावं; पण बाबू तो कसला ! आनंद बझार 'काँग्रेसी पेपर' आहे हे तो पुरेपूर ओळखून आहे ! !

*

झाले आणि त्यानी आपलं सगळं सामान घरी नेलं !

राज्यातल्या काही भागात आजही मार्क्सवाद्यांशी फॉरवर्डब्लॉक किंवा आर. एस. पी. च्या कार्यकर्त्यांचे तटे उद्भवतात; पण ते तेवढ्यापुरतेच. अखेर या पक्षानाही सत्ता हवीच आहे आणि खरी शक्ती मार्क्सवाद्यांकडे आहे. त्यामुळं थोडीफार नाराजी व्यक्त करण्यापलीकडे त्यांची मजल जात नाही.

राज्यातला सगळ्यात मोठा विरोधी पक्ष असलेल्या इंदिरा कांग्रेसची अवस्था आपल्या परंपरेला अनुसरून दयनीय आहे. गटबाजी इतकी की, खुनाखुनीपर्यंत मजल जाते गेल्या तीन महिन्यांत राज्यात शंभर राजकीय खून झाले. त्यांपैकी सत्तर इंदिरावाले होते. हे खून मार्क्सवाद्यांनी केले असा आरोप इंदिरा कांग्रेसचे दिल्लीतले नेते करत असले तरी हे खून आपसातल्या वैमनस्यामुळं झालेत ही वस्तुस्थिती आहे. चौऱ्याहत्तर साली जयप्रकाशांवर हल्ला करणारे पंकज बोस वगैरे संजयवादी तरुण आज मागे पडले असले तरी सुब्रत मुखर्जी. सोमेन मित्र या नव्या पुढाऱ्यांनी त्यांच्या खुर्च्या घेतल्या आहेत. माणसं बदलली तरी सौदेबाजीचे अड्डे तेवढ्याच तेजीत. वेळप्रसंगी नेत्याना गुंडाळून हे अड्डे आपला कारभार पार पाडत असतात.

इथला जनता पक्ष पी. सी. सेन यांच्यापुरताच मर्यादित असावा जनता पक्षाबद्दल विचारलं तर जो तो सेनसाहेबांकडे बोट दाखवायचा. म्हणून मी दोनदा सकाळी त्यांच्या घरी फोन केला. ' साहेब झोपले आहेत. संध्याकाळी सहा वाजता लोकांना भेटण्याची वेळ आहे तेव्हा या !' असं ठरीव उत्तर मिळालं.

स्रेन पार्क स्ट्रीटच्या परिसरातल्या एका टोलेजग इमारतीत रहातात. हा भाग कलकत्त्याचं न्यूयॉर्क म्हणवला जातो.

संध्याकाळी त्यांच्या घरी पोचलो. काळं कुत्रं नसणं म्हणजे नेमकं काय याचा तो जिवंत अनुभव होता. बऱ्याच वेळाने माझी दखल घ्यावी असं आतल्या खोलीत फोनवर बोलणाऱ्या एका माणसाला वाटलं असावं. हा सेनसाहेबांचा सेक्रेटरी असावा असा कयास मी बांधला आणि कशासाठी आलो हे सांगितलं.

पी. सी. सेन हा तब्बल शहाऐंशी वर्षांचा म्हातारा अजूनही जनता पार्टीचा अध्यक्ष का आहे हे मात्र मला शेवटपर्यंत समजलं नाही. ४८ पासून ६६ पर्यंत मंत्री आणि मुख्यमंत्री राहिलेले सेनसाहेब आज विकलाग झालेत. दिसत तर नाहीच; पण ऐकूही कमी येतं. चालताना पाय लटपटतात अशी अवस्था! म्हाताऱ्याचा राजकारणातला रस मात्र कायम आहे. मजा म्हणजे त्यांना कम्यनिस्ट नंबर एकचे शत्रू वाटतात. इंदिराबाई निवडणुका तरी घेते हे त्याचं म्हणणं. आपलं आयुष्य जनतेसाठी आहे असं सेनसाहेब मानतात आणि जनतेची इच्छा असेल तर अजूनही राज्याची धुरा सांभाळायला ते तयार आहेत !

खरं तर सेनसाहेबांची भेट जनता पक्षाच्या केविलवाण्या परिस्थितीची कल्पना द्यायला पुरेशी होती; पण काशीकांत मोईत्राना भेटल्याशिवाय मला रहावेना. नक्षलवाद्यानी पळवलेला हा कृष्णनगरचा जनता उमेदवार ' दिसतो कसा आननी ' या तालावरची ही माझी उत्सुकता.

काशीबाबू कलकत्त्यातले नामांकित वकील आहेत. सुरुवातीला संयुक्त समाजवादी असलेला माणूस सिद्धार्थ शंकर रेंच्या मंत्रिमंडळात मंत्रीही होता. आपल्याला पळवलं याचं काशीबाबूंना मोठं कौतुक असावं. तो प्रसंग ते पुन्हा पुन्हा घोळवून सांगत होते.

' मी माझा निवडणूक–अधिकारी शिबू चौधरीच्या घरी कार्यकर्त्यांची बैठक घेत होतो. इतक्यात दारावर टक्टक् ऐकू आली. दरवाजा उघडताच सैनिकी गणवेषातली ती मंडळी आत आली आणि त्यांनी मला त्यांच्याबरोबर यायला सांगितलं. आम्हाला एका पांढऱ्या अँबॅसेडरमध्ये बसवण्यात आलं. गाडी चालू होण्याआधी आमचे डोळे बांधण्यात आले आणि आम्ही अज्ञातस्थळी गेलो. एक दिवस सकाळी मला एका रेल्वेस्टेशनवर सोडण्यात आलं. हातात शंभराची नोट ठेवायला मात्र ते विसरले नाहीत.' काशीबाबू वातावरणात शक्य तितका तणाव आणण्याचा प्रयत्न करत सांगतात.

---

**कलकत्त्याहून थोडंसं दूर तिलजल्याला असलेलं आनंदमार्गीयांचं हेडक्वार्टर हा एक चक्रावणारा हिंदी सिनेमाच आहे.**
**भव्य साधनामंदिर, अवधूतांचं निवासस्थान आणि त्यापाठचा तो बाबांचा अलिशान बंगला.**
**अजून बांधकाम पूर्ण झालेलं नसलं तरी तो झुलता जिना आणि त्यावर लटकवलेल्या कुंड्या एखाद्या तद्दन चलाऊ हिंदी सिनेमातल्या स्मगलरच्या बंगल्याची आठवण करून देत होत्या.......'**

## लाल राज्यात सात दिवस : वार्तापत्र दुसरे

# लाल राज्यातलं भगवं संस्थान

निखिल वागळे

**पुढच्या अंकात**

---

चौदा मेपासून एकवीस मेपर्यंत काशिबाबू बेपत्ता होते; पण कलकत्त्यात त्याना कुणी गंभीरपणे याविषयी काही विचारत नाही, हे त्यांचं दुःख आहे. खरं तर ते चेष्टेचाच विषय झालेत. 'काशीबाबू का हरले?' असं एखाद्याला विचारलं तर तो पटकन् म्हणतो, 'मेलेल्याला कोण मत देईल?' नक्षलवाद्यांनी नेलं म्हणजे काशीबाबू जिवंत परतणार नाहीत असा त्यांच्या मतदारानी विचार केला असावा, असं ही मंडळी अगदी सहजपणे सांगतात. या सगळ्या प्रकाराने काशीबाबूंचा मात्र थयथयाट होतो. आता तर 'मला पळवल्याचं खोटं आहे असं कुणी सिद्ध केलं तर मी सार्वजनिक जीवनातून निवृत्त होईन' असंच ते जाहीर करून बसलेत.

काशीबाबूंना नक्षलवाद्यांनी पळवलं असावं याविषयी माझ्या मनात मात्र तिळमात्र शंका नाही! तेवढीच उपद्रवक्षमता आज या नक्षलवाद्यात उरली आहे. दहा वर्षांपूर्वी सारा बंगाल पेटवून देणारा चारु मुझुमदार, कानू संन्यास पार इतिहासजमा झालेत. मुळात रोमँटिसिझममुळं या चळवळीकडे अनेक तरुण खेचले गेले; पण रोमँटिसिझम काही आयुष्यभर पुरत नाही. सहाजिकच कालांतरानं चळवळीला गळती लागली. नक्षलवाद जोरात होता त्या काळात मार्क्सवाद्याविरुद्ध काँग्रेसी सरकारनही त्यांना मदत केली. गुप्तहेरखात्याची अनेक माणसं त्या काळात नक्षलवाद्यांमध्ये तळ ठोकून होती. आपला खरा शत्रू कोण हे तेव्हाही नक्षलवाद्याना समजलं नव्हतं आणि आजही उमगलेलं नाही. मार्क्सवाद्याना झोडपण्यासाठी थेट भा. ज. प. शीही ते आज हातमिळवणी करताहेत; पण ही वाट या असंख्य छोटया गटाना विनाशाकडेच घेऊन जाणार आहे. आज कृष्णनगर, मालदा वगैरे जिल्ह्यात नक्षलवाद्यांची 'विप्लवी सरकारं' आहेत; पण आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी काही ना काही उपद्व्याप करत रहाणं एवढाच त्याचा उद्योग झालाय. आज बंगालीबाबू काँग्रेसी गुंडानाही 'दुनंबरी नॉक्सॉला' म्हणून संबोधतात. यावरून नक्षलवादी चळवळीसंबंधी काय तो अंदाज बांधणं सहज शक्य व्हावं!

बंगालच्या राजकारणाची आणखी एक खासीयत आहे—जातीपातीसंबंधी सुनील गंगोपाध्यायसारख्या नामवंत साहित्यिकापासून ते प्रमोद दासगुप्तांपर्यंत सर्वांनी मला ठासून सांगितलं की, आमच्याकडे जातीव्यवस्था संपुष्टात आलीय! मार्क्सवाद्यांच्या राज्यात जातीय दंगे, दलित अत्याचाराची उदाहरणं नाहीत हेही खरं; पण म्हणून जातीव्यवस्था नाही असं म्हणता येईल का? याबाबत 'रविवार' साप्ताहिकाचे संपादक सुरेंद्र प्रताप सिंग यांचं म्हणणं हा बंगाली बिलंदरपणाचा भाग आहे. इथले सगळे राजकीय नेते, साहित्यिक ब्राह्मण कायस्थ कसे? टेलिफोन डिरेक्टरीत सर्व भरणा उच्चवर्णीयांचाच कसा? म्हणजे इथे दलित नाहीतच की काय? खरी गोष्ट अशी आहे की, इथल्या दलितांना स्वतःच्या दलितपणाची जाणीवच नाही. उच्चवर्णीय ती करून देत नाहीत. कारण एकदा का ही जाणीव झाली की, हा वर्ग उन्नतीसाठी धडपडणार आणि मग जातिसंघर्ष अपरिहार्य. मग आमच्याकडे जातीव्यवस्थाच नाही असं कसं ह्यांना सांगता येईल? जोपर्यंत इथला दलित सुस्त आहे तोपर्यंत बंगालात जातिव्यवस्था असणारच नाही!'

कलकत्त्यातल्या ऐन मध्यभागातल्या एका प्रशस्त भिंतीवर मार्क्सवाद्यांनी रंगीबेरंगी अक्षरात लिहून ठेवलंय—धिस साइट इज रिझर्व्हड फॉर नेक्स्ट फाइव्ह इयर्स. खरं तर हे सांगायचीही गरज नाही. कलकत्त्यातलं एखादं शेंबडं पोरही सांगू शकेल की, आज ज्या पद्धतीनं मार्क्सवादी राज्य करताहेत, ज्या तऱ्हेनं ते पावलं उचलताहेत त्या पद्धतीत ते सतत वागले तर पुढची पाच वर्षं काय, दहा वर्षंसुद्धा त्याना हात लावायची कुणाची हिंमत नाही.

शेवटच्या दिवशी अलिमुद्दिन स्ट्रीट सोडताना तिथला दरवान मला म्हणाला, 'लाल सलाम!'

मी थोडासा बिचकलोच. याला काही भ्रम वगैरे तर झाला नाही ना असं वाटलं. चार दिवस मी सतत इथं येत होतो; पण एकदाही याला 'लाल सलाम' म्हणावसं वाटलं नाही. आजच ही उपरती का?

नंतर कळलं की, अजूनही कम्युनिस्ट असे अधूनमधून लाल सलाम म्हणत असतात! आणखी एक जुनी सवय.

आता माझीही 'लाल सलाम' करायला काही हरकत नव्हती.

'लाल सलाम कॉम्रेड!' मी त्या दरवानाला म्हटलं.

तो फक्त मिस्किलपणे हसला! (क्रमशः)

---

**श्याम कथा :** पृष्ठ १४ वरून

हा श्यामच्या जास्त जवळचा. "साहेब, ही काही आपले मराठी माणसे नाहीत. आपल्या मुली ह्या ओमान्याशी काय लग्न करतात? ह्या मिरजच्या, त्या कर्नाटक–साईडकडल्या मुली! पण त्यामुळे आपण मात्र बदनाम होतो!"

श्यामला हसावे की रडावे कळेना. आपण म्हणावयाचे की, हा मुस्लिमांचा प्रश्न आहे, आपल्याला काय करावयाचे आहे? बाकी मुसलमान म्हणणार हा हिंदुस्थानच्या मुस्लिमांचा प्रश्न आहे आणि आता हा मराठी मुसलमान म्हणतो आहे की, हा कानडी मुसलमानांचा प्रश्न आहे म्हणून!

असेच दोन–चार दिवस गेले. तेवढ्यात श्यामवर परत अभिमान वाटण्यासारखा प्रसंग आला. त्याचा मागे उल्लेख केलेला बंगाली सहकारी टाइम्स् ऑफ इंडिया चाळत होता. त्याच्या खुर्चीवरूनच तो मोठयाने ओरडून म्हणाला, "अरे फलाने साहेब, तुम्हारे ओ घासीराम कोतवाल युरपमें बडा पॉप्युलर हुवा है!"

एक तर सगळयाच बंगाल्यांना नाटय संगीत वगैरे गोष्टींबाबत कौतुक असते व ह्या बंग–बाबूने तर कोणा पेशव्यावरच्या बंगाली नाटकात पूर्वी कधी तरी थोरल्या माधवरावाचे काम केले होते. त्यामुळे त्याला नाना फडणविसाबद्दल जास्त आपुलकी. जर्मनी, फ्रान्समध्ये घाशिरामाने खूप 'नाम' कमावले होते असे तो बंगाली मोठ्या आनंदात सांगत होता. कोणा हिंदी नाटकाचे विलायतेत कौतुक झाले होते ह्याचा त्याला आनंद झाला होता.

"घ्या! एका बदनाम माणसावरचे नाटक करून आम्ही विलायतेत नाम कमवत आहोत!" श्यामच्या मनात विचार आला, "ज्या वेळी त्या वुद्ढया नानांनी लहान वयातल्या मुलीशी लग्ने केली वा त्या घाशिरामच्या मुलीचे जीवन बरबाद केले त्या वेळी आपल्यासारखे काही लोक विषण्ण झाले असतील नाही?"

"आता आपण त्या म्हाताऱ्या ओमानी माणसाने तरुण मुलीशी लग्न केल्याबद्दल हळहळतो आहोत." श्यामच्या मनात वरच्या विचाराबरोबर जोड विचार आला, "पण आणखी काही वर्षांनी कोणी ओमानी 'तेंडुलकर' ह्यावर फर्मास नाटक लिहून अशीच जर्मन–फ्रान्समध्ये वाहवा मिळवील नाही?" □

# मंदीची लाट अजून किती दिवस?

गेल्या जानेवारी महिन्यात रिझर्व बँकेनं पतपुरवठा रोखून धरण्यासंबंधीचं धोरण जाहीर केलं. एक लाखाच्या वरच्या ओव्हर ड्राफ्ट सवलती कमी करून टाकल्या. नवीन प्रकल्पांसाठी कर्जमंजुरी नाकारली जाऊ लागली. तेव्हापासून औद्योगिक क्षेत्रात एक प्रकारची अस्वस्थता आहे छोट्या आणि मध्यम उद्योजकांपासून मोठ्या उद्योजकापर्यंत ही अस्वस्थता येऊन पोचली आहे. किर्लोस्कर ऑइल इंजिन्सने पाच दिवसाचा आठवडा सुरू करून एक महिना झाला, आता आठवडा चार दिवसाचाच करायचा त्यांचा विचार आहे. कमिन्स, भारत फोर्ज आणि रस्टनही त्याच मार्गावर आहेत. टेल्कोने चालू वर्षासाठी २०% उत्पादनवाढ तूर्त स्थगित केली आहे. 'संघवी 'ने आपल्या एकूण ३६३ कामगारांपैकी २६३ कामगार (म्हणजे सुमारे ७०%) गेल्याच आठवड्यात कमी केले. वृत्तपत्रातल्या या बातमीत म्हटलं आहे की 'क्रेडिट स्क्वीझ आणि तयार उत्पादनाच्या वाढलेल्या किमतीमुळे हा निर्णय व्यवस्थापनाला घ्यावा लागत आहे.' पिंपरी-चिंचवड भागात काम करणाऱ्या कित्येक छोट्या उद्योजकांनी सध्या आपल्या शेडला टाळं लावलं आहे. काहींनी उत्पादन पूर्णपणे थांबवलं आहे तर काहींनी उत्पादनात ४० टक्क्यांपासून सत्तर टक्क्यापर्यंत घट केली आहे. काही विभागात तीन–तीन शिफ्टस्मध्ये चालणारा कारखाना सध्या एका शिफ्टपुरताच चालू ठेवला आहे. औद्योगिक क्षेत्रात गेल्या ३।४ महिन्यांत ज्याची बरीच चर्चा झाली तीच ही मंदीची लाट, आता अशी समोर येऊन थडकली आहे. मध्यंतरी वृत्तपत्रामध्ये टेल्कोच्या सुमारे पाच हजार चासीज पडून राहिल्याचा फोटो पाहिला. तीच गोष्ट ऑइल इंजिन्स्, पंपस् आणि ट्रॅक्टर्स आणि कमी शक्तीच्या मोटर्सची. ही उत्पादनं अशी आहेत की, याचा खरेदीदार-वर्ग पूर्णपणे म्हणजे जवळजवळ ९५% बँकेवरच अवलंबून होता बँकेच्या पतनियंत्रणाच्या धोरणामुळं या मालाला उठाव नाही असं या क्षेत्रातले जाणकार सांगतात. मालाला उठाव नाही म्हणून नवीन उत्पादन नाही. त्यामुळे मोठ्या कारखान्यांनी 'इनव्हेंटरी' अचानक कमी करण्याचा निर्णय घेतला. Inventory ची चार महिन्याची मर्यादा एक महिन्यावर आली. मोठ्या कारखान्याच्या या निर्णयामुळे गदा आली ती या कारखान्यांच्या subcontracters वर! मोठ्या कारखान्यांना स्पेअरपार्टस् पुरवणारे हे सबकॉंट्रॅक्टर गेले २।३ महिने काम नाही म्हणून अक्षरश: चिंतेत आहेत.

या मंदीची झळ प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या कोणाकोणाला पोचली आहे आणि हा प्रश्न किती गंभीर आहे हे जाणून घ्यावं म्हणून या क्षेत्रातल्या काही प्रमुख संबंधिताशी बोलायचं ठरवलं. मराठा चेंबरचे श्री. भा. र. साबडे यांना भेटले तेव्हा त्यांनी या प्रश्नाचं मूळ कारण काय ते सांगितलं. साबड्यांच्या मते गेल्या काही वर्षांत भारतात मोडकळीला आलेली अर्थव्यवस्था, तुटीचे अर्थसंकल्प आणि त्यामुळे निर्माण झालेली प्रचंड भाववाढ, खनिज तेलांच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या किंमती आणि आंतरराष्ट्रीय चलनव्यवहारात रुपयाची घटणारी किंमत या पार्श्वभूमीवर इंटरनॅशनल मॉनिटरी फंडकडून मंजूर झालेलं छप्पन्नशे कोटींचं कर्ज विचारात घ्यायला हवं. भारतातल्या वाढत्या inflation ला आळा घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेनं एकूणच पतपुरवठा कमी करावा ही IMF ची एक सूचना आणि त्यामुळं निर्माण झालेली मंदीची ही तात्कालिक लाट!

त्यांना विचारलं, या धोरणामुळं कित्येक लहान–मोठे उद्योजक आणि कामगार संकटात पडले आहेत त्याचं काय? साबडे म्हणतात, "किंमती कमी करा, कमी करा म्हणून आधी आपणच ओरडतो आणि त्यासाठी सरकारनं काही परिणामकारक जालिम उपाय वापरला तर त्याची किंमत मात्र आपण मोजत नाही. भारताच्या अर्थकारणावर Inflation मुळं आलेली 'सूज' या नवीन धोरणामुळं कमी होईल आणि अर्थरचनेला एक प्रकारची शिस्त लागेल. अर्थव्यवस्था काबूत आणायची असेल तर 'रूथलेस' वाटलं तरी असं धोरण राबवायलाच पाहिजे. घरी बसलेल्या काही कामगारांबद्दल सांगायचं, तर, भाववाढ कमी करायची असेल, तर रोजगार कमी होणार हा अर्थशास्त्राचा नियमच आहे. (अर्थशास्त्रातला 'फिलिप्स कर्व्ह' हे सिद्ध करतो) आणि या प्रश्नाबद्दल 'पॅनिकी' व्हावं इतका हा प्रश्न आज गंभीरही नाही."

अर्थरचना काबूत आणायची असेल तर सरकारी योजना असायला पाहिजेत असं सांगून ते म्हणाले, 'सरकारी कर्जमाफी योजना, किंवा रोजगार हमी योजना, किंवा निराधार योजनांचं सामाजिक महत्त्व कितीही असलं तरी जोपर्यंत त्या काही Productive गोष्टी देऊ शकत नाहीत, तोपर्यंत त्याच आर्थिक मूल्य काही नाही. सरकारी कारखान्यासाठी जेव्हा २० कोटी रु. मंजूर होतात तेव्हा त्याचं output किती हे पहायला हवं.'

या सरकारी भोंगळ योजनांना बँकेचं सध्याचं धोरण हाच योग्य उपाय आहे असं साबड्यांचं स्पष्ट मत आहे. IMF च्या धोरणाबद्दल टीका करणाऱ्यांबद्दल ते म्हणाले, 'IMF ही काय योजना आहे, हे सुद्धा या लोकांना माहीत नसेल. मंदीची ही लाट फार तर ४।५ महिने राहील. बँकेनं आपल्या अटी शिथिल करायला सुरुवात केलीच आहे. नवीन पतपुरवठा केला आहे. हे धोरण राबवण्याचं धैर्य आपल्या सरकारमध्ये नाही. जपानमध्ये रोज पाचशे कारखाने बंद पडतात आणि नवीन चालू होतात. ही स्पर्धा आपल्याकडे नाही. त्यामुळे आर्थिक विकासासाठी सध्याची परिस्थिती अगदी योग्य आहे.'

मंदीच्या लाटेचा खरा परिणाम झाला आहे तो उद्योजकावर. पुण्यात सध्या एकूण ५००० Tiny, small scale उद्योग चालतात. या उद्योजकांबद्दल बोलायचं तर मोठ्या कारखान्यात अनुभव घेतलेले हे skilled कामगार आहेत. १।२ लेथस् टाकून एखाद्या शेडमध्ये ७।८ कामगारांबरोबर याचा उद्योग चालू असतो. inventory कमी करण्याच्या मोठ्या कारखान्यांच्या धोरणामुळे हा उद्यो-

जकच फार हैराण झाला आहे. या वर्गाबद्दल जिव्हाळयाने बोलणारे या क्षेत्रातले अनुभवी उद्योजक म्हणजे हिरालालजी किराड. पुण्याच्या Tiny Industrial Associationचे किराड अध्यक्ष आहेत. या प्रश्नाबद्दल किराडांनी मोठ्या उद्योजकाशी बरीच चर्चा केली आहे. ते म्हणाले, 'बँकेच्या नवीन धोरणामुळं *नवीन प्रकल्पांना मान्यता मिळत नाही.* दुसरी गोष्ट, छोट्या उद्योजकाना बँकेकडून कर्ज मिळूनही उपयोग नाही. कारण मोठ्या कंपन्यांनी चार महिने मालच नको म्हणून सांगितल्यावर माल तयार करूनही उपयोग नाही. आमच्या संस्थेतले कित्येक सभासद अक्षरशः रडतात, पण काय करणार ? या अचानक उपटलेल्या धोरणाचा फटका आधी गरिबानाच बसतो !'

सध्या किराडांच्या 'हिराक इंडस्ट्री' चा एक लाखाचा सेल १० हजारांवर आला आहे. या व्यवसायात १५।२० वर्षांचा अनुभव असलेले किराडांसारखे काही लोक या परिस्थितीत तग धरू शकतात; पण इतरांचं काय ? परवडत नसतानादेखील कामगार कमी करता येत नाहीत. कारण फॅक्टरी ॲक्टचे सगळे नियम शॉप ॲक्टमध्येही लागू आहेत.

'स्वस्तिक' चे पूर्वीचे चीफ अकौंटंट व सध्या 'बाल्सन' चे संचालक श्री. अप्पासाहेब देवधर यांच्या मते सध्याची मंदीची लाट हो इष्टापत्तीच ठरू शकते. ते म्हणाले की, 'आर्थिक पुनर्घटनेसाठी बँकेचे हे धारण स्वागतार्हच आहे. यामुळं काळ्या पैशाला आळा बसेल, भाववाढ कमी होईल आणि बड्या कारखानदारांची पूर्णपणे बँकेवर अवलंबून रहाण्याची घातक सवय कमी होईल.'

औद्योगिक क्षेत्रात सरसकट मंदी आहे असं म्हणतात, ते काही खरं नाही असं अप्पासाहेबांचे चिरंजीव मुकुंद देवधर याचे मत आहे. ते म्हणाले, 'फक्त ऑटोमोबाइल व इंजिनियरिंग उद्योगावर मंदीचे सावट आले आहे. कारण त्यांच्या मालाची खरेदी 'हायर परचेस स्कीम' मुळं बँकेच्या कर्जावरच अवलंबून असते. बाकी क्षेत्रात कोणताही परिणाम नाही. माझ्या प्लॅस्टिकच्या व्यवसायावर गेल्या ३।४ महिन्यांत कोणताही परिणाम झालेला नाही शिवाय छोटे कारखाने बंद पडताहेत त्याचं कारण म्हणजे नियोजनाचा अभाव आणि मिसमॅनेजमेंट हेच आहे.'

'अजय मेटॅकेम' च्या बापूसाहेब पवारांचा माल प्रामुख्यानं किर्लोस्कराकडे जातो. त्यांनी Inventory कमी केल्यामुळं पवारांच्या कारखान्यामध्ये उत्पादन ६०।७० *टक्क्यांनी घटलं आहे. कायम कामगार सोडून* बाकीचे कामगार कमी करण्याच्या मार्गावर सध्या ते आहेत. कायम कामगारानासुद्धा कॉम्पेनसेशन देऊन काम सोडण्याची त्यांनी ऑफर दिली, पण ते काम सोडायला तयार नाहीत.

पवार म्हणाले, 'जागतिक बँकेनं पतपुरवठा रोखून धरण्याबद्दल अटी घातल्या, पण इकडे आयातीचं प्रमाणही वाढल आहे. आयात झालेला परदेशी माल आपल्यापेक्षा स्वस्त, दर्जाने चांगला आणि ते मालावर क्रेडिटही देतात. आम्हाला ते परवडत नाही. कारण टॅक्सेशन जास्त आणि उत्पादकता कमी, *त्यामुळे या अटी घालणारे जागतिक* बँकेचे लोक आपले हितचिंतक वाटत नाहीत.'

किर्लोस्कर उद्योग समूहांपैकी ऑइल इंजिन्स, कमिन्स, भारत फोर्ज या उद्योगावर बँकेच्या धोरणामुळे परिणाम झाला आहे; पण न्यूमॅटिक्सवर याचा कोणताही परिणाम नाही. चालू वर्षी न्यूमॅटिक्सच्या उत्पादनाचं प्रमाण ३३% वाढवलं आहे. असं या कंपनीचे Vice president श्री. बी. के. गद्रे म्हणाले.


गेल्या २।३ महिन्यांत टी व्ही-फ्रिज या वस्तूंची खरेदी मंदावली आहे असं दुकानदार सागतात. याचं कारण अर्थातच बँकेनं नाकारलेली कर्जमंजुरी हेच आहे. आप्पासाहेब देवधराच्या मते या चैनीच्या वस्तूंचं उत्पादन पूर्णपणे थाबलं तरी चालेल. कारण या वस्तूंची सध्या तरी गरज नाही. टी. व्ही. सारखी करमणुकीची साधनं चैन की गरज ? आजच्या शहरी संस्कृतीमध्ये या गोष्टी आता गरजेच्या झाल्या आहेत. शिवाय बँकेकडून कर्ज घेऊन, दरमहा हप्त्याने पैसे देणं सामान्य मध्यमवर्गाला सहज परवडू शकतं. त्यामुळं बँकेच्या या नवीन धोरणामुळं सर्वसामान्य लोकाच्या खास गरजेच्या गोष्टीवर गदा आली आहे की काय, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे

याच्या बरोबर विरुद्ध मत श्री.साबडेयांचं आहे. ते म्हणतात की, सध्या बाजारात consumer resistance वाढतो आहे, याच्यासारखी चांगली गोष्ट नाही. कारण सध्या लोक त्यांच्या खिशाला परवडू शकेल असं आणि खरोखर गरज असेल तेच फक्त खरेदी करतात, त्यामुळं भाववाढ नक्कीच कमी होईल.

या चर्चेच्या निमित्तानं लक्षात आलेला आणखी एक मुद्दा म्हणजे छोटे, मध्यम आणि मोठे उद्योजक यांचं एकसंध नातं ! यातला एक दुवा जरी निखळला तरी संपूर्ण उत्पादनाच्या यंत्रणेवरच परिणाम होऊ शकतो. किराड सांगत होते की, शंतनुराव किर्लोस्कर म्हणतात—'कामगारवर्ग म्हणजे औद्योगिक क्षेत्राचं बॅक-बोन. हा कणा कमकुवत झाला तर वरचा डोलारा उभा राहू शकत नाही.' मग प्रश्न पडतो की, याची दखल कोणीच कशी घेत नाही ? कारखान्यातून कमी केलेल्या कामगाराच्या घरी चूलच पेटेनाशी होते, *याचा विचार नवीन धोरणे आखताना, ठरवताना व्हायला नको का ?*

ही सगळी चर्चा केली खरी; पण गोंधळ आणखीनच वाढला. एकाच मत दुसऱ्याशी जुळणारं नाही. तसे सगळेच जाणकार, अनुभवी. कोणी म्हणताहेत ही मंदीची लाट तात्पुरती आहे, होईल २।४ महिन्यात कमी. कोणी तीन-चार वर्षांची मुदत सागतात. I M F प्रकरण तर मलतंच गूढ वाटतं आहे. पवार म्हणतात, हे जागतिक बँकवाले आपले हितचिंतक नाहीत. आपला गळा आवळला जातो आहे तर मराठा चेंबरचे साबडे म्हणतात बँकेच्या अटी हव्यातच. अशा स्थितीत ठाम मत तरी कसे *बनवायचे ? बाजू तरी* कुठली घ्यायची ? गोंधळात गोंधळ...

—मधुकर




# कविता एकलेपणची !

शुभदा रानडे

**(अपर्णा सेनचा हा पहिलाच प्रयत्न मनापासून दाद देण्यासारखा; पण वितरक न मिळाल्यामुळे शोध-स्पर्श प्रमाणेच चित्र–रसिकांपर्यंत न पोचलेला चौरंगी लेनला नॅशनल अॅवॉर्ड मिळालं आहे**

**के इ. एम. ने नुकताच चौरंगी लेनचा चॅरिटी शो आयोजित केला होता.)**

इतकी वर्षं उलटून गेली तरी प्रियकराच्या कबरीला फुलं वाहण्याचा व्हायोलेटचा न चुकणारा नियम...व्हायोलेट कबरीपाशी येते फुलं वाहताना व्हायोलेटच्या नजरेतील व्याकुळता गडद होते. क्षणभरच ! दुसऱ्याच क्षणी आपला एकाकीपणा सोबतीला घेऊन व्हायोलेट जडशीळ पावलांनी परतते.

शेक्सपियरच्या शब्दावर, काव्यावर नितांत प्रेम करणारी व्हायोलेट स्टोनहोन ही एक अँग्लोइंडियन शिक्षिका. काळानुसार एकेक आधार गळून पडत जातात. व्हायोलेटच्या आयुष्याला न संपणारी उदास व्यथा जडते. ती शेक्सपियरच्या काव्यात आणि रोबी मांजरासारख्या मूक प्राण्याच्या अव्यक्त स्पर्शात आधार शोधते. शेक्सपियरच्या कवितांमधील शब्दांच्या, अक्षरांच्या हातात हात घालून फिरताना तिला आपल्या असह्य एकलेपणाचा विसर पडत असतो.

व्हायोलेट बेभान होऊन शेक्सपियरच्या कविता म्हणते आहे. खळाळते शब्द कुठेही न अडखळता बाहेर पडताहेत. व्हायोलेटच्या चेहऱ्यावर उमटलेली बारीकशा समाधानाची अस्फुट रेघ अचूकपणे टिपणारा कॅमेरा विद्यार्थ्यांवर येऊन स्थिरावतो. कुणी चित्र काढतंय, कुणी गप्पा मारतंय की कुणी आणखी काही करतंय...सगळे टिवल्याबावल्या करताहेत; पण व्हायोलेटचं तिकडे लक्षच नाहीये. शाळा सुटण्याची घंटा होते. मुलं सुसाट पळत सुटतात. व्हायोलेट स्वप्नातनं जागी झाल्यासारखी भानावर येते आणि खिन्नपणे पुस्तक मिटते.

व्हायोलेटच्या आयुष्याचा एक ठराविक साचाच ठरून गेलाय, शाळा, आठवड्यातून एकदा कबरस्तानात जाणं, एका वृद्ध भावाला भेटायला जायचं...

भावाला भेटायला गेलेली व्हायोलेट तिथल्या वातावरणानं अधिकच उदास होते. कुणाचाही आधार नसलेले, मृत्यूला कवटाळायला आसुसलेले; पण मरण येत नाही म्हणून जगणारे ते जीव...नकळतच भेडसावणारा भविष्यकाळ छिन्नविच्छिन्न स्वरूपात डोळ्यांसमोर उभा राहतो. त्या वातावरणातून दूर जावं म्हणून भराभर जिन्यावरून उतरणारी व्हायोलेट एका पायरीपाशी थबकते. अडखळलेलं पाऊल पुढे पडतच नाही. पड्यावर वृद्धावस्थेने प्रेतकळा आलेल्या एका म्हाताऱ्या बाईचा क्लोजअप तिची मेलेली नजर व्हायोलेटला नखशिखांत थरथरवते, तिचं जीवघेणं हसू...व्हायोलेटला हे सारं असह्य होतं आणि ती एकदम धावत सुटते.

व्हायोलेट चर्चमधून बाहेर येते आणि रस्त्याने चालायला लागते. तेवढ्यात समोर नंदिता दिसते. नंदिता व्हायोलेटची एकेकाळची विद्यार्थिनी. 'नंदिता...' व्हायोलेट हाक मारते. हाक ऐकून नंदिता थांबते. पाठोपाठ समरेशही व्हायोलेट जवळ येते. व्हायोलेट–समरेशमधले ओळखीचे सोपस्कार पार पडतात. ती दोघांनाही घरी चलण्याचा आग्रह करते. समीरच्या फारसं मनात नाहीय; पण नंदितामुळे तो जातो. तिघं घरी पोचतात. 'सगळा वेळ आता या म्हातारीमुळे वाया जाणार' या कल्पनेनं समरेश पुरता वैतागलेला, तेवढ्यात व्हायोलेटला फोन येतो आणि ती खाली जाते. खोलीत फक्त नंदिता. समरेश...तो अनोखा एकांतक्षण समरेशला सोडवत नाही. आवेगानं तो नंदिताला जवळ घेतो. मोकळेपणानं प्रेम करायच्या चोरीमुळे कुचंबना होणारे नंदिता–समरेश एकमेकांच्या मिठीत बद्ध होतात. त्याच वेळेस समरेशच्या डोक्यात नवीन कल्पना घुसते. लेखनाला एकांत हवा या सबबीखाली व्हायोलेटच्या गैरहजेरीत तिची जागा वापरायची. तो नंदिताला व्हायोलेटला विचारण्यास सांगतो.

नंदिता, समरेश, व्हायोलेट टेबलापाशी बसून गप्पा मारताहेत. व्हायोलेटजवळ जागेचा विषय काढण्यासाठी नंदिताच्या मनाची थोडी–चलबिचल. कारण नाही म्हटलं तरी 'लेखनासाठी एकांत हवा' हे कारण देणं म्हणजे व्हायोलेटची फसवणूकच आहे. खरा एकांत वेगळ्याच कारणासाठी हवा आहे. त्यामुळे नंदिता विचारावं की न विचारावं,अशी उंबरठ्यावर उभी असते.तिचा थंडपणा पाहून अधीर झालेला समरेश नंदिताला डोळ्यांनी खुणावतोय. शेवटी नंदिता खुबीनं विषय काढते. माणसांच्या सहवासासाठी आसुसलेली व्हायोलेट खूष होते. एव्हाना ही 'म्हातारी' समरेशला जवळची वाटायला लागलेली असते.

दुसऱ्या दिवशीच नंदिता आणि समरेश 'टाइपरायटरसह' हजर होतात. व्हायोलेट घराच्या किल्ल्या तिच्याकडे देते आणि शाळेत निघून जाते. पलंगावर बसलेल्या नंदिताला समरेश जवळ घेतो. एकदम नंदिता दूर जाते समरेशला काही कळत नाही. तो वैतागून 'काय झालं' म्हणून विचारतो. नंदिता समोर बोट दाखवते. टेबलावर बसलेला रॉबी त्याच्या घाऱ्या घाऱ्या, लुकलुकत्या डोळ्यांनी एकटक बघत असतो. समरेश त्याला उचलतो आणि सरळ बाथरूममध्ये ठेवून देतो. नंदिता समरेशच्या स्वाधीन होते. शब्द संपतात. ओठांना ओठ भिडतात...कित्येक दिवसांची आतुर हुरहुर, ओढ संपल्याचे निःशब्द हुंकार खोलीभर उमटत राहतात.

संध्याकाळी व्हायोलेट दाराशी येते. नेहमीच्या सवयीने किल्ली काढण्यासाठी हात

पर्समध्ये जातो. पर्समध्ये किल्ली नसते. 'पडली की काय कुठे?' व्हायोलेटच्या मनात हे विचार येतात न येतात तोच काही तरी आठवतं. स्वतःच्या विसराळूपणाचं तिला हसायला येतं. ती बेल वाजवते. आत जाते तर नंदितानं तिच्यासाठी चहा तयारच ठेवलेला असतो. कित्येक दिवसांनी दुसऱ्याच्या हातचा मिळालेला चहा व्हायोलेट अतीव समाधानाने पिते.

नंदिता–समरेशच्या येण्यानं व्हायोलेटचं आयुष्यच बदलतं. तिच्या एकाकी आयुष्यात बहार येते. तिच्या आयुष्याचे विटलेले, फिकुटलेले रंग परत एकदा नव्या नवलाईनं झळकू लागतात आणि डोळ्यातली गहरी उदासी विटायला लागते. नंदिता–समरेशच्या अवखळ तारुण्याच्या सहवासात व्हायोलेट लहानाहून लहान होते. हसायला विसरलेले ओठ पुन्हा एकदा खळखळून हसायला शिकतात आणि व्हायोलेट कित्येक वर्षांनी तरुण झाल्यासारखी वाटते.



जेनिफर कपूर
शेक्सपिअरचं काव्य आणि बेवारशी कुत्र्याची सायसंगत

नंदिता–समरेश व्हायोलेटला जास्तीत जास्त खूश ठेवण्याचा प्रयत्न करतात. आपण करत असलेल्या फसवणुकीची भरपाई तिला जास्तीत जास्त आनंद देऊन करत असतात आणि नकळत कुठे तरी खुपणारी अपराधीपणाची बोचणी दूर करण्याचा प्रयत्न करीत असतात.

त्याच वेळेस शाळेत नवीन मुख्याध्यापिका येतात. सगळ्या टीचर्सची मीटिंग भरते. नव्या हेडमिस्ट्रेस नवीन शिक्षणपद्धती लागू करतात. सगळ्यांना त्यांचे त्यांचे विषय दिले जातात. व्हायोलेटची पाळी येताच तिला शेक्सपियरऐवजी ग्रामर विषय दिल्याचं सांगण्यात येतं. एखाद्या बाणासारखे हेडमिस्ट्रेसचे हे शब्द व्हायोलेटच्या कानात घुसतात आणि डोळ्यांत वेदनेचे तरंग उठतात.

पण नंदिता–समरेशमुळे व्हायोलेट हा जीवघेणा आघात सहन करते. आता वयामुळं सगळं शक्य होत नाही, म्हणून त्यातल्या त्यात 'ग्रामरसारखा कमी कष्टाचा विषयच बरा' अशी वर सारवासारवीही करते. पण चेहेऱ्यावर उमटलेलं अनिश्चित केविलवाणेपण लपत नाही. आता एक शब्द जरी जास्त बोललं तरी आपल्याला जोरदार रडू फुटेल, या भीतीनं व्हायोलेट गप्प बसते; पण हृदयात मात्र वेदनेचं काहूर उठलेलं असतं.

'नाऊ, वुई आर गोइंग टू लर्न ट्रान्झिटिव्ह...' व्हायोलेट शाळेत शिकवत असते. शेक्सपियरच्या काव्यात रमणारं व्हायोलेटचं मन ग्रामरच्या रुक्ष रोखठोक व्यवहारात कधीच रमत नाही. शेक्सपियरच्या काव्याचे पडसाद मनातल्या मनात बेभानपणे उमटत राहतात आणि ग्रामरमध्ये अडकलेली व्हायोलेट मात्र पळापळाला मिटत असते.

एक दिवस संध्याकाळी नेहमीप्रमाणे तिघं फिरायला जातात. समरेश–नंदिता तिला आग्रहाने पाणीपुरी खायला लावतात. व्हायोलेटची कोण तारांबळ उडते! नाकातोंडातून पाणी गळत असतानाही आणखी तिखट घालायला सांगणाऱ्या नंदिताकडे पाहून समरेश–व्हायोलेटला हसू आवरत नाही. मोकळ्या हवेत व्हायोलेट एकदम मोकळी होते. वयाचा अडसर गळून पडतो आणि सगळे ताण सैल होतात हसण्या–खिदळण्यात व्हायोलेट सगळी दुःखं, एकटेपण विसरते. हसण्याच्या नादात हातातल्या विद्यार्थ्यांच्या वहीवर आइस्क्रीमचे थेंब गळतात. व्हायोलेट बघते. तिला वाईट वाटतं; पण नंतर ती ते डाग निर्विकारपणानं पुसून काढते आणि पुन्हा गप्पात मग्न होते. घरी परतायला खूप उशीर होतो. जिना चढत असतानाच तिला एकदम आठवतं-ती भावाला भेटायला गेलीच नाही. आनंद एकदम विरून जातो. कारण इतके दिवस न चुकलेला नियम आज चुकलेला असतो...

व्हायोलेट रात्रीच्या जेवणाच्या तयारीत असते. तेवढ्यात बेल वाजते. व्हायोलेट दार उघडते तर दारात नंदिता–समरेश उभे. समरेशला नोकरी मिळण्याच्या आनंदात दोघंजण पार्टीची जय्यत तयारी करून आलेले असतात. पार्टी झकास रंगते. त्या आनंदात व्हायोलेटला भविष्यकाळाची पावलं ओळखता येत नाहीत.

संध्याकाळी व्हायोलेट दाराशी येते. कुणाची पत्रं आली आहेत, हे बघत बेल दाबते. आतून काहीच प्रत्युत्तर येत नाही. परत बेल वाजवते. आतमध्ये रॉबीशिवाय कुणीच नसतं. अस्वस्थ झालेला रॉबी दाराशी येऊन 'म्यांऊ' करतो त्या आवाजासरशी व्हायोलेट भानावर येते. पर्समधून किल्ली काढते आणि आत शिरते. इतक्या दिवसांनंतरचं घरामधलं ते एकाकीपण तिला खायला उठतं.

नंदिता–समरेश लग्न झाल्यापासून एक अलिशान बंगल्यात राहायला जातात. एक दिवस व्हायोलेट त्यांना भेटण्यासाठी घरी येते. नंदिता-समरेश कुठे तरी बाहेर जाण्याच्या

तयारीत असतात. त्यामुळे व्हायोलेट येण्यानं ते खूश होत नाहीत. आजपर्यंत तिनं दिलेल्या सहकार्यामुळं ती आल्या–आल्या 'आपण बाहेर जात असल्याचं' कसं सांगावं असा दोघांना प्रश्न पडतो. वातावरणात एक विचित्र अवघडलेपण येतं. शेवटी ते सांगून टाकतात; पण भोळ्या-भाबड्या व्हायोलेटला त्यात काहीच वाटत नाही. पुन्हा कधी येईन' असं मोकळेपणानं सागून ती उठते. तेव्हा चेहऱ्यावर उसनं हसू आणून समरेश तिला 'जाता जाता गाडीतून सोडतो' म्हणून सांगतो; पण बाहेर येतात तर गाडीत फक्त दोन माणसांपुरतीच जागा असते. व्हायोलेट परत एकदा बाजू सावरून घेते.

या वर्षीच्या ख्रिसमसची व्हायोलेट अगदी आतुरतेनं वाट बघत असते. नंदिता-समरेशनं व्हायोलेटच्या हातचा ख्रिसमस–केक खायचा वायदा केलेला असतो. त्यामुळे ख्रिसमसचे वेध लागताच ती उत्साहानं तयारीला लागते. नंदिता–समरेशला घरी बोलावण्यासाठी फोन करते; पण आता नंदिता–समरेशच्या आयुष्यात व्हायोलेटला फारसं स्थान नसतं. व्हायोलेटची त्यांना 'अडचण' भासत असते. तिचं अस्तित्वही त्यांना फारसं सुखदायी वाटत नसतं. आपलं फ्रेंड सर्कल, संसार यात व्हायोलेट कुठंच बसत नसते. परिणामी व्हायोलेटला ते टाळण्याचा प्रयत्न करतात. ख्रिसमसच्या दिवशी त्यांनी घरीच खूप मोठी पार्टी ठरवलेली असते आणि या पार्टीसाठी व्हायोलेटला बोलावण्याची त्यांची इच्छा नसते. त्यामुळे व्हायोलेटचा फोन येताच ते तिला गावाला जाणार असल्याचं सांगतात. व्हायोलेट क्षणभर खिन्न होते; पण ख्रिसमसच्या रात्रीच केक त्यांच्या घरी नेऊन ठेवावा म्हणजे 'गावाहून आल्या आल्या त्यांना केक मिळेल' म्हणून ती केक तयार करते. आपला केक पाहून ती दोघं किती आनंदित होतील,...वगैरे कल्पना करत ती केक खूप सजवते. व्यवस्थित बांधते आणि तो घेऊन त्यांच्या घरापाशी येते.

दोन्ही बाजूना उभ्या असलेल्या गाड्यांमधून वाट काढणारी व्हायोलेट फाटकापाशी येते. फाटक उघडून आत शिरते आणि समोर बघताच थिजल्यासारखी होते. कारण सगळा बंगला दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघालेला असतो. व्हायोलेट जवळ जाते. अंधुक दिसणाऱ्या काचेतून आत बघण्याचा प्रयत्न करते. आतमध्ये ख्रिसमस-पार्टी रंगात आलेली असते. नंदिता–समरेश पाहुण्यांची सरबराई करण्यात मग्न असतात. सगळे नाचगाण्यात मश्गुल असतात हसण्याचे, बोलण्याचे, संगीताचे आवाज बाहेरपर्यंत येत असतात. व्हायोलेटच्या चेहऱ्यावर अविश्वास, निराशा, अपेक्षाभंग, उदासी अशा संमिश्र भावनांचा विलक्षण गोंधळ उडतो. डोळ्यामध्ये आर्तता दाटून येते. हळूहळू परिस्थितीतलं कटू सत्य जाणवतं. व्हायोलेट काय समजायचं ते समजते आणि रितेपणाचं ओझ घेऊन तशीच बाहेर येते.

मध्यरात्रीचा काळाकभिन्न अंधार. एका हातात केकची पिशवी घेऊन व्हायोलेट रस्त्यानं निर्जीवपणे चालत असते. अपेक्षाभंगाच्या दारुण दु:खानं व्हायोलेटचं सर्वस्व हरपून नेलेलं असतं. व्हायोलेटचं मन रितं रितं होऊन जातं, थकल्या मनाची व्हायोलेट खाली बसते. केकच्या वासानं रस्त्यावरचं बेवारशी कुत्रं येतं. व्हायोलेट स्वत:शीच हसते. केविलवाणेपणानं! 'आपल्या नशिबात असच एकलेपणाच्या आगीत जगायचं लिहिलंय...'उदास विचारांचा मनात कल्लोळ उडत असतो. त्यामुळे व्हायोलेटचं मन अस्थिर होतं. अशा अस्थिर अवस्थेतच व्हायोलेट उठते. चालायला लागते. शेक्सपियरचं काव्य पुन्हा साथीला धावतं.

शेक्सपियरचं काव्य आणि बेवारशी कुत्र्याची साथसंगत घेऊन व्हायोलेट चालत राहाते...चालतच राहाते... □

## मुक्काम मुंबई - पृष्ठ ४ वरून

मग ही रक्कम किती प्रमाणात परत याच वॉर्डमध्ये खर्च होते? त्यामागची राजकारणं आणि अर्थकारणं काय आहेत? तर मग त्या विभागातून निवडून गेलेले निरनिराळे लोकप्रतिनिधी या संदर्भात काय करतात? मागच्या वर्षी कायदेमंत्री असताना बॅ. भोसल्यांनी आपल्या या भागामधून एक दौरा काढला होता. तेव्हा अस्वच्छतेसंबंधी असंख्य तक्रारी त्यांच्याकडे आल्या होत्या. त्या तक्रारीचं पुढं काय झालं?

आणि आता अस्वच्छतेचं हे समाजकारण. कोणे एके काळी काही झोपडपट्ट्यांच्या काही भागांना काही प्रमाणात सुविधा पुरवण्यात आल्या होत्या, आज मात्र त्या साफ मोडून पडल्या आहेत. कारणं अनेक आहेत; पण परिणाम मात्र हा एकच आहे. या सुविधांचा व्यवस्थित वापर झालेला नसणार हे तर उघडच आहे. त्याच्या जोडीचं दुसरं कारण म्हणजे लोकसंख्यावाढीनं पडणारा ताण. या छोट्याशा बेटावर होणारी गर्दी हे तर या शहराचं जुनाट दुखणं आहे. बाहेरून होणाऱ्या गर्दीच्या आक्रमणाच्या जोडीला लोकसंख्या अफाट वेगानं वाढवण्याची स्वत: झोपडपट्टीची क्षमताही नाकारता येणार नाही तेव्हा वाढती गर्दी त्यामुळे अपुऱ्या पडणाऱ्या आणि गैरप्रकारे वापरल्या जाणाऱ्या सुविधा आणि नवीन सुविधांच्या उपलब्धीसाठी नसणारं आर्थिक पाठबळ हा एक प्रश्न.

तर सगळ्या प्रकारच्या घाणीलाही सामावून घेऊन जगावं ही सहिष्णु वृत्ती, बाहेरचं जग आणि त्याच्या स्वच्छास्वच्छतेबद्दल असणारं औदासीन्य आणि निरिच्छता हा एक भलताच प्रश्न सर्वसाधारण कुठल्याही समाजाची, समूहाची वृत्ती ही स्थितिशीलतेचीच असते. भारतीय समाज म्हणजे तर अशा स्थितिशीलतेचा कळसच. बदलांना शक्यतो विरोध करावा आणि सारं काही अनंते ठेविले तसंच रहावं ही यांची धडपड. झोपडपट्टीतल्या स्वच्छतामोहिमाना स्वत: अंतेवासियाकडून प्रतिसाद, सहकार्य किती? बाहेरून कुणी जाऊन तिथल्या गटारी साफ कराव्या हे प्रासंगिक झालं; पण स्वत: रहिवाशाना या घाणीची घृणा कधी वाटणार? आपला परिसर आपण स्वच्छ ठेवला पाहिजे, घरातला कचरा दुसऱ्याच्या दारात टाकू नये, इतपत प्राथमिक गोष्टी झोपडपट्टीच नाही, मध्यम आणि उच्च वर्गीय परिसरातही शिकवणं जरुरीचं आहे. 'क्लीनलीनेस इज नेक्स्ट टू गॉडलीनेस' हे मत आपलं नाहीच मुळी. आपल्यासारख्या आध्यात्मिक लोकांना 'गॉडलीनेस'चे थेट रस्ते माहीत असल्यामुळे अस्वच्छता ही सारी मायाच ठरायची; पण ही सामाजिक, जीवनाभिमुख आणि रॅशनल दृष्टी येणं हे स्वत: स्वच्छतेपेक्षाही अधिक जरूर आहे. बाहेरची घाण आणि माती फक्त पायाला लागते; पण मरगळलेल्या जीवनदृष्टीची ही माती मनाची माती करते. 'कचरा हटाव मुवमेंट' सारख्यानं आपलं गलिच्छ जीवन असह्य आहे अशी टोचणी जरी प्रत्येक रहिवाशाच्या मनात निर्माण केली, तरी त्यातूनही बरंच काही घडेल.

ताजा कलम: सडलेली, भ्रष्ट आणि आळशी नोकरयंत्रणा, कामचुकार, पैसेखाऊ आणि बनवाबनवी करणारे सेवक ही आणखी एक डोकेदुखी. हा कार्यक्रम झाला त्याच्या दुसऱ्याच दिवशी पालिकेच्या कामगारानी येऊन बऱ्याच कचऱ्याच्या ढिगांची हलवाहलव केली. ती तत्पुरती होती की कायम स्वरूपाची हे आता पहायला मिळेलच.

—ललिता बर्वे

## सर्चलाइट

अमृत पुरंदरे

# ची पटाख डमऽऽडम ऽ!!

## अर्थात अशास्त्रीय भोंदूगिरी

एखादी जागा किंवा घर 'झपाटलेले' आहे असे आपल्या कानावर अधूनमधून येते. नुसती जागाच नव्हे तर झाड, ओढा, दरी, किंवा कधी कधी रस्त्याचा एखादा भाग सुद्धा अनेकदा झपाटला जातो; परंतु हे प्रकार फक्त भारतातच चालतात असे नाही. ही झपाटणारी भुतं किंवा इतर कोणी सर्व जगभर पसरलेली आहेत. अमेरिकेत समुद्राचा एक बराच मोठा भाग झपाटलेला म्हणून 'मान्यता' पावलेला आहे. या ठिकाणी जहाजे ज्याप्रमाणे धुकं हवेत विरघळतं त्याप्रमाणे अचानक लुप्त होतात. विमानं गायब होतात. हे इतक्या अचानक घडतं की S. O. S. ( Save our soles ) चा संदेश द्यायलासुद्धा त्यांना वेळ मिळत नाही. ती एका क्षणाला असतात आणि दुसऱ्या क्षणाला नसतात. त्यांचा कुठेही पत्ता लागत नाही. सर्वसाधारणपणे समुद्रात एखादे जहाज बुडले तर लाइफजॅकेटस, लाकडी वस्तु, ड्रमस् इ. तरंगताना दिसते किंवा एखादे विमान कोसळले तर तेलाचा किंवा पेट्रोलचा तवंग तरी दिसतो; परंतु या भागात हे काहीही होत नाही. फक्त गुप्त होतात. अर्थातच ह्या समुद्रातला भाग कोणता हे तुमच्या लक्षात आलेच असेल. बर्मुडा ट्रँगल. बर्मुडा आणि बहामा बेटांजवळचा एक मोठ्ठा त्रिकोणी समुद्रप्रदेश.

चार्लस बेर्लिटझ (मागल्या लेखात मी या लेखकाचा उल्लेख केलेला आहे.) यानेच 'बर्मुडा ट्रँगल' हा शब्द प्रथम वापरात आणला आणि सध्या तो इतका पॉप्युलर झाला आहे की, या भागामध्ये ज्या विमान कंपन्या फेऱ्या मारतात त्यांचे वैमानिकसुद्धा प्रवाशांना, 'आता तुमच्या डाव्या बाजूच्या खिडकीमधून जो समुद्र दिसत आहे तोच जगप्रसिद्ध बर्मुडा ट्रँगलचा प्रदेश...परंतु घाबरायचे कारण नाही. आपण दुसऱ्या मार्गाने जाणार आहोत' असं सांगतात म्हणे. तर, चार्लस बेर्लिटझ...ची पटाख डमऽऽ डमऽऽ...एरिक व्हॉन डनिकन...ची पटाख डमऽऽ डमऽऽ...विलयम मूर...ची पटाख डमऽऽ डमऽऽ—या आणि यांसारख्या लेखकांची नावं ऐकली की मला एकदम वेताळाच्या डेंकाली अरण्यात वांबेसी लोकांनी वाजवलेल्या गूढ नगाऱ्यांचा आवाज ऐकू आल्यासारखं वाटतं. यांची पुस्तकं वाचली की मग तर विचारूच नका. मला रात्री कुठे खुट्ट झालं की विचित्र कल्पना डोक्यात यायला लागतात. आकाशातून एखादे विमान जरी चाललेले असले तरी ती तबकडी नाहीये याची खात्री होईपर्यंत किंवा ही तबकडीच कशावरून नसावी ? किंवा तबकडी अशीच दिसत असणार, असे विचार करत, ते विमान दिसेनासे होईपर्यंत मी त्याच्याकडे बघत बसतो. बेर्लिटझ त्याच्या एका पुस्तकात असे म्हणतो की, जहाजे नाहीशी होणे हा प्रकार फक्त बर्मुडामध्येच नव्हे तर जगभर चालतो'...तेव्हापासून मी मुंबईच्या समुद्रावरच काय पण पेशवेपार्क मधल्या बोटीत बसणेसुद्धा बंद केले आहे. काय घ्या ? नेमका आपलाच नंबर यायचा.

परंतु परवा मात्र अतिरेकच झाला. विलयम मूर यांचे एक पुस्तक संपवून मी घराच्या गॅलरीत गेलो आणि मला चक्क दहा-पंधरा तबकड्या...हवेत तरंगणाऱ्या, चकचकित प्रकाश टाकणाऱ्या...अहो दिसल्या ना. गळ्याशप्पथ, आता काय सांगू ? त्याला काय भास म्हणायचा...ची पटाख डमऽऽडमऽऽ...बधीर झालो...तेव्हापासून या प्रकारच्या लेखक गँगची पुस्तकं वाचणं बंद केलं.

तसा मी थोडासा शास्त्राचा अभ्यास केलाय. एखादे जहाज असे सहजासहजी गुपचुप अदृश्य होऊ शकत नाही हे मलासुद्धा कळतं. एखादा शोध लागला तर तो पडताळून पहायच्या पद्धती असतात. उदाहरणार्थ त्या शोधासंबंधी पेपर्स प्रथम वेगवेगळ्या शास्त्रीय मॅगेझिनसमध्ये प्रकाशित होतात. या मॅगेझिनस्‌मध्ये उगाच कुठले आलतु, फालतु लेख येत नाहीत तर प्रथम ते त्या मॅगेझिनच्या संचालकातर्फे कसून अभ्यासले जातात. त्यानंतर ते बाकी अनेक शास्त्रज्ञ तपासून बघतात त्याच्यावर पुन्हा उलटे किंवा सुलटे किंवा दोन्ही प्रकारचे अभ्यासपूर्ण लेख येतात आणि जेव्हा तो शोध बहुमताने मानला जातो तेव्हाच त्याला शास्त्रीय सत्य मानले जाते.

पण हे तोतयालोक उगाच आइन्स्टाइन किंवा त्यांच्यासारख्या शास्त्रज्ञांची नावे पुढे



१९३० साली आइनस्टाइनने अपुरी म्हणून मागे घेतलेली 'Unified Field' theory सिद्ध झालेली बघून तो स्वतः सुद्धा चकित झाला असेल !

करून काहीही स्टंट लिहितात. या लेखकाचा खरपूस समाचार घेणारी पुस्तकेसुद्धा निघाली आहेत. परंतु त्यात काही स्टट नसल्यामुळे ती फारशी खपत नाहीत (साहजिकच आहे )

या लेखकाना प्रत्येक वेळेला काही तरी नवीन फॅड हवे असते. नुकतेच आपल्या आकाशगंगेमधले नऊ ग्रह सूर्याच्या एका बाजूला आले होते. ते येणार हे कळल्याबरोबर, गॅंगला विषय मिळाला. त्यानी त्याचा अभ्यास केला, गणितं माडली, मुलाखती घेतल्या, फोटो छापले, इतिहास तपासला आणि निष्कर्श काढला. ' १९८२ मध्ये पृथ्वीवर प्रलय होणे अटळ आहे....पृथ्वीवर आठ मिनिटाचे अणुयुद्ध होणार आणि सर्व पृथ्वी भस्मसात होणार,...उत्तर ध्रुव आणि दक्षिणध्रुव वितळणार व त्यामुळे संपूर्ण भूभाग जलमय होणार...यादवी माजणार...ज्वालामुखीचे उद्रेक...भूकंप...पूर...रोगराई...' थोडक्यात काय तर चॉ पटाख डम ऽ ऽ डम ऽ ऽ. पब्लिकला आकडेवारी देऊन, थोडे फोटो छापून गंडवणे. शास्त्रीय बुवाबाजी म्हणतात ती हीच.

अहो, भास होणे ही गोष्ट फार सोपी आहे. कारण त्याला काही करायलाच लागत नाही. मला खात्री आहे की समजा,पुण्यातल्या सदाशिवपेठेतल्या लोकाना बर्मुडा त्रिकोणात नेले आणि सांगितलं की, लोकहो, हाच तो त्रिकोण बरं....की ज्या ठिकाणी क्षणोक्षणी उडत्या तबकडया दिसतात, दिवसाढवळ्या जहाजे लुप्त होतात, अजूनही विमाने इथून का जातात हेच कळत नाही इ...तर निम्मा लोकाच्या डोळ्यांसमोर खरोखरीच तबकडया दिसायला लागतील आणि त्यातले निम्मे लोक ( परत आल्यावर ) छातीवर हात ठेवून किंवा शपथ घेऊन सांगतील की तबकड्या कशा होत्या, त्या कशा तरंगतात, त्याचे रंग कसे बदलतात ची, ची, ची, पटाख डम ऽ ऽ डम ऽ ऽ डम ऽ ऽ इ. ( गैरसमज नसावा पण माझे आणि सदाशिवपेठेतल्या लोकाचे काहीही वैर नाही; परतु भोळा भाबडा समाज या पेठेत मोठया संख्येने रहातो असा फार पूर्वीपासून समज आहे म्हणून त्याचे उदाहरण. )

या संदर्भात सहाजिकच अमेरिकन सरकारला अनेक प्रश्न विचारले गेले. प्रथम त्यानी दुर्लक्ष केलं; परंतु गॅंगचा प्रभाव इतका वाढला की, शेवटी त्याना स्पष्टीकरण द्यावे लागले. अमेरिकन सरकारच्या मते बर्मुडा भागात जहाजे नाहीशी होण्याची अनेक कारणे आहेत. उदाहरणार्थ–

(१) या भागात निसर्गाचे काहीही भाकित वर्तवता येत नाही. समुद्रात सतत छोटी चक्री वादळे ( Tornedos ) होत असतात. समुद्रातली ही चक्री वादळे दिसत नाहीत. अचानक समुद्रात पाण्याचा फवारा उंचच्या उंच उडाला (Wete Spout) की समजावे की, हे चक्रीवादळ आहे. कुठल्याही बोटीला बुडवण्याची ताकद याच्यामध्ये असू शकते.

(२) या ठिकाणी गल्फस्ट्रीग हा गरम पाण्याचा प्रवाह अतिशय वेगाने वाहतो.

(३) समुद्रान्तर्गत जमिनीचा भाग हा अतिशय विचित्र आहे. उथळ किनाऱ्याला लागून असणाऱ्या अतिखोल भागाचे प्रमाण बरेच आहे.

(४) वारे आणि वेगवान प्रवाह याच्यामुळे जमिनीचा नकाशा सारखा बदलत असतो.

(५) सारगॅसो नावाच्या समुद्रात सारगॅसम नावाची वनस्पती प्रचंड वाढलेली आहे. ( किंबहुना त्याचमुळे त्याला सारगॅसो असे नाव पडले आहे. ) या वनस्पतीच्यामुळे छोटया बोटी अडकून बसू शकतात.

(६) या प्रदेशाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय असे की, होकायंत्रे या प्रदेशात खरी उत्तरदिशा दाखवतात. ( बाकी सर्व ठिकाणी होकायंत्रे ही चुंबकीय ध्रुव दाखवतात.) जगात असे फक्त दोनच ठिकाणे आहेत. ( दुसरा जपानच्याजवळ आहे ). त्यामुळे अनेकदा बोटी चुकायची शक्यता असते.

(७) हा भाग जगातल्या सर्वात जास्त गजबजलेला (जहाजे आणि विमानांनी ) असा आहे. त्यामुळे, जास्त ॲक्सिडेंटस होणे स्वाभाविकच आहे.

(८) समुद्रात तळाला कधी कधी गुहा असतात. भरती-ओहटीमुळे किंवा प्रवाहामुळे त्या गुहांमध्ये कधी कधी अती वेगवान प्रवाह तयार होतात. त्यामुळे प्रचंड धोकादायक भोवरे तयार होतात. इ.

अशा प्रकारे जवळजवळ ९० टक्के अपघातांना कारणे मिळतात. त्यामुळे या प्रकारचे स्तोम माजवण्याचे काहीही कारण नसल्याचे अमेरिकन सरकारने जाहीर केले आहे.

असो. आतली गोष्ट अशी आहे की, मी सुद्धा सदाशिवपेठेतच रहातो. वरती सांगितलेला गोष्ट जरी खरी असला तरी दैवी शक्ती म्हणून काही काही असतेच, याच्यावर माझा मनापासून विश्वास आहे. त्यामुळे अमेरिकन सरकार काही जरी म्हणत असले तरी मी मुंबईच्या समुद्रावर फिरायला सुद्धा जायचे नाही असं ठरवले आहे. काय घ्या नेमकं आमच्याच बाबतीत काही तरी घडायचं ! ! □


स्टॅम्प्स जमवावेत तसं काही जण
माणसं जमवतात.
मी मात्र माणसातला माणूस नाही,
लेखकांच्या दरबारात रमणं सोडा
मी कासावीस होतो.
जिथे सूर जुळतात तिथे मी फुलतो,
पण अशा जागा फार कमी.

बातचीत
वसंत कानेटकर / सुरेश खरे
माणूस
पुढील अंकात



# How to get away with Rs. 6000 without breaking the law.

Go ahead and add Rs. 6000 to your tax-free income. It's perfectly legal.

The exemption limit on income from bank deposits has been raised from Rs. 3000 to Rs. 4000.

And now a further exemption upto Rs. 2000 is available on income from bank deposits of one year and above. So you get total tax relief on interest from bank deposits upto Rs. 6000 a year. That's including income from other specified investments under Section 80L of the Income Tax Act.

From Rs. 3000 to Rs 6000. That's quite a jump, isn't it? So what's holding you up? Cash in on this immediately.

**State Bank**

Security is a warm feeling

IX Asian Games, Delhi 1982
Official Bankers

CHAITRA-SBI-926

MANOOS ( Marathi Weekly ) 1.50 Paise Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11 )

प्रत्येक जन्म व मृत्यूची
नोंद करण्यात
आलीच पाहिजे

# याची कारणे तुम्हास माहीत आहेत काय ?

**जन्मतारखेचा दाखला अनेक कारणांसाठी वयाचे प्रमाण मानला जातो.**

- शाळेत प्रवेश
- नोकरी मिळविणे
- वाहन चालविण्याचा परवाना मिळविणे
- मतदानाचा हक्क
- पारपत्र मिळविणे
- विमा उतरविणे

**मृत्यूचा दाखलाही आवश्यक असतो :**

- मालमत्ता वारसा मिळणे
- मालमत्तेचे हक्कांबाबत ठरविणे
- विम्याची रक्कम मिळणे.

**राष्ट्राच्या दृष्टीने** जन्म व मृत्यूची नोंद केल्याने, अधिक चांगल्या आरोग्याच्या व अधिक सुखी जीवनाच्या योजना ठरविण्यासाठी मूलभूत माहिती मिळते.

१९६९ च्या कायद्यानुसार जन्म व मृत्यू यांची नोंद करणे सक्तीचे आहे.

**जन्म व मृत्यू यांची नोंद**
**वेळेवर झाल्याची खात्री करा**
**उशीर झाला तरी नोंद जरूर करा.**

**भारताचे रजिस्ट्रार जनरल**

davp 82/56